● पुणे, शनिवार, ३१ मे २०२५ ● RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 182 ● वर्ष ४ थे, अंक १८२ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



'झाडाझडती'चा निकाल 'राम' भरोसे'...! P३



१२ बीडच्या अविनाश साबळेची 'सुवर्ण' धाव

## At a Glance

### अर्थव्यवस्थेची दमदार कामगिरी

**नवी दिल्ली :** आथिक वर्ष २०२४- २०२५ च्या अखेरच्या तिमाहीत (जानेवारी-मार्च) भारतीय अर्थव्यवस्थेने दमदार कामगिरी केली. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी वाढ ७.४ टक्के राहिली. जी गेल्या चार तिमाहीच्या तुलनेत सर्वाधिक आहे. तर संपूर्ण आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये जीडीपी ६.५ टक्के वाढ नोंदवण्यात आली. याबाबतची » पान ७ वर

### 'गोकुळ'च्या अध्यक्षपदी नविद मुश्रीफ

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) अध्यक्षपदी नविद मुश्रीफ यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी शुक्रवारी संचालक मंडळाची सभा गोकुळ शिरगाव येथील मुख्य कार्यालयात झाली. या निवडीमुळे काँग्रेस जिल्हा अध्यक्ष व आमदार सतेज पाटील यांना धक्का असल्याचे मानला जात आहे. दरम्यान, » पान ७ वर

# वचनपूर्तीनंतरच बिहारमध्ये

## दहशतवाद्यांच्या छावण्या नष्ट केल्या, पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्याच्या एक दिवसानंतर मी बिहारला भेट दिली होती आणि दहशतवादी छावण्या नष्ट केल्या जातील असे सांगितले होते. आम्ही ते वचन पूर्ण केले आणि पाकिस्तानला आम्ही धुळीला मिळवले. आम्ही बिहारच्या मातीशी प्रत्यक्ष बोललो होतो की, दहशतवादाचे अड्डे आणि त्यांचे प्रमुख हे जमीनदोस्त केले जातील. मी येथूनच सांगितले होते की, पाकिस्तानला कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल. आज जेव्हा मी बिहारमध्ये आलो आहे, तेव्हा मी माझे वचन पूर्ण करून आलो आहे. ज्यांनी पाकिस्तानात बसून आमच्या बहिणींचे सौभाग्य उजाडले, त्यांच्या लपण्याच्या जागा आमच्या सैन्याने उजाड केल्या, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या बिक्रमगंज येथे एका रॅलीत बोलत होते.

बिहारमधील आधीच्या परिस्थितीचा उल्लेख करताना मोदी म्हणाले की, एक काळ असा होता की, बिहारच्या नक्षलग्रस्त गावांमध्ये रुग्णालये नव्हती; मोबाईल टॉवर नव्हते. कधीकधी शाळा जाळल्या जात » पान ७ वर

### विकासाच्या मार्गावर बिहार

● गेल्या ११ वर्षांत बिहारचा वेगाने विकास झाला आहे. एकेकाळी बिहारमध्ये पटना नावाचे एकच विमानतळ होते. आज दरभंगा येथूनही विमानसेवा सुरु आहे. बिहार सर्वत्र वेगाने विकास करत आहे. गंगा, सोन, गंडक, कोशीसह सर्व प्रमुख नद्यांवर नवीन पूल बांधले जात आहेत. हजारो कोटी रुपयांचे अनेक प्रकल्प बिहारमध्ये नवीन संधी आणि शक्यता निर्माण करत आहेत.

## कोल्हापुरात संतापजनक घटना

# महिलेला भाऊ-भाच्याने साखळदंडांनी बांधले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील राजारामपुरीमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका ४० वर्षीय महिलेला तिच्या घरातील सदस्यांनी साखळदंडाने बांधून ठेवलं होतं. मागील दिड महिन्यांपासून त्या महिलेला बांधून ठेवलं होतं. शुक्रवारी (३० मे) पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तिला सोडवलं आहे. ही महिला गतीमंद असल्यामुळे तिचा भाऊ, भावजय व भाच्याने मिळून तिला बांधून ठेवल्याचं ग्रामस्थांनी सांगितलं आहे.

दरम्यान, शिवसेनेचे (ठाकरे) स्थानिक नेते संजय पवार संबंधित घरी गेले आणि त्यांनी महिलेच्या नातेवाईकाच्या कानशिलात लगावली. त्यांना पोलिसांनी बाजूला केलं, तसेच महिलेला सोडवलं. पोलिसांनी या महिलेचा भाऊ, भावजय व भाच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की मागील दिड महिन्यांपासून सदर महिलेला साखळदंडांनी बांधून ठेवलं होतं. तीन कुलुपं देखील लावण्यात आली होती. दोन कुलुपांची चावी सापडली, तर एक कुलुप तोडून महिलेला मुक्त करण्यात आलं. या महिलेची स्थिती खराब असून तिला उपचारांसाठी राजारामपुरी येथील सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

> महिलेला अशा पद्धतीने साखळदंडांनी बांधून ठेवणं चुकीचं आहे. त्यांच्या शेजाऱ्यांना देखील तिची दया आली नाही. कोणीही तिची मदत केली नाही, पोलिसांना कळवलं नाही. आपल्या पुरोगामी महाराष्ट्रात एखाद्या महिलेवर तिच्याच घरातील लोकांनी अशा प्रकारे अत्याचार करणं दुर्दैवी आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापूर नगरीत अशा घटना अशोभनीय आहेत. असं कृत्य करणाऱ्यांना फटके दिले पाहिजेत. पोलिसांनी त्यांना कठोर शिक्षा द्यावी अथवा त्यांना आमच्या ताब्यात द्यावं. आम्ही त्यांना योग्य शिक्षा देऊ."
>
> — **संजय पवार,** ठाकरे गट

# निलेश चव्हाणचा खेळ खल्लास

## पुणे पोलिसांनी ठोकल्या बेड्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील विवाहित महिला वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी निलेश चव्हाणला अखेर अटक करण्यात आली आहे. निलेश चव्हाणकडेच वैष्णवीचे बाळ होते. त्याला पुण्यातील बावधन पोलिसांनी भारत-नेपाळ सीमेवर अटक केली आहे. तो २१ मे पासून फरार होता. निलेशवर कस्पटे कुटुंबीयांना धमकावल्याचा आरोप होता. निलेशच्या अटकेनंतर या प्रकरणाच्या तपासाला अधिक बळ मिळणार आहे.

निलेश चव्हाणचा बिल्डर असून त्याचा पोकलेन मशीनचा देखील व्यवसाय आहे. निलेश हा शशांक हगवणेची बहिण करिश्मा हगवणेचा मित्र असल्याची माहिती आहे. शशांक आणि वैष्णवी यांच्या वादात देखील तो अनेकदा असायचा. यांच्यातील कौटुंबिक वादामधे तो अनेकदा सहभागी असायचा, अशी माहिती आहे. वैष्णवीच्या कुटुंबियांना पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावल्याच्या आरोपाखाली तो गेल्या आठवड्याभरापासून फरार होता. पिंपरी-चिंचवड आणि पुणे पोलिसांची एकूण सात पथके त्याचा शोध घेत होती.

वैष्णवी हगवणे (वय २४) हिने १६ मे रोजी भुकूम येथील सासरच्या घरी गळफास लावून आत्महत्या केली होती. तिच्या सासरच्या मंडळींकडून शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप आहे. या प्रकरणात वैष्णवीचे पती शशांक, सासू लता, दीर सुषील, जाऊ करिश्मा आणि सासरे, माजी राष्ट्रवादी काँग्रेस नेते राजेंद्र हगवणे यांना यापूर्वीच अटक झाली आहे.

वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिचे १० महिन्यांचे बाळ निलेश चव्हाणच्या ताब्यात होते. वैष्णवीचे कुटुंबीय बाळाला घेण्यासाठी गेले असता, चव्हाणने त्यांना पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावले. याप्रकरणी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात २२ मे रोजी गुन्हा दाखल झाला होता. तसेच, बावधन पोलीस ठाण्यात दाखल वैष्णवीच्या आत्महत्या प्रकरणात २४ मे रोजी चव्हाणला सहआरोपी करण्यात आले. त्याच्यावर बाळाची हेळसांड आणि धमकी दिल्याचे आरोप आहेत. चव्हाणला पकडण्यासाठी पोलिसांनी 'स्थायी वॉरंट' जारी केले होते. त्याच्या मालमत्तेची जप्तीची प्रक्रियाही सुरू आहे.

# कांदा नुकसानीला एकरी एक लाखाची मदत हवी

## उत्पादक संघटनेचे मुख्यमंत्र्यांना साकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** वळिवाच्या पावसामुळे हजारो हेक्टरवरील कांदा शेतातच सडला तर काढून ठेवलेला कांदा भिजून नुकसान झाले. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, कमी किंमतीत कांदा विकणाऱ्यांना प्रतिक्विंटल दोन हजार रुपये अनुदान आणि दर स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेड, एनसीसीएफ या दोन्ही संस्थांना तीन हजार रुपये प्रतिक्विंटल दराने बाजार समितीतून खरेदीस बाध्य करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात केली आहे. आजवर झाला नव्हता इतका विक्रमी पाऊस यंदा मे महिन्यात झाला आहे.



शेतातील रब्बी हंगामातील उन्हाळी कांद्याची काढणी सुरू असताना पावसामुळे हजारो हेक्टरवरील कांदा काढणीवाचून शेतातच सडला. ज्या शेतकऱ्यांनी कांदा काढला होता, परंतु तो साठवणूक करण्याचा शिल्लक होता, अशा शेतकऱ्यांचा कांदाही शेतात भिजून गेल्याकडे संघटनेचे प्रमुख भारत दिघोळे, जिल्हाध्यक्ष जयदीप भदाणे यांनी लक्ष वेधले. » पान ७ वर

### स्वतंत्र समिती नेमण्याची मागणी

● केंद्र सरकार राखीव (बफर) साठा करण्यासाठी नाफेड आणि एनसीसीएफ या संस्थांमार्फत तीन लाख टन कांदा खरेदी करणार आहे. ही खरेदी थेट बाजार समित्यांतून शेतकऱ्यांचा कांदा तीन हजार रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करावी. याच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने स्वतंत्र समिती नेमावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

### वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी राज्य सरकारकडून यंदाही मोठा निर्णय घेण्यात आला आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सरकारने विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. विशेषत: वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी देण्याचा निर्णय घेतला गेला असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही ही सुविधा लागू असणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत वारीबाबतच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. वारीच्या मार्गावर कुठेही रस्ते खराब असू नयेत यासाठी योग्य डागडुजी, मुरूम, खडी व डांबरीकरण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. यंदाच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी समूह विमा योजना राबवली जाणार आहे. » पान ७ वर

### धनंजय मुंडे मन:शांतीसाठी विपश्यना केंद्रात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे हे मागील आठ दिवसांपासून नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील प्रसिद्ध विपश्यना केंद्रात विपश्यना घेत असल्याची माहिती धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडेंचे नाव वाल्मिक कराड प्रकरणात आले होते. त्यांच्यावर झालेल्या आरोपांनंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागी मंत्रिपदाची माळ भुजबळांच्या गळ्यात पडली. त्यामुळे मुंडे काहीसे नाराज होते. त्यामुळेच त्यांनी मन:शांतीसाठी » पान ७ वर

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांच्याशी चर्चा

# मेट्रोच्या विस्तारीकरणाला मिळणार गती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मेट्रो प्रकल्पांना गती देण्यासंदर्भात पुण्याचे खासदार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली. वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या विस्तारित टप्प्यांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी देणे तसेच खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासलासोबतच नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या टप्प्यांना पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाची मान्यता मिळविण्यासंदर्भात मोहोळ यांनी खट्टर यांच्याशी चर्चा केली.

पुणे मेट्रोचे दोन्ही मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू असताना वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. यासाठी महा मेट्रोने सविस्तर विकास आराखडा तयार केला असून याला राज्य सरकारचीदेखील मंजुरी मिळालेली आहे. तसेच पब्लिक इन्व्हेसमेंट बोर्डाचीही मान्यता ११ मार्च २०२५ रोजी मिळाली असून आता केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी प्रतीक्षात आहे. हा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावा, अशी मागणी » पान ७ वर

# ढेकळांचे पंचनामे करायचे का?

## कृषीमंत्री कोकाटेंचे वादग्रस्त व्यक्तव्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे पुन्हा एकदा त्यांच्या सडेतोड आणि थेट शैलीमुळे चर्चेत आले आहेत. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्यावर पंचनाम्यांची मागणी होत आहे. मात्र, कोकाटे यांनी दिलेलं "ढेकळांचे पंचनामे करायचे का?" हे वक्तव्य सध्या चर्चेचा विषय बनले आहे.

मे महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने नाशिक जिल्ह्यात सुमारे सात हजार हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान केले असून, यामध्ये कांद्याचं सर्वाधिक नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांनी काढणी केलेला कांदा चाळींमध्ये साठवून ठेवला होता, पण आर्द्रतेमुळे कांद्याला बुरशी लागण्याचा धोका निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांकडून कापणी झालेल्या पिकांचाही पंचनामा करावा, अशी मागणी होत असताना कोकाटे यांनी "हार्वेस्टिंग झालेलं आहे तिथे पंचनामे करुन काय करणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का?" असा थेट सवाल केला. त्यांचे म्हणणे आहे की, राष्ट्रीय आपत्ती निधीच्या नियमानुसार फक्त उभ्या पिकांनाच मदत मिळते, घरात किंवा चाळीत ठेवलेल्या कांद्याला नाही.

शेतकऱ्यांना कांदा वाचवण्यासाठी साठवलेला कांदा » पान ७ वर

Symbiosis Skills and Professional University, Pune

Recognized by UGC & Established under Govt. of Maharashtra Act No. XXXV of 2024

Kiwale, Adjoining Pune-Mumbai Expressway, Pune

India's #1 Ranked University in NIRF 2024 Skill University Category

Convert Your Passion into Profession

B. Sc. in Nutritional Sciences & Dietetics

M. Sc. in Nutritional Sciences & Dietetics

Specialization: Nutraceuticals, Nutrigenomics, Clinical Nutrition



- 70% focus on practical learning
- Yearly internships
- Industry-aligned programs
- Industry-experienced faculty
- Collaborations with Green Array Genomic Research Solutions Lab & Healthy Genie
- Contemporary science-based curriculum and advanced nutrition & dietetics labs
- Innovation & Start-up Centre

Excellent placements with leading companies

Nestle, VLCC, SkyRoots, Aastha Hospital, Diabetics & Wellness Clinic, Apollo Hospitals, HN Reliance, Bajaj Capital, CDMK Fitness, Eon Fitness, WellSense & many more

Attractive Scholarships | Open House: Sat & Sun Visit us on all 7 days | Apply Immediately

Call or WhatsApp: 77966 38369, 77966 95604, 77966 38376

sspu.ac.in | Last Date of Application: 15th June 2025

# 'लाडक्या बहिणीं'मध्ये २,६५२ सरकारी कर्मचारी

### दुहेरी योजनांचा घेतला लाभ

लाडकी बहीण योजनेत लाभ घेतलेल्या शासकीय कर्मचारी महिला या वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील आहेत. धक्कादायक बाब म्हणजे ८ लाख ८५ हजार महिलांनी चक्क दोन योजनांचा लाभ घेतल्याचंही समोर आलंय. लाडकी बहीण योजना आणि नमो शेतकरी योजना या दोन्ही योजनांचा लाभ ८ लाख ८५ हजार महिलांनी घेतल्याचे समोर आलंय. त्यामुळं आता सरकार या महिलांवर कोणती कारवाई करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना आणली. या योजनेला महाराष्ट्रात अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला आहे. किंबहुना या योजनेमुळेच महायुती पुन्हा एकदा सत्तेत आल्याचं बोललं जातंय. दरम्यान, या योजनेत काही महिन्यांपूर्वी गैरप्रकार घडल्याचं समोर आलं होतं. बोगस अर्ज दाखल करून या योजनेतील लाभ घेतल्याचे प्रकार समोर आले होते. यानंतर आता सरकारी कर्मचारी असलेल्या २,६५२ लाडक्या बहिणींनी या योजनेवर डल्ला मारल्याची धक्कादायक माहिती समोर आलीय.

दरम्यान, जुलै २०२४ पासून ही योजना अंमलात आणली गेली. प्रत्येकी महिन्याला दीड हजार रुपये याप्रमाणे सरकार लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा करीत आहे. या योजनेत जे नियम आणि निकष आहेत, त्या नियमात न बसणाऱ्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचं काही महिन्यांपूर्वी निदर्शनास आलं होतं. २.५० लाखांच्या वर वार्षिक उत्पन्न, घरी चारचाकी गाडी, तसेच कुटुंबातील व्यक्ती शासकीय नोकरीत नको, असे सरकारचे या योजनेतील नियम आणि निकष सांगताहेत. मात्र असे असतानाही या » पान ७ वर

### लाभाची रक्कम कोटींच्या घरात

● जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात एकूण ९ लाख महिलांना या योजनेतून विविध कारणामुळं अपात्र करण्यात आलं होतं. दरम्यान, या योजनेत किती शासकीय महिलांनी लाभ घेतला, हे तपासण्यासाठी मोहीम घेण्यात आली होती. त्यातून २,६५२ शासकीय महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात या योजनेतील पैसे थेट जमा झाल्याचे आढळून आलंय. म्हणजे या सर्व महिलांनी गेल्या ९ महिन्यांपासून १३ हजार ५०० रुपये घेतल्याचं समोर आलंय. या महिलांनी घेतलेल्या एकूण पैशाची रक्कम ३ कोटी ५८ लाख रुपये एवढी होती.



## मोफत डिजिटल श्रवणयंत्र तपासणी व वाटप शिबीर

**पुणे :** खासदार सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून, यशवंतराव चव्हाण सेंटर, ठाकरसी ग्रुप, सिकोर एड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने निसर्ग कार्यालय, गुलटेकडी, पुणे येथे मोफत डिजिटल श्रवणयंत्र तपासणी व वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात कर्णबधिर तसेच ज्येष्ठ नागरिकांची मोफत श्रवण तपासणी करून एकूण १०० लाभार्थींना डिजिटल श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात लाभार्थ्यांना केवळ श्रवणयंत्रच देण्यात आले नाही, तर ऑडिओमेट्री तपासणी, योग्य श्रवणयंत्र बसवणे (फिटिंग), समुपदेशन (कौन्सेलिंग) आणि अंतिम तपासणी या सर्व टप्प्यांवर तज्ज्ञ डॉक्टर आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सखोल सेवा दिली. या शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला.



## ‘पीएमपी’च्या नवीन तिकीट दररचनेबाबत नाराजी

**पुणे :** णे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी) यांनी बस प्रवासासाठी तिकीट दरवाढ जाहीर केली असून, ती येत्या १ जूनपासून लागू होणार आहे. नव्या दरवाढीमध्ये स्टेज रचनेत मोठा बदल करण्यात आला असून, त्याचा थेट परिणाम प्रवाशांच्या खिशावर होणार आहे. विशेषतः दुसऱ्या स्टेजपासून थेट दुप्पट दराने तिकीट आकारणी होत असल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे.

नव्या रचनेनुसार, पहिल्या स्टेजसाठी म्हणजेच ५ किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी १० रुपये तिकीट दर ठेवण्यात आला आहे. मात्र, प्रवाशाने दुसऱ्या स्टेजमधील अगदी पहिल्याच थांब्यापर्यंत प्रवास केला तरी त्याला थेट २० रुपये मोजावे लागणार आहेत. यामुळे प्रवासाचे अंतर थोडेसेच वाढले तरी तिकीट दर दुप्पट भरावा लागणार आहे.

२०१४ साली पीएमपीने शेवटचा तिकीट दरवाढ निर्णय घेतला होता. त्यावेळी १ ते ७८ किमी अंतरासाठी प्रत्येक २ किमी अंतराला एक स्टेज अशी एकूण ४० स्टेज रचना होती. परंतु आता ती रचना बदलून ११ स्टेज करण्यात आली आहे.

## महाराणा प्रताप यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**पुणे :** वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम उत्साहात झाले. बाजीराव रस्त्यावरील महाराणा प्रताप उद्यानातील पुतळ्यास झोपडपट्टी सुरक्षा दलाचे अध्यक्ष भगवानराव वैराट यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काशिनाथ गायकवाड, सुरेखा भालेराव, हरिभाऊ वाघमारे, महम्मद शेख उपस्थित होते. ताडीवाला रस्ता येथील माता रमाई चौकात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आनंद सोनावणे, महेंद्र कांबळे, विनोद शेडगे आदी उपस्थित होते. दलित सेनेचे प्रदेश अध्यक्ष सुनील यादव यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शशिकांत शेलार, वसंतराव बोले, प्रदीप गायकवाड आदी उपस्थित होते.



## नवविवाहितेचा छळ, सासरच्या विरूद्ध गुन्हा

**पुणे :** विवाह मंडपात पाटाखाली लिंबे सापडल्याने काळी जादू केल्याचा आरोप करून सासरकडील नातेवाइकांनी विवाहितेचा छळ केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी काळेपडळ पोलिसांनी पती, सासूसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत एका २५ वर्षीय तरुणीने काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पती, सासू यांच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार तरुणीचा अंबरनाथ येथील तरुणाशी मे २०१९ मध्ये विवाह झाला होता. विवाहातील विधी करताना तरुणीच्या पाटाखाली दोन लिंबे सापडली. विवाह समारंभ पार पडल्यानंतर तरुणी सासरी आली. तेव्हा विवाहात पाटाखाली सापडलेली लिंबे तसेच कौटुंबिक वादातून तरुणीला टोमणे मारण्यास सुरुवात करण्यात आली. तिचा शारिरिक आणि मानसिक छळ सुरू करण्यात आला. जाचामुळे कंटाळून तरुणी माहेरी निघून आली.

विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी नांदेड सिटी पोलिसांनी पती, सासू, नणंदेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका २४ वर्षीय तरुणीने नांदेड सिटी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विवाहानंतर तरुणीचा छळ सुरू करण्यात आला. माहेरहून पैसे आणण्याची मागणी करण्यात आली. विवाहात दिलेले दागिने काढून घेतले. पैसे न दिल्यास घर सोडून जा, अशी धमकी पती, सासू, नणंदेने दिल्याचे तरुणीने फिर्यादीत म्हटले आहे.

## अतुलनीय यश...!



**पुणे** स्टेअर्स फाउंडेशनने आयोजित, दिल्ली येथे झालेल्या नॅशनल बास्केटबॉल स्पर्धेत ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीच्या ढोले पाटील स्कूल फॉर एक्सलन्सच्या दहावीची विद्यार्थिनी श्रद्धा चरख ने केलेल्या अविश्वसनीय कामगिरी करत यश मिळविले आहे. श्रद्धाने तिच्या संघाला दुसरे स्थान मिळवून दिले , तिच्या संघात एक प्रमुख योगदानकर्ता म्हणूनही ती उदयास आली. श्रद्धाचा प्रवास समर्पण, शिस्त आणि कठोर परिश्रम काय साध्य करू शकतात याची एक शक्तिशाली आठवण करून देतो. ती सातत्याने मेहनत घेत आहे आणि राष्ट्रीय स्तरावर तिच्या प्रयत्नांना यश मिळाल्याबद्दल संस्थेच्या वतीने अध्यक्ष सागर ढोले पाटील यांच्यासह मान्यवरांनी अभिनंदन केले आले.

## बीबीए, बीसीएच्या सर्व परिक्षांची प्रवेशपत्र उपलब्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उन्हाळी सत्रात केवळ महाविद्यालय स्तरावर आयोजित केलेल्या प्रथम वर्ष बीबीए, बीबीए (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन), बीबीए (इंटरनॅशनल बिझनेस), बीसीए (वाणिज्य), बीसीए (विज्ञान) या अभ्यासक्रमांचे नियमित अथवा पुनर्परीक्षार्थींची एकत्रित परीक्षा प्रवेशपत्रे संबंधित महाविद्यालयांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिली आहेत.

या परीक्षा प्रवेशपत्रात काही त्रुटी, आवश्यक विषयांचा समावेश नसणे, नावातील दुरुस्ती, अतिरिक्त/कमी विषय, ॲड ऑन क्रेडिट विषयांचा समावेश नसणे, असे असल्यास त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती महाविद्यालयाने करावी, असा आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या छाननी व तालिनीकरण कक्षाने दिली आहे. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल हे दिलेल्या मुदतीत जाहीर करण्याच्या अनुषंगाने यानंतर कोणत्याही परिस्थितीत अंतर्गत गुण भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही.

# पालिकेच्या तिजोरीच्याच ‘चिंध्या’...!

### सेवानिवृत्तीच्या संध्याकाळी आयुक्तांची ‘अतीघाई’: कचऱ्यातील गाद्यांसाठी ६६ कोटी

गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ महापालिकेत प्रशासकराज कार्यरत आहे; त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारीही मनमानी कारभार करत असून चिरीमिरी नव्हे तर पैसा ओढण्यासाठी चक्क ‘जेसीबी’ चा वापर होत असल्याची खमंग चर्चा महापालिका आणि प्रशासकीय वर्तुळात सुरु आहे. त्यातूनच कोणताही प्रकल्प पुढे रेटण्यासाठी चढाओढ सुरु आहे; त्यातच महापालिकेचे सर्वेसर्वा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले हे शनिवारी (उद्या) सेवानिवृत्त होत आहेत; त्यामुळे त्यांनी सेवानिवृत्तीच्या सांयकाळी चक्क तिजोरीच्याच ‘चिंध्या’ केल्या आहेत. त्यासाठी मंजूर करण्यात येत असलेल्या प्रकल्पासाठी ‘अतीघाई’ करत आयोजित केलेल्या सभेत मंजूरी देण्यात आली आहे.



> आज हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला. दरम्यान नगरविकास विभागाचे इंटरनेट चालत नव्हते त्यामुळे प्रस्ताव उशिर दाखल झाला आहे, आयुक्तांनी हा प्रस्ताव बुधवारच्याच बैठकीत दाखल केला होता.
>
> **-योगिता भोसले**, नगरसचिव, पुणे महापालिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कचऱ्यातील चिंध्या, लेदर, गाद्यांवर प्रक्रिया करण्यासाठी रामटेकडी येथे ७५ टन क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. पंधरा वर्ष मुदतीसाठी ठेकेदार नियुक्त करणे आणि त्यासाठी ६६ कोटी ८ लाख ५३ हजार रुपयांचा खर्च करण्यास आज स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मात्र, आजची स्थायीची बैठक ही तहकूब सभा होती, त्यात नवीन विषय मंजूर करणे शक्य नव्हते. त्यामुळे कालची सभा तहबूक झाल्यानंतर हा प्रस्ताव स्थायी समितीला दाखल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या या अतिघाईबाबत संशय उपस्थित केला जात आहे.

पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. भोसले हे शनिवारी सेवानिवृत्त होत असून, त्यांच्या अध्यक्षतेखालची ही अखेरची बैठक पार पडली आहे. आज झालेली बैठक ही बुधवारी (ता. २८) होणार होती, पण आयुक्तांही ही बैठक ऐनवेळी तहबूक करून आज घेण्याचा निर्णय घेतला. तहबूक बैठकीत नवीन प्रस्ताव दाखल करता येत नाहीत. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत नगरसचिव कार्यालयात निविदांचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी अधिकाऱ्यांची धडपड सुरु होती. यामध्ये सर्वात मोठी निविदा ही घनकचरा विभागाच्या प्रकल्पाची होती.

घनकचरा विभागाने सूस रस्ता बाणेर येथे एका जागा निवडली होती. पण या ठिकाणी विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने रामटेकडी येथील महापालिकेचा भूखंड या प्रकल्पासाठी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

दरम्यान घनकचरा विभागाचा हा प्रस्ताव स्थायी समितीला दाखल व्हावा यासाठी बुधवारी आयुक्त कार्यालयात दाखल झाला, त्यानंतर आयुक्तांच्या मान्यतेनंतर तो नगरसचिव विभागात दाखल करणे आवश्यक होते. बुधवारची बैठक तहकूब झाल्यानंतर रात्री साडे ८.२० वाजता हा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे दाखल झाला आहे. त्यासाठी आयुक्त कार्यालय व नगरसचिव कार्यालयातील कर्मचारी रात्रीपर्यंत महापालिकेत होते.

मे. ग्रीन पृथ्वी सोल्यूशन एलएलपी पुणे या कंपनीला हे काम मिळाले असून, प्रकल्प उभारण्यासाठी १३ कोटी ३ लाख ७५ हजार रुपये दिले जाणार आहेत. तर त्यानंतर १५ वर्षात एकूण ६६ कोटी ८ लाख ५३ हजार ४४४ रुपये दिले जाणार आहे.

चिंध्या,होजिअरी, फर्निचर, लेदर, गाड्या यांची वाहतूक करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी ठेकेदार प्रतिटन तब्बल ६९० रुपये वाहतूक खर्च माहपालिका देणार आहे.

#### अजून जागेला मान्यता नाही

● घनकचरा विभागाने सूस रस्ता बाणेर येथे एका जागा निवडली होती. पण या ठिकाणी विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने रामटेकडी येथील एक एकर जागेत हा प्रकल्प सुरु करण्यासाठी जागा मिळावी यासाठी घनकचरा विभागाने आयुक्तांकडे प्रस्ताव सादर केला आहे. पण अजून त्यास मंजुरी मिळालेला नाही. या प्रकल्पाची जागाच मंजूर नसताना स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव आणण्यासाठी घाई का केली असा प्रश्न का केली असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## फडणवीसांकडून बौद्धिक दिवाळखोरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकीकडे ‘वायूसेना प्रमुखांच्या’ वक्तव्यातून ‘संरक्षण खात्याची वास्तवता’ समोर आल्याने, सत्ता पक्षाची पोलखोल झाली आहे. राहुल गांधी यांचे देशाप्रती काळजी दर्शवणारे प्रश्न योग्यच असल्याचे सिद्ध झाले असल्याने त्यांची भुमिका जागरुक व समंजस विरोधी पक्ष नेत्याची असल्याचे वेळोवेळी सिद्ध होत असुन देशभर प्रशंसा होत आहे. यामुळेच भाजप नेते बिथरल्याचेच् बघायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे देशातील विरोधी पक्षाचे नेत्यावर अश्लाघ्य व अतार्किक टिका करत फडणवीस आपल्या बौद्धिक दिवाळखोरी व विकृतीचेच प्रदर्शन करत असल्याची प्रखर टीका काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, खरेतर फडणवीसांना पीओके प्रमाणे प्रमाणे तुलनाच करायची असेल तर ती काँग्रेस नव्हे तर भाजप सोबतच चांगल्या पध्दतीने होऊ शकते. ‘पार्टी विथ डिफरन्स’ म्हणवणाऱ्या भाजप’ने भ्रष्टाचार मुक्त देशाची घोषणा करून एकीकडे ११ वर्षात ‘एकाही भ्रष्टाचारी नेत्यावर’ खटला चालवून, त्यास गजाआड टाकण्याचे काम केलेले नाही, तर उलटपक्षी ‘भ्रष्टाचार व्याप्त वा काँग्रेस व्याप्त भाजप’ करण्याचे पवित्र कार्य करून अनायसे काँग्रेस सह अन्य राजकीय पक्ष स्वच्छ करण्याचेच कार्य केले आहे.

देशाच्या “संरक्षण वा गृह खात्याची” जबाबदारी असलेले भाजप नेते, देशाच्या वा राज्याच्या सुरक्षा विषयक प्रश्नांवर वा आपल्या संविधानीक ऊत्तरदायीत्वावर चकार शब्द न बोलता वा स्वराजधर्माचे पालन न करता, जनतेने प्रश्न विचारण्यास निवडून दिलेल्या प्रतिनिधींवरच अश्लाघ्य आरोप करण्यात धन्यता मानत असून आपल्या ‘राजकीय नादानपणाचे व बेजबाबदारपणाचे’ प्रदर्शन करत असल्याचे प्रतिपादन काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केले.

देशाच्या विरोधी पक्ष नेत्यावर वा राष्ट्रीय प्रश्नांवर तारे तोडण्यापेक्षा, स्व-अखत्यारीतील व राज्यातील अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी काही करावे, एमएमआरडीच्या हजारो कोटी भ्रष्टाचाराकडे लक्ष केंद्रित करावे तसेच कायदा - सुव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करून बीड, परभणी, बदलापूर, पुणे जिल्हा इ मधील खुनांच्या तपास प्रकरणांना गती द्यावी, धुळे मंत्री महोदयांच्या स्वीय सहाय्यकांच्या खोलीत मिळालेल्या १॥ कोटी रकमे बाबत बोलावे, पोर्शे कार प्रकरणी, वाढत्या ड्रग्ज व सायबर गुन्हे प्रकरणी अधिक लक्ष केंद्रित करावे.

## नेहा महाजन यांना युवा सतारवादक पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ‘तो न गातो ऐकतो तो सूर आपला’ या ज्येष्ठ कवी चिं. त्र्यं. खानोलकरांच्या उक्तीप्रमाणे कलाकाराचा प्रवास आपल्या आतल्या स्वराचा आर्त आवाज ऐकत जनतेसाठी गाणारी गाणी जनार्दनापर्यंत पोहोचणारा असावा. अनुभव आणि अनुभूती यांचा मेळ घालत कलाकाराने साधना करावी, असे आवाहन सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते सुरेश रानडे यांनी केले.

अभिजात संगीताला प्रेरणा देणाऱ्या गानवर्धन संस्थेमार्फत कै. सुचेता नातू स्मृती युवा पुरस्काराने सतारवादक नेहा विदुर महाजन यांना आज (दि. २९) सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे वितरण सुरेश रानडे आणि जयश्री रानडे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी सुरेश रानडे बोलत होते. दहा हजार रुपये, शाल आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गानधर्वन संस्थेचे अध्यक्ष दयानंद घोटकर, डॉ. सदानंद मोरे, पीएनजीचे पराग गाडगीळ, ज्येष्ठ गायिका निर्मला गोगटे, राजश्री महाजनी मंचावर होते.



**पुणे** गानवर्धन आयोजित कै. सुचेता नातू स्मृती युवा पुरस्कार वितरण सोहळ्यात उपस्थित सुरेश रानडे, जयश्री रानडे, नेहा महाजन, डॉ. सदानंद मोरे, दयानंद घोटकर, पराग गाडगीळ, निर्मला गोगटे, राजश्री महाजनी.

# आत्मविश्वास कायम ठेवा, मोठी स्वप्ने पहा -श्री ठाणेदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "कोणत्याही परिस्थितीत आत्मविश्वास कायम ठेवा. खचून जाऊ नका. चुकांची पुनरावृत्ती टाळा. उत्तम तयारी करा आणि योग्य तेवढा धोका जरूर स्वीकारा", असा सल्ला ‘ही श्रींची इच्छा’ या गाजलेल्या आत्मचरित्राचे लेखक, यशस्वी मराठी उद्योजक, वैज्ञानिक आणि अमेरिकेतील यशस्वी राजकारणी आणि पहिले मराठी खासदार श्री ठाणेदार यांनी तरुणाईला दिला.

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, गर्जे मराठी ग्लोबल, पिंपरी-चिंचवड विद्यापीठ आणि रुरल आंत्रप्रिन्युअर कनेक्ट इनिशिएटिव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष सचिन ईटकर, कॉमसेन्स




टेक्नॉलॉजीज्‌चे अध्यक्ष सागर बाबर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, माधव दाबके, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. अमेरिकेतील प्रभावशाली व्यक्तीमत्व म्हणून परिचित असणारे ठाणेदार हे अमेरिकेच्या संसदेतील पहिले मराठी खासदार असून मिशिगन हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हचे सदस्य म्हणून कार्यरत होते. सध्या मिशिगनच्या १३व्या काँग्रेसनल जिल्ह्यातून प्रतिनिधी म्हणून ते कार्यरत आहेत.

श्री ठाणेदार यांच्या मनोगतातून उद्योग, व्यवसाय आणि भारत-अमेरिका यांच्यातील सध्याच्या संबंधातील काही मुद्द्यांवरही प्रकाश पडला. सचिन ईटकर यांच्या हस्ते श्री ठाणेदार यांचा ‘लिव्हिंग लिजंड ऑनर’ पुरस्कार देऊन विशेष सत्कार करण्यात आला. युवकांशी संवाद साधताना ठाणेदार यांनी स्वतःच्या जडणघडणीची माहिती दिली. सुरवातीच्या दोन नोकऱ्यांचा अनुभव, त्यानंतर उच्चशिक्षण, अमेरिकेतील विद्यापीठात पुढील शिक्षण आणि नंतर उद्योजक म्हणून अत्यंत यशस्वी कारकीर्द, मंदीच्या काळात बुडालेला व्यवसाय, शून्यातून पुन्हा केलेली सुरुवात आणि घेतलेली गरुडभरारी हा त्यांचा प्रवास उपस्थितांसाठी प्रेरणादायी होता.

> मी समाजसेवा करण्याच्या हेतूने राजकीय क्षेत्रात प्रवेश केला, निवडणूक लढवली. तिथेही सुरवातीला अपयश आले पण मी प्रयत्न सोडले नाहीत. तयारी करून पुन्हा प्रयत्न केल्यावर यशस्वी ठरलो आणि आता खासदार या भूमिकेतून लोकांसाठी काम करण्याचे समाधान अनुभवत आहे. तरुणाईने स्वतःवर सदैव विश्वास ठेवून, पुन्हा पुन्हा प्रयत्न केले पाहिजेत.
>
> **— श्री ठाणेदार**
> अमेरिकेतील यशस्वी मराठी उद्योजक



# 'एनडीए'च्या रणागंणात महिलांचीही 'भरारी'...!

**पुणे :** राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या (एनडीए) इतिहासात एक नवा अध्याय यंदा लिहिला गेला असून, प्रथमच महिला कॅडेट्सची तुकडी यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण करून दीक्षान्त समारंभात सहभागी झाली. हा क्षण संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

दीक्षान्त समारंभात एकूण ३३९ कॅडेट्स सहभागी झाले होते. यामध्ये बीएससी शाखेतील ८४, बीएससी कम्प्युटर सायन्सचे ८५, कला शाखेतील ५९ आणि बीटेक शाखेतील १११ विद्यार्थी सामील होते. विशेष बाब म्हणजे या यादीत १७ महिला कॅडेट्सचा समावेश होता, जे एनडीएच्या इतिहासात पहिल्यांदाच घडले.

दीक्षान्त सोहळ्याला एनडीएचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल गुरचरण सिंग, एअर व्हाइस मार्शल सिद्धार्थ बेदी आणि विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी दीक्षान्त समारंभात श्रिती दक्ष या महिला कॅडेटला कला शाखेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल सिल्व्हर मेडल प्रदान करण्यात आले. एनडीएच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे की एखाद्या महिला कॅडेटने हा सन्मान पटकावला आहे.

यावेळी दीनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. पूनम टंडन म्हणाल्या, "महिला कॅडेट्सनी दाखवलेल्या धैर्यामुळे आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. हे यश केवळ त्यांचे वैयक्तिक नाही, तर देशातील हजारो तरुणींसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे."

एनडीएतील कॅडेट उदयवीर सिंग नेगी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले, "माझ्या परिवारातील ही चौथी पिढी आहे जी संरक्षण विभागात सेवा करणार आहे. सुरुवातीला भावनिक अडचणी होत्या, पण त्याच भावना मी माझी ताकद बनवली आणि आज उत्तम कामगिरी करून उभा आहे.




## डॉ. अरुणा ढेरे आणि अनिल मेहता यांचा आज सन्मान

**पुणे :** 'प्रसाद प्रकाशना'तर्फे शनिवार दिनांक ३१ मे २०२५ रोजी संध्याकाळी ५.३० (साडेपाच) वाजता, एस. एम. जोशी सभागृह, गांजवे चौक,नवी पेठ, पुणे येथे पुरस्कार वितरण आणि ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला असून यावेळी ज्येष्ठ कवयित्री आणि माजी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे आणि ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ प्रा. प्र. के. घाणेकर आणि राष्ट्रीय पुस्तक न्यासचे विश्वस्त राजेश पांडे उपस्थित राहणार असून यावेळी 'हरवलेले पुणे' या विषयावर प्रा. प्र. के. घाणेकर यांचे व्याख्यान होणार आहे. यानिमित्त प्रसाद प्रकाशन आणि अनाहत प्रकाशनातर्फे विविध पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

## विविध कलांचा महोत्सव उद्यापासून

**पुणे :** मराठी रंगभूमीवर एकपात्री कलाप्रकार रुजवणाऱ्या पहिल्या पिढीतील जेष्ठ एकपात्री कलाकार मधुकर टिल्लू यांचे दिनांक १ जून २००० रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त एकपात्री कलाकार परिषदेतर्फे दरवर्षी एक जून हा दिवस एकपात्री कला प्रसार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी मधुकर टिल्लू यांच्या स्मृतीदिनाचे २५ वे वर्ष असून यानिमित्त एकपात्री कलाकार परिषद महाराष्ट्र व निळू फुले कला अकादमी तर्फे रविवार दिनांक १ जून ते बुधवार दिनांक ४ जून दरम्यान विविध कलाकारांच्या सादरीकरणाचा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष दीपक रेगे, सचिव पल्लवी परब भालेकर, सदस्य मंगेश चव्हाण आणि नरेंद्र लवाटे यांनी संस्थेच्या वतीने कळवली आहे.

सर्वांसाठी विनामूल्य खुल्या असलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन दिनांक १ जून रोजी संध्याकाळी ५.०० वाजता निळू फुले कला अकादमीच्या सभागृह,लोकमान्य नगर, शास्त्री रस्ता, पुणे येथे पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी डॉ. सतीश देसाई यांच्या 'आनंद यात्री ' या कार्यक्रमाचा काही भाग सादर होणार आहे. तसेच नुकत्याच घेण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धा आणि एकपात्री स्पर्धेचा पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. तसेच या वर्षीचा "आर्टिस्ट ऑफ द इयर" हा बहुमान मिळवणाऱ्या अंजली शहा यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## बाल वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळा आज

**पुणे :** ध उपक्रमांच्या माध्यमातून मुलांमध्ये मराठी भाषेची गोडी वाढवण्याचे काम करीत असलेल्या अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे २०२४ या वर्षातील बाल वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळा शनिवार दिनांक ३१ मे, रोजी महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति, शुक्रवार पेठ, पुणे येथे होणार आहे. आयोजित करण्यात आला आहे. यावेळी विविध वर्गवारीत पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ आणि बालसाहित्यिक डॉ. न. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध व्यंगचित्रकार चारुहास पंडित उपस्थित राहणार असून ज्येष्ठ लेखिका डॉ मंदा खांडगे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

# 'झाडाझडती'चा निकाल 'राम' भरोसे...!

### चौकशी अहवाल अद्याप गुलदस्त्यात: घोटाळ्याची 'रिंग' रोखणार का ?

गेल्या तीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत सर्वच आघाड्यांवर सावळा गोंधळ असल्याचे स्पष्ट झाले आहे; विशेष म्हणजे सर्वच ठेकेदारीत कोट्यावधी रुपयांचा घोटाळा होत असल्याने या भ्रष्टाचाराची चर्चा अगदी राज्य शासनापर्यंत गेली आहे. मात्र; प्रत्येकवेळी प्रशासकीय राजवटीला 'अभय'च मिळत आले आहे. त्यातूनच हा भ्रष्टाचार अधिकच बोकाळला आहे; झाडणकामाच्या निविदेत तर कोट्यावधी रुपयांची 'रिंग' झाल्याची बाब सर्वश्रुत आहे. त्यामुळेच मावळते आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या घोटाळयाची चौकशी करण्याचे आदेश दिले.



> या घोटाळयाच्या संदर्भात चौकशी होणे अपेक्षित होते, परंतु काही कारणास्तव त्याला उशीर झाला आहे. तरीही हा अहवाल लवकरात लवकर प्रशासनाला सादर करण्यात येणार आहे; त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
> **-पृथ्वीराज बी. पी.** अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील रस्ते झाडणकाम करण्याच्या निविदेत रिंग झाल्याचे समोर आल्याने या निविदा प्रक्रियेला अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी स्थगिती देऊन याची चौकशी सुरू केली आहे. पण त्या चौकशीचा अहवाल अद्याप त्यांनी आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे सादर केलेला नसल्याने पुढील कारवाई झालेली नाही. दरम्यान आयुक्त भोसले हे सेवानिवृत्त होणार असल्याने या वादग्रस्त निविदांचा 'निकाल' नवे आयुक्त नवल किशोर राम हेच लावणार असल्याची शक्यता आहे.



पुणे शहरातील रस्ते, गल्लीबोळ झाडण्यासाठी महापालिकेने १४ क्षेत्रीय कार्यालयांसाठी निविदा काढली, पण त्यामध्ये जुन्या नियम अटी बदलून नव्या जाचक नियम अटी टाकल्या, तसेच मनुष्यबळ पुरविण्याऐवजी चौरस मिटरनुसार ठेकेदारांनी स्वच्छता करावी. त्यासाठी प्रति चौरस मिटर वार्षिक ५९.४० रुपये इतका दर निश्‍चित केला. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठराविक ठेकेदारांच्या भल्यासाठी नियम अटी बदलल्या असल्याचे 'सकाळ'ने चव्हाट्यावर आणले. त्यामुळे ठेकेदार व अधिकाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली होती. या निविदा महापालिकेचे आर्थिक नुकसान करणार असल्याचेही समोर आले.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह माजी नगरसेवकांनीही या निविदांची चौकशी करण्याची मागणी केली. त्यानुसार पृथ्वीराज बी. पी. यांनी निविदा प्रक्रियेला स्थगिती देत दोन ते तीन दिवसांत चौकशीचा अहवाल आयुक्तांकडे सादर केला जाईल असे सांगितले होते, पण अद्यापही चौकशी अहवाल आयुक्तांकडे अहवाल सादर केला नाही. शुक्रवारी (ता. ३०) भोसले यांच्या कामाचा शेवटचा दिवस आहे, मात्र त्या दिवशी अहवाल सादर होण्याची शक्यता नसल्याने नवीन आयुक्तांच्या न्यायालयात या वादग्रस्त निविदांचा विषय जाणार आहे. दरम्यान, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी या निविदांची चौकशी अद्याप पूर्ण झाली नसल्याचे सांगितले.

# गजा मारणेला बिर्याणी पुरवणारा जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** तुरुंगात असलेल्या गुंड गजा मारणेसाठी बिर्याणी ऑर्डर करणाऱ्या एका तरुणाला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं बुधवारी कोथरुड इथून अटक केली. हा तरुण मारणे टोळीचा सदस्य असल्याचा पोलिसांना संशय आहे.या तरुणाला अटक केल्यानंतर त्यानं मारणेला कशी मदत केली याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. यावरुन गुंड मंडळी तुरुंगात पोलिसांच्या ताब्यात असतानाही कशी बाहेरुन सुत्र चालवतात याचा हा एक प्रकारे पुरावाच असल्याचं बोललं जात आहे.

विशाल धुमाळ (वय ४०) असं या आरोपीचं नाव आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने बुधवारी रात्री कोथरूड इथून त्याला अटक केली. त्यानं या वर्षीच्या सुरुवातीला येरवडा मध्यवर्ती कारागृहातून सांगली कारागृहात बदली करताना गुंड गजानन मारणेला मदत केल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या ताफ्याच्या प्रवासादरम्यान मारणे आणि त्याच्या साथीदारांसाठी बिर्याणीची पार्टी दिल्याचा आरोप धुमाळवर आहे.

पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ३ मार्च २०२५ रोजी गजा मारणेला येरवडा कारागृहातून सांगली कारागृहात हालवत असताना आरोपी धुमाळ हा पुणे-सातारा महामार्गावरील एका हॉटेलमध्ये आपल्या साथीदारांसह थांबला होता. या ठिकाणी त्यानं आपल्या सहकाऱ्यांसाठी मटण बिर्याणीची ऑर्डर दिली होती. त्याचबरोबर याच हॉटेलमधून त्यानं गजा मारणेसाठी देखील मटण बिर्याणी विकत घेतली आणि ती नंतर मारणेला पोलीस व्हॅनमधून नेत असताना पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आली आहे.

# 'दगडूशेठ' गणपती मंदिरात शेषनागाच्या प्रतिकृतीची आकर्षक पुष्पसजावट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेषात्मज गणेश जयंतीच्या निमित्ताने फुलांच्या शेषनागांच्या प्रतिकृतींची मंदिरात केलेली आकर्षक आरास आणि गाभा-यात विविधरंगी फुलांच्या शेषनागाच्या कलाकृतीमध्ये विराजमान लाडक्या गणरायाच्या चांदीच्या मूर्तीचे विलोभनीय रुप पहायला मिळाले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे शेषनागाच्या विविधरंगी फुलांच्या प्रतिकृती साकारुन ही सजावट करण्यात आली. याच दिवशी श्री गणेशाचा पाताळातील गणेश जयंती म्हणजेच शेषात्मज गणेश अवतार झाला होता.



गणेश जयंतीनिमित्त मंदिरात शुक्रवारी ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेक पार पडला. त्यानंतर पहाटे ४ वाजता पं. कैवल्य कुमार गुरव यांनी स्वराभिषेकातून गणरायाचरणी स्वरसेवा अर्पण केली. तसेच मंदिरात गणेश याग, सहस्त्रावर्तने, गणेशजाग देखील पार पडला.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, गाणपत्य संप्रदायात भाद्रपद आणि माघ मासाप्रमाणेच ज्येष्ठ चतुर्थीचा श्रीशेषात्मज जन्मोत्सव महत्वपूर्ण मानलेला आहे. भगवान ब्रह्मदेव सृष्टी रचनेच्या कार्यात असताना आपल्याच सृष्टीवर मोहित झाले. त्या मोहित अवस्थेत त्यांच्या नासिकेमधून एक बालक जन्माला आले. त्याच्याकडे पाहिल्यानंतर भगवान ब्रह्मदेव अधिकच मायायुक्त झाले. परिणामी आपल्या नव्या अपत्याला त्यांनी मायाकर असे नाव दिले. अनेकानेक वरदान देऊन त्याला परिपुष्ट केले. पुढे विप्रचित्ती नामक राक्षसाने या मायाकराला राक्षसांचा राजा केले. मायाकराने आपल्या अतुलनीय वरदानांच्या भरवशावर सगळी पृथ्वी आणि स्वर्ग लोक जिंकले. त्यानंतर त्याने पाताळावर आक्रमण केले. त्याच्या वरदानासमोर निष्प्रभ झालेल्या भगवान शेषांनी शेवटी भगवान गणेशांचे स्मरण केले.

श्रीशेष ध्यान करत असतांना त्यांच्या ध्यानातूनच भगवान श्री गणेश श्रीशेषात्मज रूपात ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीला माध्यान्ह समयी प्रकट झाले. याच अवतारात पुढे गजासुर नामक राक्षसाला मारण्यासाठी भगवान श्री गणेशांनी ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, देवी, सूर्य या पंचेश्वरांच्या शक्तिने युक्त असलेले मूषक हे वाहन त्यांना करायला सांगितले. या मूषकावर बसून श्री गणेशांनी गजासुर वध केल्यामुळे याच श्रीशेषात्मज अवताराला श्रीमूषकग असे पण नाव प्राप्त झाले.

# 'शिवसृष्टीत' घुमला 'जय भवानी; जय शिवाजी' चा नारा...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आशिया खंडातील सर्वांत भव्य ऐतिहासिक थीम पार्क असलेल्या आणि आंबेगाव ब्रुद्रुक येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीला मागील १५ दिवसांत तब्बल १५ हजारांहून अधिक शिवप्रेमींनी भेट दिली असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची महती सांगणारी शिवसृष्टी पाहून लहान थोर भारावल्याचे चित्र शिवसृष्टीमध्ये पहायला मिळत आहे.

सदर योजना सुरु झाल्यानंतर मागील पंधरा दिवसांत शिवसृष्टीला पंधरा हजारांहून अधिक शिवप्रेमींनी भेट दिली असल्याचे सांगत अनिल



पवार पुढे म्हणाले, "उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरु असल्याने वातानुकुलीन अशा शिवसृष्टीत लहान थोरांना शिवकाळाचा अनुभव घेता येईल. महाराजांचा इतिहास, त्यांचा संघर्ष, त्यांनी पाहिलेली स्वराज्याची स्वप्ने, त्यांची राज्यपद्धती, यांची दूरदृष्टी यांबद्दल येणाऱ्या पिढ्यांना माहिती व्हावी, या उद्देशाने आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य, स्वधर्म या विचारांचा प्रचार व प्रसार सर्वत्र झाला पाहिजे या प्रामाणिक हेतूने पुण्याजवळील आंबेगाव, ब्रुद्रुक, पुणे येथे तब्बल २१ एकर परिसरात उभारलेली शिवसृष्टी यानिमित्ताने जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे."

शिवसृष्टीला भेट देणाऱ्यांना दुर्गवैभव','रणांगण' ही दालने, महाराजांच्या आग्राहून सुटकेचा थरार उभा करणारे दालन, प्रत्यक्ष शिवराय आपल्याशी संवाद साधत असल्याचा अनुभव देणारे 'श्रीमंत योगी' हे दालन, राज्याभिषेकाचा देखावा असलेला 'सिंहासनाधिश्वर' हे दालन, महाराजांच्या काळात काढलेल्या व सध्या जगातील प्रसिद्ध संग्रहालयांमध्ये असलेल्या महाराजांच्या चित्रांच्या (पेंटिंग्ज) हाय रेझोल्युशन इमेजेसच्या प्रिंट्स, छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या लढायांची माहिती देणारे दालन, प्रतापगडावर असलेल्या तुळजा भवानी मातेच्या मंदिराची प्रतिकृती आणि गंगासागर तलाव आदींना भेट देत शिवकाळाचा प्रत्यक्ष अनुभवच घेता येणार आहे. शिवाय टाईम मशीन थिएटर हे शिवप्रेमींसाठी एक पर्वणी ठरत असून यामधील कालकुपीत बसून आपण सुमारे काही हजार वर्षे मागे जातो व तेथून शिवाजी महाराजांचा काळ दृक श्राव्य पद्धतीने अनुभविता येईल.

> शिवकालीन वैभवाची साक्ष देणारा सरकारवाडा, भवानी मातेचे मंदिर, यांबरोबरच इतिहासाचे वैभव दाखविणाऱ्या वास्तू, विविध प्रकारे कथा, गोष्टी, चित्रे, संग्रहालयातील वस्तू यांद्वारे शिवसृष्टीत शिवरायांचा काळ अवतरला आहे. विशेष म्हणजे ही अनुभूती घेण्यास इच्छुक असलेल्या शिवप्रेमींकडून येत्या १५ जुलै पर्यंतच्या मर्यादित कालावधीसाठी नाममात्र ५० रुपये प्रवेशशुल्क आकारले जात आहे.
> **-अनिल पवार**, प्रशासकीय अधिकारी, शिवसृष्टी.



## विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा कराड यांचा होणार सन्मान

**पुणे :** गेल्या चार दशकांहून अधिक काळ शिक्षण, तत्वज्ञान, अध्यात्म, जागतिक शांती, सांप्रदायिक सद्भाव, वैश्विक बंधुत्व आणि इतर क्षेत्रात अहोरात्र कार्य करणारे, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, यांना अमेरिकेतील विविध संस्थांतर्फे 'एंजल ऑफ वर्ल्ड पीस, हार्मोनी अँड इंटरफेथ डायलॉग' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती अमेरिकन युनिव्हर्सिटी ऑफ ग्लोबल पीसचे संस्थापक अध्यक्ष आणि मुख्य रेक्टर प्रो.डॉ. मधू कृष्णन यांनी दिली. विश्वशांतीसाठी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या समर्पित जीवनाची दखल घेत यूएसए येथील अकादमी ऑफ युनिव्हर्सल ग्लोबल पीस आणि अमेरिकन युनिव्हर्सिटी ऑफ ग्लोबल पीस यांच्या वतीने हा पुरस्कार २ जून रोजी दुपारी ४ वा. कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर सभागृहा मध्ये देण्यात येणार आहे. यूएसए येथील या संस्थेचे प्रतिनिधी स्वतः पुण्यात येऊन डॉ. विश्वनाथ कराड यांच्या सत्कार करणार आहेत.



जगन्नाथ जाधव अजय गजर

## बिल्डर्स असोसिएशनच्या प्रदेशाध्यक्षपदी जाधव

**पुणे :** बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या (बीएआय) महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी जगन्नाथ जाधव यांची, तर पुणे केंद्राच्या अध्यक्षपदी अजय गुजर यांची निवड करण्यात आली आहे. राज्य सचिवपदी मनोज देशमुख, राज्य कोषाध्यक्षपदी राजेंद्र गांधी, पुणे केंद्राच्या उपाध्यक्षपदी महेश मायदेव व राजाराम हजारे, सचिवपदी सी. एच. रतलानी, तर खजिनदारपदी महेश राठी यांची निवड झाली आहे. नुकत्याच झालेल्या असोसिएशनच्या वार्षिक बैठकीत २०२५-२०२६ या वर्षाकरिता कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

अखिल भारतीय स्तरावर पुणे केंद्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पदाधिकाऱ्यांसह व्यवस्थापकीय समिती आणि सर्वसाधारण परिषद सदस्यांचीही निवड करण्यात आली आहे. मावळते अध्यक्ष सुनील मते यांच्याकडून अजय गुजर यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. या निवडीबद्दल आनंद व्यक्त करून अजय गुजर म्हणाले की, 'बीएआय'चे जन्मस्थान असलेल्या पुणे केंद्राच्या अध्यक्षपदी निवड होणे ही आनंदाची गोष्ट आहे. येत्या वर्षात बांधकाम व्यवसायाशी संबंधित विविध घटकांसाठी उपक्रम, कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे, वेल बिल्ट स्ट्रक्चर स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा मानस आहे. 'बीएआय'ची स्थापना १९४१ मध्ये काही कंत्राटदारांनी तत्कालीन मुख्य अभियंता व सदर्न कमांडचे ब्रिगेडियर सी. व्ही. एस. जॅक्सन यांच्या मदतीने आणि मार्गदर्शनाने केली होती.

## पावसामुळे टंचाईला दिलासा; टँकरची मागणीही घटली

**पुणे :** शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पाण्याच्या तुटवड्याला काहीसा दिलासा मिळाला आहे. परिणामी, पाण्याची मागणी तसेच नागरिकांकडून होणाऱ्या तक्रारींच्या संख्येत लक्षणीय घट झाली असून, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला काहीसा दिलासा मिळाला आहे. मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांत शहरात तापमानात झपाट्याने वाढ झाली होती. प्रखर उन्हामुळे पाण्याची मागणी जवळपास २५ टक्क्यांनी वाढली होती. याच दरम्यान पाणीपुरवठा अपुरा होत असल्याने नागरिकांकडून महापालिकेकडे वारंवार तक्रारी येत होत्या. परिणामी, टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची गरज मोठ्या प्रमाणात वाढली होती. मात्र, गेल्या आठवड्यापासून शहरात झालेल्या पावसाने परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणला आहे. पाण्याची मागणी आता १५ टक्क्यांनी कमी झाली असून, टँकरच्या वापरातही घट झाली आहे. उपनगरांतील अनेक सोसायट्यांमध्ये यापूर्वी नियमितपणे टँकर मागवले जात होते. मात्र, पावसामुळे साठवलेले पाणी आणि कमी झालेली वापराची गरज यामुळे टँकरची मागणी घटली असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले.

# 'राधाकृष्ण' मध्ये पावसाची 'जलक्रिडा'...!

## केसनंदच्या राधाकृष्ण पार्कला तळ्याचे स्वरूप : प्लॉट धारकाकडून सुविधांची वाणवा





● केसनंद येथे राधाकृष्ण पार्कला आलेले तळ्याचे स्वरूप,व घरांसमोर साचलेले पाणी. हे पाणी साचून राहात असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्याचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे; त्यामुळे ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रशासनाने मध्यस्थी करावी अशी मागणी आता होउ लागली आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** केसनंद(ता.हवेली) येथील जोगेश्वरी विद्यालयाच्या बाजूला असलेल्या राधाकृष्ण पार्कमध्ये अनेक रहिवासी तीन वर्षापासून राहत असून प्लॉटिंग मध्ये संघवी डेव्हलपर्सने प्लॉटमधील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी शोष खड्डा खोदला असून सेफ्टी टँकची व्यवस्थित व्यवस्था न केल्यामुळे शोष खड्ड्यामधून नुकत्याच झालेल्या पावसामुळे पाणी ओसंडून वाहत आहे.संपूर्ण पार्कमध्ये शोष खड्ड्यातून आलेल्या पावसाच्या व ड्रेनेज लाईनच्या खराब पाण्यामुळे पार्क मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाने याठिकाणी अक्षरशः 'जलक्रिडा'चा अनुभव येत आहे.

सेफ्टी टँकसाठी पुरेसा खड्डा न खोदल्यामुळे संपूर्ण पावसाचे व ड्रेनेजचे पाणी एकत्रितपणे परिसरातील नागरिकांच्या घरांमध्ये शिरले आहे या पाण्यामधून साप बेडूक यांच्याबरोबर झुरळ व तत्सम प्राणी घरामध्ये शिरत असून मच्छर व इतर किटकांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.परिसरामध्ये असणाऱ्या विहिरीमध्ये ड्रेनेज लाईन आणि पावसाचे पाणी जाऊन विहिरी प्रदूषित झाले आहेत.

या पार्क मधील रहिवाशांनी या संदर्भात अनेक वेळा प्लॉट डेव्हलपर्स मालक संघवी यांच्याशी संपर्क साधला असता डेव्हलपर्स कडून प्लॉट धारकांची मागणी धुडकवण्यात आली आहे.संघवी डेव्हलपर्स यांनी प्लॉट विक्री करताना ग्राहकांना स्ट्रीट लाईट, पिण्याचे पाणी, ड्रेनेज लाईन,बाग बगीच्या अशी अनेक आश्वासने दिली असून ती अजून पूर्ण न झाल्यामुळे तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी सेफ्टी टँकची व्यवस्था न केल्यास राधाकृष्ण पार्क मधील रहिवाशांकडून आत्मदहनाचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात या प्लॉट डेव्हलपर्सचे मालक संजय संघवी यांच्याशी प्रतिक्रिया घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.



पुर्व हवेली तालुक्यातील अनेक गावांमध्ये नैसर्गिक तळे, ओढे, नाले बुजवले आहेत आणि त्यावर अनाधिकृत बांधकामे प्लाटींग केले आहे. काही अनाधिकृत बांधकामे सुद्धा नैसर्गिक ओढे बुजवून अधिकृत केली आहेत. अनाधिकृत प्लॉटींग मध्ये कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाहीत.

**-चंद्रकांत वारघडे पाटील,**
अध्यक्ष माहिती सेवा समिती

# एमआयटी युनिव्हर्सिटीतर्फे परिषद

## 'कम्युनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ अँण्ड डेव्हलपमेंट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशातली व्यावसायिकतेची परंपरा समाजातल्या काही घटकांपुरती मर्यादित न राहता इतर अपारंपारिक समाज घटकांपर्यंत पोहोचावी. शेती प्रधान देश उद्योजकता प्रधान व्हावा आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रित यावे. तसेच उद्योजकता, आर्थिक स्वातंत्र्य, स्टार्टअप व नवनवीन कल्पनेला प्रोत्साहन देण्याचा मुख्य उद्देश ठेवून एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्यावतीने दोन दिवसीय 'कम्युनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ अँण्ड डेव्हलपमेंट' या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद ३१ मे व १ जून रोजी नाशिक येथील हॉटेल शेरेटन मध्ये संपन्न होईल. अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र-कुलगुरू डॉ.मिलिंद पांडे आणि एमआयटी स्कूल ऑफ बिझनेसचे सहअधिष्ठाता प्रा.डॉ. गौतम बापट यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'कम्युनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ अँण्ड डेव्हलपमेंट' या परिषदेचा उद्घाटन सोहळा ३१ मे रोजी दुपारी २.३० वा. होणार आहे. यावेळी कोल्हापूर येथील महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.




अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड हे असतील.

तसेच, बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक डॉ. हणमंतराव आर. गायकवाड, चितळे ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक गिरीश चितळे, इंन्फोटेक सॉफ्टवेअर अँड सिस्टमचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अशिम पाटील व तौराल इंडिया प्रा.लि.चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गिते हे उपस्थित राहतील.

या परिषदेत विनजीत टेक्नॉलॉजी प्रा.लि.चे सह संस्थापक अश्विन कंडोई, नाशिक येथील सह्याद्री फर्मचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे, आर्मस्ट्राँग डेमॅटिकचे चेअरमन विनीत माजगावकर, एएमटी ग्रुप कंपनिजचे संचालक चेतन सावंत, थॉयोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलूमणी, टु ब्रदर्स ऑर्गेनिक फॉर्मचे संस्थापक अजिंक्य हांगे आणि सत्यजीत हांगे, थर्मोकॉल मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळख असणारे माने ग्रुपचे संस्थापक रामदास माने, नाशिक येथील वेदमुथा इंडिस्ट्रीज लि.चे व्यवस्थापकीय संचालक अजय वेदमुथा, टिमस लाईफ स्टाइलचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित तिवारी, स्लाइडवेल मेल्यूअर टेक प्रा.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अंबर प्रधान, निर्मिती प्रोमॅक कन्स्लटन्स प्रा.लि.चे व्यवस्थापकीय संचालक राहुल वैद्य हे आपली यशस्वी गाथा मांडतील.

## दिपक मानकर यांचा मुलगा, व्याह्यावर गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तत्कालीन शहराध्यक्ष दीपक मानकर यांच्याविरोधात दोन आठवड्यांपूर्वी समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. बनावट दस्त तयार करून तो खरा असल्याचे भासवून सादर केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

त्यानंतर आता त्यांचा मुलगा करण मानकर आणि व्याही सुखेन सुरेशचंद्र शहा यांच्यावरही समर्थ पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी, समर्थ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक उमेश गित्ते यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका गुन्ह्यात शंतनू सॅम्यूअल कुकडे, सुखेन सुरेशचंद्र शहा, रौनक भरत जैन आणि इतर, तर दुसऱ्या गुन्ह्यात शंतनु सॅम्युअल कुकडे, करण दीपक मानकर आणि इतरांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विदेशी तरुणीला आश्रय देण्याच्या बहाण्याने तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी शंतनू कुकडे याच्यावर गुन्हा दाखल आहे. आतापर्यंत कुकडे याच्यावर समर्थ पोलिस ठाण्यात पाच गुन्हे दाखल आहेत. त्याच्या बँक खात्यात तब्बल १०० कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते. कुकडेच्या बँक खात्यातून मानकर पिता-पुत्रांच्या बँक खात्यात तब्बल पावणेदोन कोटी रुपये वर्ग झाले होते, तर करण याचा सासरा सुखेन शहा याच्या बँक खात्यात तब्बल सहा कोटी ५२ लाख वर्ग झाले आहेत. त्याअनुषंगाने पुणे पोलिसांची चौकशी सुरू होती. दीपक मानकर यांनी कुकडेसोबत जमीन खरेदीच्या अनुषंगाने आर्थिक व्यवहार झाले नसल्याचे सांगत कागदपत्रे सादर केली होती. पोलिसांनी कागदपत्रांची सत्यता तपासली असता, संबंधित कागदपत्रे बनावट असल्याचे आढळून आले. दीपक मानकर यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. दरम्यान, बलात्कारातील आरोपी शंतनू कुकडेसोबतचे असलेले आर्थिक व्यवहार लपवल्याप्रकरणी आणि पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी हे गुन्हे दाखल केल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, गुरुवारी (दि. २९) दाखल झालेल्या गुन्ह्यात करण मानकर याने जबाबात, आपण डोणजे येथे २०२४ मध्ये दुग्ध व्यवसाय सुरू करणार होतो. तेव्हा शंतनू कुकडे हा पाच कोटी रुपये कर्ज स्वरूपात मदत देणार होता. हे कर्ज ४० वर्षांसाठी देण्यात येणार होते. त्यासाठी करारनामा दोघांच्या संमतीने केला असून, त्यातील ५० लाख कुकडेने वर्ग केल्याचे सांगितले होते.

# पोषक वातावरणामुळेच क्रीडा क्षेत्रात भरभराट- दत्तात्रय भरणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "फिटनेस फॉर ऑल ,खेलो इंडिया गेम्स यासारख्या चांगल्या व दूरगामी योजनांमुळेच आपल्या देशात गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये क्रीडा क्षेत्रासाठी सकारात्मक व पोषक वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळेच क्रीडा क्षेत्रात देशाची भरभराट झाली आहे" असे राज्याचे क्रीडा व युवक मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी सांगितले.

क्रीडा भारती संस्थेतर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमक दाखविणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा जिजामाता पुरस्काराने क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे व तेनसिंग नोर्गे सन्मानित गिर्यारोहक व संघटक उमेश झिरपे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी क्रीडा भारती संस्थेचे अखिल भारतीय महामंत्री राज चौधरी व पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय पुरंदरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



क्रीडा भारती संस्थेतर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमक दाखविणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा जिजामाता पुरस्काराने क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे व तेनसिंग नोर्गे सन्मानित गिर्यारोहक व संघटक उमेश झिरपे यांच्या हस्ते करण्यात आला.

यंदाच्या जिजामाता पुरस्कार विजेत्यांमध्ये कुस्तीगीर अमोल बराटे याची आई श्रीमती चंदा, कबड्डीपटू आम्रपाली गलांडे यांची आई सुरेखा,वुशूपटू कल्याणी जोशी हिची आई अनुराधा, बुद्धिबळपटू आदित्य सामंत याची आई संध्या, स्केटिंगपटू श्रुतिका सरोदे हिची आई रंजना, मॉडर्न पेन्टथलॉन खेळाडू विराज परदेशी याची आई बेला, ॲथलेटिक्स खेळाडू यमुना लडकत हिची आई सुनंदा, एव्हरेस्टवीर भूषण हर्षे याची आई भाग्यश्री, योगासनपटू नितीन पवळे याची आई जयश्री, प्रस्तारोहण खेळाडू सानिया शेख हिची आई निगर, तायक्वांदोपटू कोमल घारे सुरेखा,अश्व रोहन खेळाडू आशिष लिमये याची आई डॉक्टर विमला, यांचा समावेश होता. याच कार्यक्रमामध्ये युवा खेळाडू सान्वी गोसावी (टेनिस),सिद्धी जाधव (टेनिक्वाईट),आरूष जोशी (क्रिकेट), कार्तिकी राक्षे (बॉलबॅडमिंटन),आदित्य गाडे (ॲथलेटिक्स), गार्गी भट (योगासन) यांचा सत्कार करण्यात आला. राज चौधरी यांनी जिजाऊंचे कर्तृत्व आणि खेळाडूंच्या मातांचा जिजामाता सन्मान पुरस्काराने गौरव यामागील भूमिका विषद केली.

क्रीडा भारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व संघटक शरदराव गोडसे यांना क्रीडा भारती जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर राज्य शासनाचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या क्रीडा भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या श्रीमती शकुंतला खटावकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. .प्रा.शैलेश आपटे यांनी प्रास्ताविक केले तर विजय राजपूत यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनुजा दाभाडे,जयसिंग जगताप, मनाली देव यांनी केले.

# पंडित सी. आर. व्यास भारतीय शास्त्रीय संगीतातील 'चिंतामणी रत्न'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पंडित सी. आर. व्यास यांचे सुरांशी अनोखे नाते होते. गाण्यातील सातत्य, रियाज संगीताला प्रवाहित ठेवते या विचारांनी पंडित व्यास यांनी आपल्या सर्व शिष्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या गायन साधनेला आध्यात्मिक बैठक होती. क्षमाशिलता ही त्यांची मोठी ताकद होती. ते संन्यस्त गृहस्थ होते. त्यांना भारतीय शास्त्रीय संगीताप्रती विलक्षण ओढ होती. भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रांतात ते चिंतामणी रत्नच होते, अशा शब्दांत पंडित सी. आर. व्यास यांचा सांगीतिक जीवनपट उलगडला.



निमित्त होते ग्रेस फाऊंडेशनचे प्रमुख शशी व्यास आणि श्रुती पंडित लिखित 'चिंतामणी : एक चिरंतन चिंतन'या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे. पॉप्युलर प्रकाशनतर्फे या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शशी व्यास, श्रुती पंडित, पंडित सुहास व्यास, मोनिका गजेंद्रगडकर, अपर्णा केळकर यांनी पंडित सी. आर. व्यास यांच्याविषयी भावना व्यक्त केल्या. पॉप्युलर प्रकाशनच्या अस्मिता मोहिते यांनी संवाद साधला. पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे.

या दिग्गज कलाकाराच्या जीवनप्रवास उलगडणाऱ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणे माझ्यासाठी आनंददायक असले तरी ही एक धाडसी जबाबदारी होती, असे सांगून मोनिका गजेंद्रगडकर म्हणाल्या प्रस्तावना लिखाणातून मी माझाच शोध घेत गेले. पुस्तकाची रचना ललित अंगाने जाणारी असून चरित्ररूपात न बसणारे, संवाद स्वरूपातील वाचनिय पुस्तक संगीतप्रेमींसाठी उपलब्ध झाले आहे. पंडित सी. आर. व्यास यांची गायकी घराण्याच्या पलिकडे जाणारी आणि आध्यात्मिक अधिष्ठान असणारी होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस अपर्णा केळकर यांची गायन मैफल रंगली. गुरू पंडित सी. आर. व्यास रचित 'चतुर तुम हो प्राणप्रिया' या बंदिशीने त्यांनी मैफलीची सांगता केली. सुरेल, सुमधूर व संयत गायनाने रसिकांना अनोखी सांगीतिक पर्वणी मिळाली. त्यांना कौशिक केळकर (तबला), अमेय बिचू (संवादिन), श्रुती डोरले, श्रावणी अत्रे (तानपुरा) यांनी साथसंगत केली. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ पुत्र जयंत जोशी, डॉ. विकास कशाळकर, शीला देशपांडे, डॉ. शुभांगी बहुलीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चारुश्री वझे यांनी केले.



वडिलांनी आपल्याला कायमच इतर शिष्यांप्रमाणेच गुरूच्या भूमीकेतून संगीताचे ज्ञान दिले. संगीताच्या रियाजाविषयी ते कायम आग्रही होते. 'सा'ची साधना धनाच्या अपेक्षेशिवाय करा ही बाबांची शिकवण होती.

**-पंडित सुहास व्यास,**
पंडित सी. आर. व्यास यांचे ज्येष्ठ सुपुत्र

# श्रीमंगलमूर्तींच्या ज्येष्ठी यात्रेस भव्य प्रारंभ

## चिंचवड येथून नारंगी कडे प्रस्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चिंचवड :- चिंचवड येथील श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज प्राप्त श्रीमंगलमूर्तीची ज्येष्ठी यात्रा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात प्रारंभ झाली. यंदाही मोठ्या भक्तसमुदायाच्या उपस्थितीत तिचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा आज ३१ मे रोजी चिंचवड येथे परतणार आहे. यावर्षीही, चिंचवड येथील श्री मंगलमूर्ती वाडा येथून ज्येष्ठी यात्रेस भव्य सुरुवात झाली. यावेळी देवस्थानचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, तसेच विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप उपस्थित होते.

### श्री गणेश व हनुमान मंदिरात श्रींचा मुक्काम

- मंगलमूर्तींच्या ज्येष्ठ यात्रेचे श्रीक्षेत्र नारंगी येथे आगमन झाले, त्यावेळी नारंगी गावातील समस्त ग्रामस्त यांनी श्रींची मिरवणूक काढली, याच्या मध्यभागी श्री मंदार महाराज देव यांनी महासाधू श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्ती गळ्यात धारण केले होते. त्यांच्या पुढे सर्व गावकऱ्यांनी भजने म्हणत श्रींची गावातून प्रदक्षिणा केली. ठिकठिकाणी सुवासिनींनी श्रींना ओवाळले, त्यावेळी गावात उत्साहाचे व धार्मिक वातावरण होते. महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांनी स्थापन केलेल्या श्री गणेश व हनुमान मंदिरात श्रींचा मुक्काम असणार आहे. आज ३१ मे रोजी पारंपरिक धुपारतीने चिंचवड येथे यात्रेचा समारोप होईल.

- सोहळ्यात हजारो भक्तांनी सहभागी होत श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्तीचे दर्शन घेतले.
- श्री मंगलमूर्तींचे रायगड जिल्ह्यातील श्री क्षेत्र नारंगी येथे श्री मोरया गोसावी महाराज यांनी प्रतिष्ठापित केलेले श्री गणेश व हनुमान मंदिर आहे.
- या ठिकाणी जेष्ठ महिन्यात यात्रेसाठी चिंचवड येथून मंगलमूर्ती जातात अशी परंपरा आहे.



## २ जूनपासून तीन दिवसीय मधुश्री व्याख्यानमाला

**पिंपरी :** मधुश्री कला आविष्कार आणि दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय मधुश्री व्याख्यानमालेचा प्रारंभ सोमवार, दिनांक ०२ जून २०२५ रोजी होणार आहे. स्वर्गीय दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था सभागृह, प्लॉट क्रमांक ५१३, पेठ क्रमांक २७, संत तुकाराममहाराज उद्यानासमोर, प्राधिकरण, निगडी येथे दररोज सायंकाळी ठीक ०६:३० वाजता व्याख्यानाला सुरवात होईल. पंधराव्या वर्षात पदार्पण करीत असलेल्या मधुश्री व्याख्यानमालेत सोमवार, दिनांक २ जून रोजी डॉ. मानसी हराळे 'आरोग्यम् धनसंपदा' या विषयावर प्रथम पुष्पाची गुंफण करतील. पिंपरी - चिंचवड व्याख्यानमाला प्रमुख समन्वयक सुहास पोफळे यांची अध्यक्ष आणि माजी उपमहापौर शैलजा मोरे प्रमुख पाहुण्या म्हणून यावेळी उपस्थिती राहील. मंगळवार, दिनांक ०३ जून रोजी प्रा. दिगंबर ढोकले 'लाखात एक व्यक्तिमत्त्व' या विषयावर द्वितीय पुष्प गुंफतील. ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र घावटे अध्यक्षस्थान भूषविणार असून माजी नगरसेविका शर्मिला बाबर प्रमुख पाहुण्या आहेत. व्याख्यानमालेचे अंतिम पुष्प निवृत्त पोलीस अधिकारी अविनाश मोकाशी 'गुन्हेगारीचे बदलते स्वरूप आणि कायदे' या विषयाच्या माध्यमातून गुंफणार आहेत. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ गोलांडे अध्यक्षस्थानी असतील तर दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक संस्थेचे सचिव मिलिंद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहील.

व्याख्यानापूर्वी, दररोज सायंकाळी ६ ते ६:३० या वेळेत श्रोत्यांसाठी चहापानाची व्यवस्था करण्यात येणार असून निःशुल्क असलेल्या या व्याख्यानमालेचा नागरिकांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन मधुश्री कला आविष्कार या संस्थेच्या अध्यक्षा माधुरी ओक यांनी केले आहे.

## 'कष्टाशिवाय ध्येय साध्य होत नाही!' - अतुल शेटे



**पिंपरी :** 'कष्टाशिवाय ध्येय साध्य होत नाही!' असा कानमंत्र संत तुकारामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल शेटे यांनी सोहम् सार्वजनिक ग्रंथालय आणि अभ्यासिका, संत तुकारामनगर, पिंपरी येथे गुरुवारी स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना दिला. ग्रंथालयाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सामाजिक कार्यकर्ते देवदत्त लांडे, महेंद्र बाविस्कर, नीलेश अष्टेकर, सचिन अहिरराव आणि सोहम् सार्वजनिक ग्रंथालयाचे संस्थापक - अध्यक्ष जगन्नाथ नेरकर यांची विशेष उपस्थिती होती.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. अतुल शेटे यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून अहिल्यादेवी होळकर यांच्या देदीप्यमान कारकिर्दीविषयी माहिती देऊन स्पर्धा परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या तयारीबद्दल वेगवेगळ्या टीप्स देताना, 'आईवडील तुम्हाला मोठ्या कष्टाने पैसे पाठवीत असतात. त्याचा योग्य तो विनियोग करा, अभ्यासात सातत्य ठेवा, कष्टाशिवाय काहीही साध्य होत नाही हे लक्षात ठेवून शॉर्टकट निवडू नका, यश तुमचेच आहे!' असे प्रतिपादन केले. उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छापर मनोगतातून विद्यार्थ्यांशी हितगुज केले. जगन्नाथ नेरकर यांनी प्रास्ताविकातून स्पर्धा परीक्षांची आत्मविश्वासपूर्वक तयारी करता येईल, इतपत ग्रंथालय समृद्ध असल्याने त्याचा पुरेपूर वापर करावा, असे आवाहन केले. नंदू कदम यांनी सूत्रसंचालन केले. मंगेश घाडगे यांनी आभार मानले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी जन्मोत्सव

## तृतीयपंथीयांचा विशेष सत्कार



"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे आजही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी त्यांनी जे कार्य केले, ते समाजाला नवी दिशा देणारे आहे. अशा कार्यक्रमांमुळे त्यांच्या विचारांचा प्रसार होतो आणि महिलांना सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहन मिळते."

**-शत्रुघ्न (बापू) काटे,** भाजपा शहराध्यक्ष

"या सन्मानामुळे त्यांना पुढील कार्यासाठी अधिक प्रेरणा मिळाली आहे. समाजाकडून मिळणारा हा आदर त्यांना अधिक जोमाने काम करण्यास प्रोत्साहन देईल.

**-डॉ. आम्रपाली मोहिते**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**काळेवाडी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त गुरुवारी, आरंभ लॉन्स, काळेवाडी येथे भव्य महिला मेळावा उत्साहात संपन्न झाला. भाजपा पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) महिला मोर्चा यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला नागरिक, विशेषतः महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. या मेळाव्यात सुप्रसिद्ध व्याख्याते, लेखक आणि कीर्तनकार प्रा. दिगंबर ढोकळे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या लोककल्याणकारी प्रशासनावर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांचे ओजस्वी विचार ऐकून उपस्थित भारावून गेले.

याप्रसंगी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार महेशदादा लांडगे, उमाताई खापरे, अमित गोरखे, भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे "तृतीयपंथीयांच्या परिसरातील काम करणाऱ्या तृतीयपंथीयांचा विशेष सत्कार" करण्यात आला. या सत्काराने कार्यक्रमाला एक वेगळी उंची प्राप्त झाली. यावेळी तृतीयपंथी सप्तरंगी आई डॉ. आम्रपाली मोहिते यांच्या अतुलनीय सामाजिक कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. डॉ. मोहिते यांनी समाजाच्या दुर्बळ घटकांसाठी केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

डॉ. आम्रपाली मोहिते या एक तृतीयपंथी सप्तरंगी आई म्हणून ओळखल्या जातात आणि त्यांनी समाजाच्या दुर्बळ व वंचित घटकांसाठी आपले जीवन समर्पित केले आहे. पुण्यात सिग्नलवर भिक्षा मागणाऱ्या मुलांसाठी त्या सहा ठिकाणी फूटपाथ शाळा चालवतात, तसेच आतापर्यंत १३७ हून अधिक मुलांची फी भरून त्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले आहे. बेघर गरजू मुलांसाठी दररोज ५० लिटर दुधाचे वाटप, ससून रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी अन्नछत्र, रस्त्यावरील बेघर लोकांना वैद्यकीय उपचार मिळवून देणे आणि १५९ हून अधिक गरजू लोकांना व्यवसाय सुरू करण्यास मदत करणे हे त्यांचे प्रमुख कार्य आहे. याशिवाय, तृतीयपंथी आणि देहविक्री करणाऱ्या महिलांच्या आरोग्य, शिक्षण, आर्थिक व सामाजिक विकासासाठी त्या झटतात. दिव्यांग बांधवांना कुबड्या, व्हीलचेअर, कृत्रिम अवयव व रोजगार मिळवून देणे, निराधार ज्येष्ठांची काळजी घेणे, व्यसनमुक्ती, महिला व युवा सक्षमीकरण, एचआयव्ही बाधित रुग्णांना सहाय्य आणि मासिकपाळीविषयी जनजागृती करून मोफत सॅनिटरी पॅड वाटप करणे असे विविध समाजोपयोगी उपक्रम त्या राबवतात.

# ४० लाखांचे १३७ मोबाईल मूळ मालकांना परत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- चिंचवड :** वाकड पोलिसांनी गहाळ आणि चोरी झालेले ४० लाखांचे १३७ मोबाईल मूळ मालकांना परत केले आहेत. वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गहाळ आणि चोरी झालेले मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर करून संबंधित व्यक्तींना कायद्याचा धाक दाखवून परत मिळवले आहेत. ही कामगिरी वाकड पोलिसांनी केली आहे. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांच्या हस्ते मूळ मालकांना मोबाईल परत देण्यात आले. एकदा गहाळ आणि चोरी गेलेला मोबाईल परत मिळणं अवघडच आहे. पण, पोलिसांनी मनावर घेतल्यास अशा पद्धतीने ही मोबाईल मिळू शकतात हे त्याचं उदाहरण आहे. अनेकदा बाजारात, शतपावली करत असताना, बस प्रवास करत असताना, गर्दीच्या ठिकाणी चोरटे संधी साधून मोबाईल लंपास करतात. कधी स्वतः कडून मोबाईल गहाळ होतो. अशा वेळी केवळ आपण पोलिसात तक्रार देऊ शकतो.

वाकड पोलिसांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल ट्रेस केले. १३७ पैकी अनेक मोबाईल हे कर्नाटक, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश ट्रेस झाले. संबंधित व्यक्तीशी पोलिसांनी संपर्क करून कायद्याचा धाक दाखवून त्या- त्या राज्यात जाऊन हे मोबाईल जप्त केले आहेत. काहींनी हे मोबाईल कुरिअर देखील केले आहेत. वाकड पोलिसांनी १३७ मोबाईल मूळ मालकांना परत केल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

### नागरिकांकडून आभार

- आमचा मोबाईल परत मिळेल अशी आशा नव्हती. पण पोलिसांनी अशक्य गोष्ट शक्य करून दाखवल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले आहेत. ही कामगिरी पोलीस निरीक्षक पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली गायकवाड यांच्या पथकाने केली आहे.

## 'पदपथाच्या कामाची चौकशी करा'



**वाकड :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने शहर सुशोभीकरणाअंतर्गत पुनावळे ते भोंडवे कॉर्नर भागात नुकत्याच बसविण्यात आलेल्या पदपथाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना पक्षाच्या युवा सेनेने महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे केली आहे. युवा सेना, चिंचवड विधानसभा युवा उपअधिकारी सागर शिंदे यांनी याबाबत निवेदन दिले आहे. पदपथ बसवून काही महिने उलटत नाही. तोच जागोजागी पदपथ उखडले आहेत. त्यामुळे जनतेचे लाखो रुपये वाया गेले आहेत. ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केले आहे, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

## तलवारीने केक कापल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**पिंपरी :** वाढदिवसाच्या सेलिब्रेशनला दहशतीचे स्वरूप देत तलवारीने केक कापण्याचा प्रकार काही तरुणांना चांगलाच महागात पडला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडीओच्या आधारे पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने तात्काळ कारवाई करत सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना सोमवारी आळंदी परिसरात घडली. राकेश विजय सोळंकी (21), अभिषेक बाजीराव नागरगोजे (20), विश्वजित नीलकंठ अंभोरे (19, रा. आळंदी) आणि त्यांच्या अन्य साथीदारांनी वाढदिवसाच्या कार्यक्रमात तलवार वापरून केक कापला. याचा व्हिडीओ त्यांनी स्वतःच सोशल मीडियावर अपलोड केला. केक कापताना त्या ठिकाणी मोठा गोंधळ, जयघोष आणि शस्त्राचे उघड प्रदर्शन करत समाजात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला.

# जिल्हाधिकाऱ्यांनी दिली मावळच्या सर्वांगीण विकासाला गती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव मावळ :** :- मावळ तालुक्यातील विविध प्रलंबित विकासकामांचा आढावा घेण्यासाठी (गुरुवारी) जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या दालनात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीत तालुक्यातील नागरी व सामाजिक प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. बैठकीत भांगरवाडी येथील पूल प्रकल्प, अनुकंपा तत्वावरील नोकऱ्या, भाजी मंडईचे काम, घरकुल योजना, मागासवर्गीय मुलींसाठी वसतीगृह, आदिवासी विद्यार्थ्यांचे वसतीगृह तसेच अभ्यासिकेच्या प्रकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या सर्व कामांमध्ये अडथळा येत असल्याने



त्यावर उपाययोजना सुचवण्यात आल्या. जिल्हाधिकारी डुडी यांनी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांना कामांची प्रगती निश्चित वेळेत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. प्रशासनातील विलंब, निधी वितरणातील अडचणी आणि भूसंपादन प्रक्रियेतील समस्या दूर करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीला विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये प्रशासन अधिकारी व्यंकटेश दुर्वास, सहाय्यक संचालक अभिजीत केतकर, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार, भूसंपादन अधिकारी विजय फुलपगारे यांच्यासह तळेगाव, वडगाव, देहू आणि लोणावळा येथील मुख्याधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते.

तालुक्यातील नागरिकांच्या दीर्घकालीन अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून ही बैठक अत्यंत फलदायी ठरली असून येत्या काळात मावळच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक पावले उचलली जातील, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

# फुटपाथचे काम निकृष्ट दर्जाचे; ठेकेदारावर कारवाई कधी ?

**पुनावळे :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहर सुशोभीकरणाच्या नावाखाली पुनावळे ते भोंडवे कॉर्नर या भागात नवीन फुटपाथ बनविण्याचे काम करण्यात आले आहे. या कामात ठेकेदाराने फुटपाथचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे. या कामाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी युवासेना, चिंचवड विधानसभा युवा उपअधिकारी सागर एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

सागर शिंदे यांनी यासंदर्भात पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पिंपरी



चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहर सुशोभीकरणाच्या नावाखाली पुनावळे ते भोंडवे कॉर्नर रावेत या भागात नवीन फुटपाथ बनविण्याचे काम करण्यात आले आहे. या कामात ठेकेदाराने फुटपाथचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे. ठिकठिकाणी नवीन बनवलेले फुटपाथ आताच उखाडले असून, जे ब्लॉक बसवले आहेत तेही सरळ व निट बसवले गेले नाहीत.

# समाजात योगदान देणाऱ्या महिलांचा १ जून रोजी सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशाल जनसेवेच्या स्मरणार्थ, सखी सोबती फाउंडेशनच्यावतीने "अहिल्या पुरस्कार २०२५" गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १ जून २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे पुणे जिल्ह्यातील समाजसेवा, प्रशासन, क्रीडा, संस्कृती आणि स्त्री सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती सखी सोबती



फाउंडेशनच्या अध्यक्षा गिरिजा शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अहिल्यादेवींच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजात योगदान देणाऱ्या महिलांना सन्मानित करणे हा या पुरस्कारामागील मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी, अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव संयोजक तथा माजी नगरसेवक विजय शिंदे, सुचेता गांगल, सोनल वाल्हेकर, श्रीमती प्रभावती इंदलकर, मुग्धा बोरकर, सायली काणे, हर्षदा जोशी, अश्विनी फुलपगार आदी उपस्थित होते.

**सोहळ्यात ९ महिलांचा होणार सन्मान..:**"अहिल्या पुरस्कार २०२५" साठी निवड झालेल्या ९ महिलांची नावे जाहीर करण्यात आली. यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर धर्मशीलता पुरस्कार ह.भ.प. पूनम जाधव (प्रसिद्ध कीर्तनकार) आणि सुनिता आपटे (समाजसेविका) यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रजावत्सल पुरस्कार डॉ. कुंदाताई भिसे (संस्थापक अध्यक्ष, उन्नती सोशल फाउंडेशन) यांना, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर न्यायप्रिय शासिका पुरस्कार पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांना दिला जाईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्तीचे प्रतिक पुरस्कार श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या वैष्णवी जगताप यांना प्रदान होईल. याव्यतिरिक्त, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर संवेदनशील नेतृत्व पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या शिल्पागौरी गणपुले, सुनिता भोसले (समाजसेविका), प्राजक्ता खारकर (समाजसेविका) आणि रेखा मराठे (समाजसेविका) यांना देऊन गौरवण्यात येणार आहे.

संपादकीय विशेष

# पुण्यश्लोक अहिल्याबाई

तत्कालीन अहमदनगर आणि आताच्या अहिल्यानगर जिल्ह्यात जन्मलेल्या आणि माळवा प्रांतात कर्तृत्व दाखवणाऱ्या अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व आहेत. केवळ स्थापत्य चमत्कारांसाठीच नव्हे, तर प्रगतीशील प्रशासनासाठी आणि केलेल्या दूरगामी सामाजिक सुधारणांसाठीही त्या प्रसिद्ध आहेत. 1767 ते 1795 पर्यंत राज्य करताना अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत कल्याण, सामाजिक न्याय, मानवी समानता आणि शाश्वत विकासासाठी अढळ वचनबद्धता होती. त्यांनी उपेक्षित समुदायांना उन्नत करणारी धोरणे आखली. प्रगत शिक्षण दिले. आरोग्यसेवा सुधारली आणि आर्थिक वाढ साधत पायाभूत सुविधांची निर्मिती केली. अठरावे शतक हा भारतातील अशांततेचा काळ होता. त्यात राजकीय विखंडन, आर्थिक आव्हाने आणि सामाजिक अशांतता होती. या वातावरणात अनेक इतिहासकारांनी अहिल्याबाईंच्या बुद्धिमत्तेचे आणि नेतृत्वगुणांचे कौतुक केले. त्यांचे 'शासन आणि व्यक्तिमत्व' हे ज्ञान, करुणा आणि न्यायाचे मिश्रण होते. ब्रिटिश इतिहासकार कर्नल जेम्स ग्रँट डफ यांनी त्यांचे वर्णन 'एक अतिशय बुद्धिमान महिला' म्हणून केले आहे. त्यांच्याकडे विवेक आणि निष्पक्षतेने काम करण्याची वृत्ती होती. केवळ प्रादेशिक विस्तारापेक्षा सामाजिक कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या शासक म्हणून त्यांची अद्वितीय भूमिका अनेक इतिहासकार अधोरेखित करतात. अहिल्याबाईंच्या वारशातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे शिक्षणक्षेत्रातील अग्रणी कार्य. सामाजिक सक्षमीकरणासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे, हे माहीत असल्याने, त्यांनी त्यांच्या राज्यात असंख्य शाळा आणि शिक्षण संस्था स्थापन केल्या.



अहिल्याबाईंनी रस्ते, पूल आणि सार्वजनिक इमारतींचे बांधकाम सुरू केले. त्यांच्या राज्यात व्यापार आणि गतिशीलता सुलभ झाली. या पायाभूत सुविधांनी दुर्गम समुदायांना जोडले आणि आर्थिक विकासासाठी एक चौकट प्रदान केली. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करून अहिल्याबाईंनी त्यांच्या राज्याच्या एकूण समृद्धीमध्ये योगदान दिले. लवचिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीतील त्यांच्या प्रयत्नांना संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांनी पुष्टी दिली आहे. ते आर्थिक विकासासाठी शाश्वत पायाभूत सुविधांच्या महत्त्वावर भर देते. अहिल्याबाईंच्या पुढाकारामुळे अधिक प्रमाणात परस्परांशी जोडलेला समाज निर्माण झाला. त्यांनी वाणिज्य सक्षम केले आणि विविध गटांमध्ये समुदायाची भावना निर्माण केली. अहिल्याबाईंच्या कारकिर्दीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उपेक्षित समुदायांच्या उन्नतीसाठी त्यांची समर्पितता. त्यांनी विविध कल्याणकारी योजना राबवल्या. आर्थिक मदत, निवारा आणि व्यावसायिक प्रशिक्षणावर त्यांचा भर होता. त्यांची धोरणे विशेषतः विधवा, अनाथ आणि आर्थिक अडचणींना तोंड देणाऱ्यांसाठी फायदेशीर होती. त्यामुळे असुरक्षित लोकसंख्येला संसाधने आणि संधी उपलब्ध होतील याची खात्री झाली. सामाजिक कल्याणाप्रती अहिल्याबाईंचा दृष्टिकोन समग्र होता. त्यांना माहीत होते, की खऱ्या सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक आहे; परंतु कौशल्यांचा विकास आणि चांगले सामाजिक एकीकरणदेखील आवश्यक आहे.

स्वयंपूर्णता आणि प्रतिष्ठा वाढवून, अहिल्याबाईंनी वंचित व्यक्तींना समाजात पुन्हा एकत्र येण्यास मदत केली. पर्यावरणीय शाश्वततेप्रती अहिल्याबाईंची वचनबद्धता हा त्यांच्या वारशाचा आणखी एक उल्लेखनीय पैलू आहे. त्यांचे पायाभूत सुविधा प्रकल्प भविष्यातील पिढ्यांवर त्यांच्या दीर्घकालीन परिणामांची जाणीव ठेवून आखले गेले होते. शेती आणि संसाधन व्यवस्थापनातील चांगल्या पद्धतींना प्रोत्साहन देऊन त्यांनी विकास आणि पर्यावरणीय व्यवस्थापनाच्या परस्परसंबंधाची समज दाखवली. आज जग हवामानबदलाच्या परिणामांशी झुंजत असताना अहिल्याबाईंचे तत्वज्ञान आधुनिक धोरणकर्त्यांना शाश्वत उपाय शोधण्यास मदत करू शकते. अहिल्याबाईंनी त्यांच्या राज्यातील सर्वात दुर्लक्षित गटांपैकी एक असलेल्या भिल्ल समुदायाच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांमधून त्यांची समावेशकतेप्रती असलेली वचनबद्धता दिसून येते. त्यांनी भिल्लबहुल भागात शाळा स्थापन केल्या आणि हस्तकला आणि व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे आर्थिक समृद्धीला चालना देण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षण आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करून, त्यांनी भिल्लांना सक्षम बनवण्याचा आणि त्यांना त्यांच्या राज्याच्या सामाजिक-आर्थिक रचनेत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला.

उत्कृष्ट कारागिरीसाठी ओळखली जाणारी माहेश्वरी साडी भारतातील सांस्कृतिक वारशाचे प्रतीक बनली आहे. कारागिरांना अहिल्याबाईंनी दिलेल्या पाठिंब्यामुळे या पारंपारिक कलाकृतींच्या भरभराटीचा पाया घातला गेला. पारंपारिक पद्धतींना आधुनिक बाजारपेठेतील गतिशीलतेशी जोडून हे उपक्रम माहेश्वरी साडीचा सांस्कृतिक वारसा जपताना कारागिरांना योग्य वेतन आणि शाश्वत उपजीविका सुनिश्चित करतात. शाश्वत कापूस लागवड, सेंद्रिय शेती आणि पारंपारिक कलांवर लक्ष केंद्रित करणारे समकालीन उपक्रम अहिल्याबाईंच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहेत. हे कार्यक्रम शेतकऱ्यांना शाश्वत पद्धतींचे प्रशिक्षण आणि उच्च-उत्पादन देणाऱ्या बियाण्यांची उपलब्धता देतात. सामाजिक आणि आर्थिक सुधारणांव्यतिरिक्त अहिल्याबाई कला आणि स्थापत्यकलेच्या संरक्षक होत्या. त्यांनी असंख्य मंदिरे, किल्ले आणि सार्वजनिक स्मारके बांधली, ती त्यांच्या कलात्मक आवडीचे प्रतिबिंब आहेत. महेश्वर किल्ला आणि महेश्वर मंदिर संकुलाची पुनर्बांधणी हे त्यांचे सर्वात प्रसिद्ध योगदान आहे. अहिल्याबाईंच्या संरक्षणामुळे संगीत आणि नृत्यासह अनेक कला विस्तारल्या. त्यांनी एक चैतन्यशील सांस्कृतिक वातावरण निर्माण केले.

अहिल्याबाईंचा वारसा सामाजिक न्याय आणि समानता वाढवण्यात दूरदर्शी नेतृत्वाच्या प्रभावाचा पुरावा आहे. उपेक्षित समुदायांचे उत्थान, शिक्षणाला प्रोत्साहन आणि आर्थिक संधींना प्रोत्साहन देण्याची त्यांची वचनबद्धता आजच्या प्राधान्यांशी सुसंगत आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे चारित्र्य आणि प्रशासन कल्याण, शिक्षण आणि चांगल्या सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रदान करण्यावर केंद्रित नेतृत्वशैलीचे उदाहरण आहे. खरे नेतृत्व केवळ सत्ता धारण करत नाही, तर सर्वात असुरक्षित लोकांचे संरक्षण आणि उत्थान करते, याची चुणूक त्यांचे जीवन आपल्याला दाखवते.

# व्यापारविश्वातले महत्वाचे पाऊल

**अमेरिकेवर विश्वास न ठेवता जगातील बहुतांश देशांनी अमेरिकेबरोबरच्या व्यवहाराला पर्याय शोधणे सुरू केले आहे. वस्तूंच्या बदल्यात वस्तू किंवा दोन देशांमधील चलनात विनिमयाचे सूत्र ठेवले, तर अधिक सोयिस्कर होईल असा विचार जगातील अनेक देश आता करू लागले आहेत. ब्रिटन आणि भारतातील मुक्त व्यापार कराराचे पाऊल हे त्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.**



विश्वभ्रमण

प्रा. जयसिंग यादव

अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरु केलेल्या 'टॅरिफ वॉर' नंतर जगात अनेक तरंग उमटले. जगातील बहुतांश राष्ट्रे अमेरिकेवर नाराज झाली. युरोपीय संघही त्यात होता. ज्या चीनशी अमेरिकेने 'टॅरिफ वॉर' सुरू केले, त्याच्याशीच सर्वात अगोदर करार केला. त्यामुळे अमेरिकेवर विश्वास न ठेवता आता जगातील बहुतांश देशांनी अमेरिकेबरोबरच्या व्यवहाराला पर्याय शोधणे सुरू केले आहे. पर्याय लगेच उपलब्ध होणार नाही; परंतु हळूहळू मार्ग निघेल आणि त्यातही करार करणाऱ्या देशांनी डॉलर या विनिमय दरालाही पर्याय शोधल्यास अमेरिकेची मक्तेदारी मोडीत काढता येईल. वस्तूंच्या बदल्यात वस्तू किंवा दोन देशातील चलनात विनिमयाचे सूत्र ठेवले, तर ते अधिक सोईस्कर होईल असा विचार जगातील अनेक देश आता करू लागले आहेत. ब्रिटन आणि भारतातील मुक्त व्यापार कराराचे पाऊल हे त्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. भारत आणि ब्रिटन यांच्यात मोठा व्यापार आहे; परंतु हा व्यापार आणखी खुला व्हावा, बंधमुक्त व्हावा यासाठी गेल्या तीन वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. चार पंतप्रधानपदाच्या काळात हा प्रश्न सुटू शकला नव्हता. सध्याही ब्रिटनला काही सवलती दिल्या जातात. काही बाबतीत मात्र अजून तितके खुले धोरण नाही. ब्रिटनमधून स्कॉच व्हिस्की आणि जिनची आयात सुरुवातीला 75 टक्के आणि दहाव्या वर्षापर्यंत 40 टक्के शुल्कानिशी केली जाईल, असे आता ठरत आहे. सध्या हा दर 150 टक्के आहे. एकूण व्हिस्की बाजारपेठेत स्कॉच व्हिस्कीचा वाटा फक्त 2.5 टक्के आहे. ही दर कपात दीर्घ कालावधीसाठी आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील ताज्या कराराकडे या आणि अशा विविध मुद्दयांच्या परिप्रेक्ष्यातून पहावे लागेल.

आयातीतील वाढीचा देशांतर्गत बाजारपेठेवर कोणताही लक्षणीय परिणाम होणार नाही. दोन्ही बाजूंच्या कोट्याअंतर्गत ब्रिटन 2000 कोटी रुपयांच्या वाहनांवरील शुल्क शंभर टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाईल. त्यामुळे 'टाटा-जेएलआर'सारख्या कंपन्यांना फायदा होईल. या शुल्ककपातीमुळे भारतातील जॅग्वार लँड रोव्हर (जेएलआर), रोल्स-रॉइस, ॲस्टन मार्टिन आणि बेंटलेसारख्या वाहनांच्या किंमती कमी होऊ शकतात. कोट्याबाहेरील इलेक्ट्रिक वाहनांसाठी शुल्कात कोणतीही कपात नाही. इलेक्ट्रिक वाहनांशी संबंधित दखलपात्र मुद्दयांची काळजी घेण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, आयसीई (अंतर्गत ज्वलन इंजिन) वाहनांवरील कोट्याबाहेरील शुल्क दीर्घकालीन काळात हळूहळू कमी केले जाईल. त्यामुळे भारतीय उद्योगांना ब्रिटनमधून होणाऱ्या आयातीतील वाढ सोसण्यास मदत होईल.

ब्रिटनने आपल्या हद्दीत नैसर्गिक व्यक्तींच्या तात्पुरत्या प्रवेशासाठी संख्यात्मक निर्बंध किंवा आर्थिक गरज चाचणी आवश्यकता न लादण्यावरही सहमती दर्शवली आहे. भारतीय वाणिज्य मंत्रालयाच्या मते, ब्रिटनमध्ये तात्पुरते राहणारे भारतीय कामगार आणि त्यांच्या मालकांना तीन वर्षांसाठी ब्रिटनमध्ये सामाजिक सुरक्षा योगदान देण्यापासून सूट आहे. या करारामुळे सुमारे वीस टक्के पगार बचत होईल आणि केवळ आयटी क्षेत्रातील साठ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. यामुळे भारतीय कंपन्या आणि कर्मचाऱ्यांना चार हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त फायदा होईल. भारताने सरकारी खरेदी क्षेत्र ब्रिटिश कंपन्यांसाठी खुले केले आहे. बाजारपेठेतील प्रवेश केवळ संवेदनशील नसलेल्या केंद्रीय स्तरावरील संस्थांपुरता मर्यादित असेल. उप-केंद्रीय पातळीवरील संस्थांना प्रवेश वगळण्यात आला आहे. आता कराराचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी सुमारे तीन महिने लागतील. त्यानंतर करारावर स्वाक्षरी केली जाईल. त्यानंतर भारतातील केंद्रीय मंत्रिमंडळ आणि ब्रिटन संसदेकडून मान्यता घेतली जाईल.

2030 पर्यंत वस्तू आणि सेवांमधील द्विपक्षीय व्यापार सध्याच्या 60 अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून 120 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे जानेवारी 2022 मध्ये सुरू झालेल्या चर्चेचे उद्दिष्ट आहे. या व्यापार करारामुळे ब्रिटनमध्ये भारतीय वस्तू आणि सेवांच्या विस्तृत श्रेणीसाठी सुधारित बाजारपेठ उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे ब्रिटिश कंपन्यांनाही भारतीय बाजारपेठेत तुलनात्मक फायदे मिळतील. भारताच्या निर्यात हितसंबंधांच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रांमधील वस्तूंसाठी व्यापक बाजारपेठ प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी एफटीए केले जातात. सुमारे 99 टक्के टॅरिफ लाईन्सवरील आयात शुल्क रद्द केल्याने भारताला फायदा होईल; जे व्यापार मूल्याच्या सुमारे शंभर टक्के आहे. भारताला सर्व औद्योगिक वस्तूंसाठी 'शून्य शुल्क' बाजारपेठ उपलब्ध आहे. यामध्ये चामडे, पादत्राणे, कापड आणि पोशाख, रत्ने आणि दागिने, बेस मेटल, फर्निचर, क्रीडा वस्तू, वाहतूक, ऑटो घटक, रसायने, लाकूड, कागद, यांत्रिक/विद्युत यंत्रसामग्री, खनिजे यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे.

दुग्धजन्य पदार्थ, सफरचंद, चीज, ओट्स, प्राणी आणि वनस्पती तेले यासारखी संवेदनशील कृषी उत्पादने वगळण्याच्या यादीत आहेत. याचा अर्थ भारताकडून या वस्तूंवर ब्रिटनला कोणतेही शुल्क लाभ दिले जात नाहीत. प्लास्टिक, हिरे, चांदी, बेस स्टेशन, स्मार्टफोन, टेलिव्हिजन कॅमेरा ट्यूब, ऑप्टिकल फायबर, ऑप्टिकल फायबर बंडल आणि केबल्स यासारख्या संवेदनशील औद्योगिक वस्तूंचाही यादीत समावेश आहे. काही क्षेत्रांना अधिक सुरक्षित बनवण्यासाठी भारताने दीर्घ कालावधीसाठी हळूहळू शुल्क कमी करण्यास किंवा काढून टाकण्यास सहमती दर्शवली आहे. या वस्तूंमध्ये मातीकाम, पेट्रोलियम उत्पादने, कार्बन, लाल फॉस्फरस, क्लोरोसल्फ्युरिक आम्ल, सल्फ्युरिक आम्ल, बोरिक आम्ल, प्लॅटिनमची मौल्यवान धातूशास्त्र, विमान इंजिने आणि अभियांत्रिकी उपकरणे समाविष्ट आहेत. आयातीतील वाढीचा देशांतर्गत बाजारपेठेवर कोणताही लक्षणीय परिणाम होणार नाही. दोन्ही बाजूंमधील कोट्याअंतर्गत ब्रिटन ऑटोमोबाईल्सवरील शुल्क शंभर टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाईल. त्यामुळे टाटा-जेएलआरसारख्या कंपन्यांना फायदा होईल. या शुल्ककपातीमुळे भारतातील जॅग्वार लँडरोव्हर (जेएलआर), रोल्स रॉइस, ॲस्टन मार्टिन आणि बेंटलेसारख्या वाहनांच्या किमती कमी होऊ शकतात. सवलतीच्या शुल्क दरामुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या आयातीसाठीचा कोटा फक्त काही हजारांपर्यंत मर्यादित आहे. कोटा नसलेल्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी शुल्कात कोणतीही कपात केली जाणार नाही. कारण या क्षेत्राशी संबंधित चिंता आधीच दूर केल्या गेल्या आहेत.

गेल्या तीन वर्षांपासून भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार कराराची चर्चा सुरु होती. एकीकडे भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धसदृश्य परिस्थिती असताना भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार करार झाला. या कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणखी काही महिन्यांनी होणार असली तरी भारत आणि ब्रिटनमध्ये व्यापाराचे नवे दरवाजे खुले झाले आहेत. त्याचा फायदा दोन्ही देशांना होणार आहे. या करारामध्ये बहुतेक वस्तू आणि सेवांवरील शुल्क रद्द करण्याची तरतूद आहे. यामुळे भारताच्या वस्त्रोद्योगाला मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ घोषणांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे आर्थिक विश्लेषक हा करार अत्यंत महत्त्वाचा मानत आहेत. ट्रम्प यांच्या टॅरिफनंतर भारत आणि अमेरिकेत पहिला करार होऊन त्यातील वादावर तोडगा निघेल असे मानले जात होते; परंतु ज्या दोन देशांमध्ये 'टॅरिफ वॉर' रंगले, त्यांनीच एकत्र येऊन व्यापार करार केला. या पार्श्वभूमीवर भारत आणि ब्रिटनमध्येही मुक्त व्यापार करार झाला. या कराराकडे ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टार्मर यांची एक मोठी कामगिरी म्हणून पाहिले जात आहे. तथापि, त्याचा पाया 2022 मध्ये ब्रिटिश पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी घातला होता. असे म्हटले जात आहे की या करारामुळे भारतात ब्रिटनची निर्यात वाढेल आणि येथे रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

## खेचाखेची

एक गाढव मंदिराच्या जवळ बसून रोज भक्तांना पूजा करताना बघायचा. हळूहळू तो सुद्धा देवाची भक्ती करू लागला.

देव गाढवाच्या भक्तीने प्रसन्न झाले आणि म्हणाले, ''माग, तुला काय हवे ते माग?

**गाढव** : 'प्रभू, मला पुढच्या जन्मी गाढवच बनवा.'

**देव** : आम्ही तुला दोनदा गाढव बनवू शकत नाही.

**गाढव** : 'मग, मला एखाद्या सुंदर बाईचा नवरा बनवा.'

**देव** : चलाखी करू नकोस हं...! सांगितल ना, दोनदा गाढव बनवू शकत नाही म्हणून...

## वेगळं काही

क्षेत्रफळाचा विचार केला तर मोनॅको हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात छोटा देश आहे. तर व्हॅटिकन सिटीचा पहिला क्रमांक लागतो. फ्रांस आणि इटली या दोन देशांच्या मध्ये मोनॅको हा देश आहे. दोन चौरस किलोमीटर इतकं त्याचं क्षेत्रफळ आहे. या देशातले लोक एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी हेलीकॉप्टरचा वापर करतात. या देशात उत्पन्नावर कोणताही कर लावला जात नाही. या देशाची लोकसंख्या ३८ हजारांच्या आसपास आहे. या देशात जगातली सर्वाधिक श्रीमंत माणसं राहतात. त्यामुळे इथलं सरासरी उत्पन्नही कोट्यवधींच्या घरात जातं. इथे बरेच कॅसिनोही आहेत. इथे उंच इमारतींची संख्याही बरीच जास्त आहे.

## रुचिरा


## कच्च्या केळाची रुचकर भाजी

भाज्यांविषयी प्रत्येकाची आवडनिवड वेगवेगळी असते. नेहमी त्याच त्याच प्रकारे केलेल्या भाज्या खाण्यास कोणीही तयार नसतं. पण पद्धतीत थोडासा बदल केला तर भाजी आवडीने खाल्ली जाते. कच्च्या केळ्यांची भाजी हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकारही सगळ्यांना आवडू शकतो. चला तर, याची रेसिपी जाणून घेऊ या.



साहित्य– सहा कच्ची केळी, दोन टेबलस्पून तेल, कोथिंबीर, जिरं, हिंग, हळद, धने पावडर, आलं पेस्ट, आमचूर पावडर, गरम मसाला, तिखट, चवीपुरतं मीठ इत्यादी.

कृती– सर्वप्रथम कच्च्या केळ्यांचे काप करून पाच मिनिटं पाण्यात ठेवावेत. दुसरीकडे कढईत तेल घालून ते गरम झाल्यानंतर जिरे, हिंग, हळद, धने पावडर, आल्याची पेस्ट टाकून चांगलं परतावं. त्यानंतर यात केळ्यांचे काप टाकावेत आणि थोडं पाणी मिसळून पाच ते दहा मिनिटं शिजू द्यावे. त्यानंतर आमचूर पावडर, गरम मसाला आणि कोथिंबीर मिसळावी. पुन्हा वाफ आणावी. रुचकर भाजी तयार आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या कामात दिलासा मिळेल. अचानक अधिक खर्च करावे लागेल. धावपळ, दगदग होईल.
- **वृषभ** : कारकिर्दीला नवी दिशा मिळेल. कौटुंबिक सुख–समाधान लाभेल. अनावश्यक खर्च कमी करावा.
- **मिथुन** : आर्थिक स्थिती बऱ्यापैकी राहील. दिलासादायक घटना घडतील. मुलांच्या कलांना वाव मिळेल.
- **कर्क** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. मानसिक ताण वाढेल.
- **सिंह** : मुलांची प्रगती मनासारखी राहील. कर्ज प्रकरणं मार्गी लागतील. स्थावर प्रश्नात तडजोड करावी.
- **कन्या** : व्यवसायात अडचणी संभवतात. जुनी येणी रखडतील. स्थापत्य क्षेत्रात नव्या संधी चालून येतील.
- **तूळ** : घरगुती व्यवसायात प्रगती होईल. स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवावा. खऱ्या हितचिंतकाची पारख करा.
- **वृश्चिक** : व्यापारात अनपेक्षित दिलासा मिळेल. सरकारी कामांना गती येईल. छोटा–मोठा प्रवास घडेल.
- **धनु** : आजचा दिवस धावपळीचा राहील. महत्त्वाचे करार तुर्तास नको. आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी.
- **मकर** : कामाचा ताण वाढता राहील. कौटुंबिक मतभेद वेळीच दूर करावे. खोट्या आश्वासनांना भूलू नका.
- **कुंभ** : वास्तुच्या खरेदीला चालना मिळेल. व्यवसायात ध्येयपूर्तीचा आनंद मिळेल. बाकी चिंता करू नये.
- **मीन** : मनाजोग्या घटना घडतील. कौटुंबिक सहलीचा आनंद घ्याल. मित्र–मैत्रिणींच्या गाठीभेटी होतील.

## सुगरणीचा सल्ला

## थंडगार लज्जतदार!

हे मोल्ड सेट होण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवून द्यावं. ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स तयार आहेत.

**दही आईस्क्रीम**

उन्हाळ्यात दही खाणं ही पर्वणी असते. अनेक पदार्थांमधून दह्याचा वापर अत्यंत खुबीने केला जातो.

**साहित्य–** अर्धा कप दही, पाव कप साखर, अर्धा कप क्रीम, दोन थेंब व्हॅनिला इसेंस, दहा काजू (लहान काप), चार बिस्कीट

**कृती–** दही आणि साखर मिसळून चांगल्या प्रकारे फेटून घ्यावं. त्यानंतर त्यात क्रीम आणि व्हॅनिला इसेंस टाकून फेटून घ्यावं. मिश्रणात काजूचे काप मिसळून घ्या. त्यानंतर एअर टाईट कंटेनरमध्ये बिस्कीटांचे तुकडे टाकावेत. मिश्रण टाकावं. हे आईस्क्रीम फ्रीजरमध्ये ठेवावं. पाच ते सहा तासांनी आईस्क्रीम तयार होईल.

## दिनविशेष

## ३१ मे

- **२०१३** : पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय ठाण्यांवर गोळीबार केला.
- **२०१५** : केंद्र सरकारने अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेली सेवाकरवाढ अंमलात आली.
- **२०१७** : मोबाईल नंबरप्रमाणे बँक खाते पोर्टेबल करता येणार असल्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय.
- **२०१८** : महाराष्ट्राचे कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर यांने निधन.

## महत्त्वपूर्ण काही

## अंडरवॉटर हॉकी आणि हर्लिंग

दोस्तांनो, तुम्हाला हॉकी हा खेळ माहीत असेलच. तो वेगवेगळ्या प्रकारे खेळला जातो. मैदानी हॉकीसोबतच बर्फाच्या पृष्ठभागावरही हॉकी खेळतात. त्याला 'आईस हॉकी' म्हटलं जातं. पाण्यात खेळल्या जाणाऱ्या हॉकीला 'ऑक्टोपुश' किंवा 'अंडर वॉटर हॉकी' म्हणतात. स्विमिंग पुलाच्या तळाशी हा खेळ खेळला जातो. या खेळात दोन संघ असतात. यात चेंडूऐवजी गोलाकार रबरी चकतीचा वापर केला जातो. छोट्या आकाराची हॉकी स्टीक किंवा पुशरच्या मदतीने ही चकती ढकलायची असते. ती दुसऱ्या संघाच्या जाळ्यात टाकून गोल करायचा असतो. १९५४ मध्ये इंग्लंडमध्ये या खेळाचा शोध लावण्यात आला. आता 'ऑक्टोपुश'ला जगभर लोकप्रियता मिळाली आहे. १९८० मध्ये कॅनडामध्ये अंडरवॉटर हॉकी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. अंडरवॉटर हॉकी खेळताना खेळाडूंना डायव्हिंग मास्क, स्नॉर्केल आणि कल्ले यांचा वापर करावा लागतो. या खेळाच्या संघात दहा खेळाडू असतात.

क्रमश:

## पंचांग

**शनिवार, ३१ मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ शु.५, नक्षत्र : पुष्य
चंद्रराशी : कर्क , योग : वृद्धि
सूर्योदय: ६.०३, सूर्यास्त: ७.१०

## फॉरवर्डस

**मशहूर हुए है आज वो, जो कभी काबिल ना थे।**

**मंजिले भी उन्हें मिली, जो कभी दौड में शामिल ना थे।**

## आरोग्यमंत्र

## दक्षता घ्यायला हवी

जीवनशैलीतील बदलांमुळे अलिकडे अनेकांना वृद्धत्वापूर्वीच गुडघ्यांमधील वेदनांचा सामना करावा लागतो. मात्र प्रगत शस्त्रक्रियेनंतर रुग्ण या वेदनांवर मात करुन पुन्हा पूर्वीची दिनचर्या सुरू करु शकतो. अर्थात यावेळी काही धोकेही संभवतात. त्याचीच माहिती घेऊ या.

✻ हाडांशी संबंधित शस्त्रक्रियांमध्ये रक्ताच्या गुठळ्या होण्याची शक्यता जास्त असते. शास्त्रीय भाषेत त्याला 'डीप व्हेन थ्राँबोसिस' आणि 'पल्मोनरी एंबॉलिझम' असं म्हटलं जातं.



✻ पायांमध्ये होणाऱ्या रक्ताच्या गुठळ्यांसाठी 'डीप व्हेन थ्राँबोसिस' ही संज्ञा वापरली जाते तर फुफ्फुसात होणाऱ्या रक्ताच्या गुठळ्यांना 'पल्मोनरी एंबॉलिझम' असं म्हटलं जातं.

✻ प्रत्येक शस्त्रक्रियेनंतर रक्ताच्या गुठळ्यांचा धोका उद्भवत असला तरी हाडांशी संबंधित शस्त्रक्रियांमध्ये हा धोका अनेकपटींनी वाढतो. शस्त्रक्रियेनंतरच्या दोन आठवड्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्यांची निर्मिती होऊ लागते. रक्ताच्या या गुठळ्या हृदय, फुफ्फुसापर्यंत पोहचून रूग्णाचा मृत्यू होण्याची शक्यताही असते.

✻ अशा शस्त्रक्रियेनंतर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो. मधुमेहाप्रमाणे 'ऱ्हेयूमेटॉइड आर्थ्रारायटिसम'मध्येही रोगप्रतिकारक क्षमता घटते. रोगप्रतिकारक क्षमता घटवणाऱ्या विकाराचा सामना करणाऱ्या रूग्णांमध्ये गुडघे प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेनंतर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो.

## भटकंती

बरीच तरूण मंडळी रोड ट्रीपला निघतात. गाडीत बसायचं आणि मस्तपैकी हुंदडायचं असा सगळा प्लान असतो. रोड ट्रिपचा आनंद द्विगुणित करण्यासाठी तुम्ही नीट तयारीही करायला हवी. योग्य तयारी अभावी तुमच्या रोड ट्रिपचा फियास्को होऊ शकतो. हे टाळण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

✻ बॅगपॅकमध्ये गरजेचं सामानच पॅक करा. तुमचं सामान तुम्हालाच उचलायचं आहे हे लक्षात घ्या. त्यामुळे सहजपणे उचलता येईल, अशी बॅग निवडा. बॅगपॅक कोणत्याही वातावरणात टिकू शकतात. ✻ ग्रुमिंगचं तसंच वैयक्तिक गरजेचं सामान सोबत ठेवा. वैयक्तिक स्वच्छतेसाठीचं सामानही सोबत असायला हवं.

क्रमश:

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### कमल हासन यांनी सोडलं मौन

**नवी दिल्ली :** तमिळ अभिनेते कमल हासन यांनी कन्नड भाषेबद्दल दिलेल्या तथाकथित वक्तव्यावर आता मौन सोडले आहे. त्यांनी केलेल्या विधाननंतर वाद निर्माण झाला. ज्यामुळे काही कन्नड समर्थक संघटनांनी त्यांच्या आगामी चित्रपटावर बहिष्कार टाकण्याची धमकी दिलीय. या संघटनांनी नाराजी जाहीर करत हासन यांनी माफी मागावी, अशी मागणी केली होती. या प्रकरणावर कमल हासन यांनी स्पष्ट केले की, त्यांनी काहीही चुकीचे केलेले नाही. जर ह वक्तव्य सिद्ध होते, कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, तर त्यांना माफी मागण्यात कुठलीही खंत नसेन. पण जर त्यांनी काही चुकीचे म्हटले नसेल तर ते आपल्या व्यक्तव्यावर कायम राहतील. मी चुकीचा असेन तर मी माफी मागेन.

### 'ईडी'चा अधिकारी लाच घेताना सापळ्यात

**भुवनेश्वर :**भुवनेश्वरमधील सक्तवसुली संचालनालयाच्या ओडिशा विभागीय कार्यालयातील उपायुक्त स्तरावरील अधिकाऱ्याला केंद्रीय अन्वेषण विभागाने २० लाख रूपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली आहे. संबंधित अधिकारी भारतीय महसूल सेवेत २०१३ बॅचचे अधिकारी आहेत. सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, ईडी अधिकारी रघुवंशी यांनी भुवनेश्वरमधील एका खाण व्यावसायिकाकडून मनी लाँड्रिंग प्रकरणातून नाव वगळण्यासाठी एकूण ५० लाख रूपयांची मागणी केली होती. व्यावसायिक राऊत यांनी या लाचेबाबत सीबीआयकडे तक्रार दाखल केली होती.

# पाकच्या ११८ पेक्षा जास्त चौक्या उद्ध्वस्त

## गृहमंत्री अमित शाह यांनी केले बीएसएफचे कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> जेव्हा भारताच्या सीमेवर कोणताही हल्ला होतो, तेव्हा त्याचा फटका सर्वप्रथम बीएसएफच्या जवानांना सहन करावा लागतो. पण सीमा कुठे आहे याचा विचार करायला ते कधीच थांबत नाहीत.
> **-अमित शाह,** गृहमंत्री

**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या आक्रमकतेला चोख प्रत्युत्तर दिल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) कौतुक केले. जम्मू सीमेवर प्रत्युत्तरादाखल करण्यात आलेल्या कारवाईत शत्रूच्या ११८ हून अधिक चौक्या उद्ध्वस्त झाल्या आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतर पहिल्यांदाच जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यात शाह म्हणाले की, सीमा सुरक्षा दलाने शत्रूचे पाळत ठेवण्याचे जाळे उद्ध्वस्त केले आहे, हा मोठा धक्का आहे. त्याची भरपाई करण्यासाठी त्यांना अनेक वर्षे लागतील. सुरक्षा स्थिती, अमरनाथ यात्रेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आणि पाकिस्तानी गोळीबारात बळी पडलेल्यालोकांशी संवाद साधण्यासाठी जम्मू क्षेत्राचा दोन दिवसांचा दौरा संपल्यानंतर केंद्रीय गृहमंत्र्यांनी बीएसएफ जवानांचे कौतुक केले. तीन दिवसांत ११८ हून अधिक पदांचे नुकसान किंवा नासधूस होणे ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी असल्याचे ते म्हणाले.

पाकिस्तानने आमच्या सीमा आणि नागरी भागांवर हल्ले करून आमच्या दहशतवादविरोधी कारवाईला प्रत्युत्तर दिले, तेव्हा बीएसएफच्या जम्मू फ्रंटियर च्या जवानांनीच प्रत्युत्तर देत ११८ हून अधिक चौक्या उद्ध्वस्त केल्या. त्यांनी शत्रूची संपूर्ण पाळत ठेवणारी यंत्रणा तुकड्या-तुकड्याने उद्ध्वस्त केली, ही यंत्रणा पुन्हा उभी करण्यासाठी त्यांना चार ते पाच वर्षे लागतील. बीएसएफच्या महासंचालकांकडून मिळालेल्या माहितीनुसार पाकिस्तानच्या दळणवळण यंत्रणा आणि पाळत ठेवण्याच्या उपकरणांना सर्वात मोठा धक्का बसला आहे. यामुळे तो बराच काळ संपूर्ण माहितीवर आधारित युद्ध लढू शकणार नाही, असे ते म्हणाले.

बीएसएफच्या तत्परतेचे कौतुक करताना अमित शाह म्हणाले की, त्यांच्या बुद्धिमत्तेमुळेच अचूक पूर्वकारवाई शक्य झाली. शांततेच्या काळातही तुम्ही सावध नजर ठेवली होती, हे यावरून सिद्ध होते, असे ते म्हणाले. आपल्या अचूक बुद्धिमत्तेच्या आधारे अचूक प्रति-रणनीती आधीच आखली गेली होती. जेव्हा संधी मिळाली तेव्हा तुम्ही ती यशस्वीपणे अंमलात आणली. हे यश अफाट देशभक्ती आणि त्यागाचे प्रतिबिंब असल्याचे सांगून शहा म्हणाले की, असे शौर्य तेव्हाच समोर येते जेव्हा राष्ट्राबद्दल अभिमान असतो, हृदयात देशभक्तीची भावना असते आणि सर्वोच्च बलिदानाची तळमळ असते. तरच असे परिणाम शक्य आहेत. बीएसएफ ही भारताची पहिली संरक्षण रेषा म्हणून काम करत आहे, यावर त्यांनी भर दिला.

# पाकच्या पंतप्रधानांनी दिली हल्ल्याची कबुली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय सैन्यानं 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये पाकिस्तानचं जे नुकसान केलंय ते शेजारचा देश अनेक पिढ्या लक्षात ठेवणार आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा भारतानं केलेल्या हल्ल्याची जाहीर कबुली दिली आहे. पाकिस्तानी पंतप्रधानांच्या दाव्यानुसार भारतीय क्षेपणास्त्रांनी ९ आणि १० मे रोजी पाकिस्तानमधील अनेक लक्ष्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात पाकिस्तानच्या क्षेपणास्त्रांचं नुकसान झालं. पाक पंतप्रधानांच्या म्हणण्यानुसार, ते पहाटे ४.३० वाजता - त्यांच्या फजरच्या नमाजानंतर - भारतावर हल्ला करण्याची योजना आखत होते, परंतु त्यापूर्वीच भारताने ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा हल्ला करत रावळपिंडीतील विमानतळासह पाकिस्तानमधील अनेक प्रांतांना लक्ष्य केले.

अझरबैजानमध्ये एका भाषणादरम्यान शरीफ म्हणाले, ९-१० मेच्या रात्री, आम्ही भारतीय आक्रमणाला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय घेतला. आमच्या सशस्त्र दलांनी पहाटे ४.३० वाजता फजरच्या नमाजानंतर धडा शिकवण्यासाठी तयारी केली होती. परंतु ती वेळ येण्यापूर्वीच भारताने पुन्हा एकदा ब्राह्मोसचा वापर करून क्षेपणास्त्र हल्ला केला आणि रावळपिंडीतील विमानतळासह पाकिस्तानच्या वेगवेगळ्या प्रांतांना लक्ष्य केले.

भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत हे हल्ले केले होते. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधांवर लष्करी हल्ला होता, भारतीय क्षेपणास्त्रांनी १० मे रोजी पहाटेच्या सुमारास नूर खान एअरबेस आणि पाकिस्तानमधील इतर लक्ष्यांवर हल्ला केला होता, हे त्यांनी मान्य केलं होतं. ते म्हणाले होते की, ९-१० मेच्या मध्यरात्री, पहाटे सुमारे २.३० वाजता, जनरल पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिफ मुनीर यांनी मला एका सुरक्षित फोनवरून कॉल केला आणि सांगितले की भारताने त्यांची क्षेपणास्त्रे डागली आहेत. एक नूर खान एअरबेसवर पडले आहे आणि काही इतर ठिकाणी सोडले आहेत. भारत सरकारच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय हल्ल्यांमध्ये जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिजबुल मुजाहिद्दीन यांसारख्या दहशतवादी गटांशी संबंधित सुमारे १०० दहशतवादी मारले गेले. भारतीय सशस्त्र दलांनी नऊ दहशतवादी ठिकाणांवर क्षेपणास्त्र हल्ले केले - चार पाकिस्तानमध्ये (भावलपूर, मुरिदके, सरजल आणि मेहमूना जोया) आणि पीओके मधील (सवाई नाला, सय्यदना बिलाल, गुलपूर, बरनाला आणि अब्बास) पाच ठिकाणांचा समावेश होता.

# अरशद वारसीसह पत्नीला शेअर बाजारात बंदी

**मुंबई :** लोकप्रिय अभिनेता अरशद वारसी, त्यांची पत्नी मारिया गोरेटी आणि त्यांच्या भावावर सेबीने एक वर्षासाठी शेअर बाजारात गुंतवणूक करण्यास बंदी घातली आहे. साधना ब्रॉडकास्ट लिमिटेड (आता क्रिस्टल बिझनेस सिस्टम लिमिटेड) या कंपनीच्या शेअरमधील मोठ्या प्रमाणावर "पंप अँड डंप" प्रकारच्या फसवणूक योजनेत सहभागी असल्याचे सेबीच्या चौकशीत स्पष्ट झाले आहे.

मार्च २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत साधना ब्रॉडकास्ट या कंपनीच्या शेअरची किंमत कृत्रिमरीत्या वाढवण्यात



आली आणि नंतर ती मोठ्या प्रमाणावर विकून खोट्या माहितीत गुंतलेल्या किरकोळ गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात एकूण ६० जणांचा सहभाग असल्याचे सेबीने स्पष्ट केले आहे. सेबीच्या अहवालानुसार, अरशद वारसी यांनी स्वतःच्या, पत्नीच्या आणि भावाच्या डीमॅट खात्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर ट्रेडिंग केली. मनीष मिश्रा नावाच्या व्यक्तीसोबत त्यांचे व्हॉट्सअॅप संवादही सापडले असून, त्यामध्ये प्रत्येकी २५ लाख रुपये बँक खात्यात ट्रान्सफर करण्याची ऑफर दिली गेली होती. त्यानंतर सेबीने अरशद वारसी, मारिया गोरेटी आणि त्यांच्या भावास एक वर्षासाठी बाजारात गुंतवणूक करण्यास बंदी घातली असून, प्रत्येकी ५ लाखांचा दंड तसेच १.०५ कोटी रुपयांची अवैध कमाई परत करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात युट्यूब चॅनेल्सचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर करण्यात आला. काही शेअर बाजार संबंधित चॅनेल्सवरून साधना ब्रॉडकास्टच्या भविष्यासंदर्भात खोट्या व आशादायक बातम्या प्रसारित करण्यात आल्या. या माहितीच्या आधारे अनेक किरकोळ गुंतवणूकदारांनी शेअर्स खरेदी केल्याची माहिती आहे. हे प्रकरण सोशल मीडियाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक कशी होऊ शकते याचे उत्तम उदाहरण ठरले आहे. सेबीने यावेळी हे स्पष्ट केले आहे की, सोशल मीडियावर आधारित शेअर टिप्स तपासून पाहिल्या नाहीत, तर मोठी फसवणूक होऊ शकते.

पान १ वरून

## वचनपूर्तीनंतरच बिहारमध्ये

होत्या. कधीकधी रस्ते बांधणाऱ्या लोकांना मारले जात होते. या लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानावर विश्वास नव्हता. नितीशजींनी त्या परिस्थितीतही येथे विकास आणण्याचा प्रयत्न केला. २०१४ नंतर, आम्ही या दिशेने अधिक वेगाने काम केले. आज येथील परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. मोदी सरकारने नक्षलवाद उखडून टाकण्यासाठी तारीख निश्चित केली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, आम्ही माओवाद्यांना त्यांच्या कृत्यांची शिक्षा देण्यास सुरुवात केली. आम्ही तरुणांनाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले. ११ वर्षांच्या प्रतिज्ञेचे फळ देशाला मिळू लागले आहे. १४ पूर्वी देशातील १२५ हून अधिक जिल्हे नक्षलग्रस्त होते. आता फक्त १८ जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. आता सरकार रस्ते तसेच रोजगार देत आहे. आता माओवादी हिंसाचार पूर्णपणे नष्ट होईल. शांतता, सुरक्षा, शिक्षण आणि विकास प्रत्येक गावात कोणत्याही अडथळ्याशिवाय पोहोचेल. नितीशजींच्या नेतृत्वाखाली जंगलराज सरकारला निरोप देण्यात आला, तेव्हा बिहार देखील प्रगतीच्या मार्गावर पुढे जाऊ लागला. पूर्वी दलित आणि मागासवर्गीय लोकांकडे कायमचे घर नव्हते, त्यांच्याकडे घर नव्हते. कोट्यवधी लोकांकडे डोक्यावर छप्परही नव्हते. बिहारमधील लोकांची हीच दुर्दशा होती का, हा काँग्रेस-राजदचा सामाजिक न्याय होता. यापेक्षा अन्याय्य काहीही असू शकत नाही. काँग्रेस आणि राजदने कधीही दलित आणि मागासवर्गीयांच्या समस्यांची पर्वा केली नाही. हे लोक त्यांची गरिबी दाखवण्यासाठी परदेशी लोकांना बिहारमध्ये आणत असत. आता जेव्हा दलित, वंचित आणि मागासवर्गीय त्यांच्या पापांमुळे काँग्रेस सोडून गेले आहेत, तेव्हा ते त्यांचे अस्तित्व वाचवण्यासाठी सामाजिक न्यायाचे गाणे गात आहेत, असा आरोप त्यांनी केला.

रेल्वेची स्थितीही बदलली : बिहारमधील रेल्वेची स्थितीही आता वेगाने बदलत आहे. आज बिहारमध्ये विजेचा वापर १० वर्षांपूर्वीच्या तुलनेत चार पटीने वाढला आहे. नबीनगर एनटीपीसीचा एक मोठा वीज प्रकल्प बांधला जात आहे. त्यावर ३० हजार कोटी रुपये खर्च केले जातील. यामुळे बिहारला दररोज १५०० मेगावॅट वीज मिळेल. बक्सर आणि पिरपैंती येथेही नवीन थर्मल प्लांट सुरू केले जातील. बिहारला हरित ऊर्जेकडे घेऊन जाण्यासाठी काजरा येथे एक सौर पार्क देखील बांधला जात आहे.

## 'लाडक्या बहिणीं'मध्ये २,६५२...

योजनेत २,६५२ लाडक्या बहिणींनी योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आलीय. त्यामुळे आता सरकार अधिक सतर्क झाले असून, या योजनेतून शासकीय कर्मचाऱ्यांनी घेतलेला लाभ तपासण्यासाठी अजून ६ लाख लाभार्थ्यांची पडताळणी होणार असल्याची माहिती समोर येतेय.

## धनंजय मुंडे मन:शांतीसाठी...

विपश्यनेचा मार्ग निवडला. मात्र या काळात प्रचंड मन:स्ताप झाल्याने धनंजय मुंडे यांनी इगतपुरी येथील सुप्रसिध्द विपश्यना केंद्र येथे जाऊन मन:शांती घेण्याचा निर्णय घेतला असे त्यांच्या कार्यालयाकडून कळवण्यात आले आहे. आठ दिवसांपासून ते त्या ठिकाणी ध्यानधारणा करत असल्याचे त्यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले. सलग दहा दिवस त्यांचा हा कार्यक्रम असल्याचे समजते. त्यापैकी आठ दिवस पूर्ण झाले असून ते आपली ध्यान साधना पूर्ण करून दोन तारखेला पुन्हा कामाला लागणार असल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

धनंजय मुंडे यांच्यावर संतोष देशमुख प्रकरणाबाबत आरोप करण्यात आले. यानंतर करुणा शर्मा यांच्याकडून होणारे वैयक्तिक आरोप, मंत्रिपदातील कमी झालेला वावर आणि त्यानंतर गेलेले मंत्रिपद यानंतर धनंजय मुंडे यांनी आरोग्याकडे लक्ष देण्याचा निर्णय घेतला. धनंजय मुंडे यांच्या दोन्ही डोळ्यांवर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर काही दिवसांतच त्यांना बेल्स पाल्सी या दुर्मिळ आजाराने ग्रासले. विविध उपचार घेऊनही अद्याप धनंजय मुंडे यांच्या प्रकृतीत हवी तितकी सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांनी आता मन:शांतीकडे लक्ष देण्याचा निर्णय घेतला आहे.

## कांदा नुकसानीला...

राज्यात १५ हून अधिक जिल्ह्यात कांद्याचे उत्पादन घेतले. सततच्या पावसामुळे हजारो टन कांदा शेतात खराब झाला आहे. शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे आर्थिक नुकसान झाले. राज्य सरकारने कांद्यासह इतर सर्व शेतमालाच्या नुकसानीचे अचूक पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीची नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. शेतात खराब झालेल्या कांद्याच्या नुकसानीपोटी उत्पादकांना एकरी एक लाख रुपयांची मदत करावी, स्वस्तात कांदा विक्री झालेल्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल दोन हजार रुपयांचे अनुदान देण्याचा आग्रह धरण्यात आला आहे.

## वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना...

तसेच, आरोग्य विभागाकडून आरोग्य शिबिरं, कार्डियाक ॲम्ब्युलन्स, तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर स्वत: पंढरपूर येथे भेट देऊन या सुविधांचा आढावा घेणार आहेत.

वारीदरम्यान पोलिसांसोबत समन्वय राखण्यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येणार आहे. वीज, पाणी, वॉटरप्रूफ तंबू यांसारख्या सुविधा पालखी तळांवर पुरवण्यात येतील. वारकऱ्यांचे भोजन आणि पारंपरिक सोपस्कार वेळेत पार पडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे.

## मेट्रोच्या विस्तारीकरणाला मिळणार गती

मोहोळ यांनी खट्टर यांच्याकडे केली. तसेच मेट्रोच्या विस्तारीकरणाचा भाग म्हणून खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला हा मार्गही दृष्टीक्षेपत असून सोबतच नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग हा जोडमार्गही प्रस्तावित आहे. याही प्रकल्पाला राज्य सरकारची मंजुरी मिळाली असून पीआयबीची मान्यता प्रतीक्षेत आहे .तसेच पीआयबीच्या मान्यनंतर मान्यतेनंतर सदर प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळात ठेवण्यात यावा, याबाबत मोहोळ यांनी खट्टर यांच्याशी चर्चा केली. याबाबत माहिती देताना मोहोळ म्हणाले, 'पुणे शहरातील मेट्रो प्रकल्पांना गती देण्याची मोदी सरकारची भूमिका असून नवे प्रस्तावित मार्ग लवकरात लवकर मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. संपूर्ण शहरभर मेट्रोचे जाळे तयार करताना त्याला आणखी वेग यावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही विषयांबाबत खट्टर यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल हा विश्वास वाटतो.

## अर्थव्यवस्थेची दमदार कामगिरी


आकडेवारी शुक्रवारी (दि.३० मे) राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय आणि सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने प्रसिद्ध केली. देशातील अर्थव्यवस्थेने दर तिमाहीत गती घेतली असली तरी, संपूर्ण वर्षातील ६.५ टक्के एवढी जीडीपी वाढ ही चार वर्षातील सर्वात कमी आहे. देशात २०२१-२२ मध्ये जीडीपी वाढीचा दर ९.७ टक्के होता. तर २०२२-२३ मध्ये ७.६ टक्के २०२३-२४ मध्ये ९.२ टक्के राहिला होता.

## ढेकळांचे पंचनामे करायचे का?

पुन्हा बाहेर काढून निवडावा लागतो, जो खर्चिक आणि कष्टसाध्य प्रकार आहे. वाढलेल्या मजुरी दरांमुळे साठवणुकीचा खर्चही गगनाला भिडत आहे. कोकाटे यांच्या वक्तव्यावर समाजमाध्यमांतून आणि शेतकरी संघटनांकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी त्यांच्या स्पष्टपणाचं कौतुक केलं, तर काहींनी "ढेकळांचे पंचनामे" हे विधान शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे असल्याचं म्हटलं आहे.

## 'गोकुळ'च्या...

निवडीनंतर मुश्रीफ यांच्या कार्यकर्त्यांकडून गोकुळ कार्यालयाबाहेर



गुलालाची उधळण करत घोषणाबाजी करण्यात आली. महायुतीने आमदार सतेज पाटील यांना धक्का देत डावच उलटवला. अध्यक्षपदासाठी चर्चेत असलेले शशिकांत पाटील-चुयेकर यांचे नाव शेवटच्या क्षणी महायुतीच्या नेत्यांच्या दबावाने मागे पडले. महायुतीकडून नविद मुश्रीफ, अंबरिश घाटगे, अमरसिंह पाटील व अजित नरके यांची नावे अध्यक्षपदासाठी पुढे आली होती. अखेर नाविद मुश्रीफ यांच्या गळात अध्यक्षपदाची माळ पडली.

## अकरावी प्रवेश प्रक्रिया संथ गतीने

**मुंबई :** दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत उत्तम गुण मिळविल्यानंतरही इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक दिवसांनंतरही सुरू असलेल्या या तांत्रिक घोळामुळे अकरावी प्रवेशासाठीची विद्यार्थ्यांची अर्ज नोंदणीची संख्या आता निम्म्यावर आली आहे.

दरम्यान, दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत उत्तम गुण मिळविल्यानंतरही इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक दिवसांनंतरही सुरू असलेल्या या तांत्रिक घोळामुळे अकरावी प्रवेशासाठीची विद्यार्थ्यांची अर्ज नोंदणीची संख्या आता निम्म्यावर आली आहे. अर्ज नोंदणीला सुरुवात झाल्यानंतर दिवसभरात जवळपास दोन ते अडीच लाखांच्या संख्येने होणारी विद्यार्थ्यांची अर्ज नोंदणीची संख्या ही आता केवळ दीड लाखांच्या घरात आहे. अकरावीचे अद्यापही लाखो विद्यार्थी अर्ज नोंदणी प्रक्रियेपासून वंचित असल्याने विद्यार्थ्यांसह पालकांच्या संतापाचा पारा दिवसेंदिवस आणखी चढत आहे. अकरावीच्या प्रवेशासाठी अर्ज नोंदणी प्रक्रियेला सोमवार, २६ मेपासून ऑनलाईन पद्धतीने सुरुवात झाली. मात्र पहिल्या दिवशी संकेतस्थळावर २,५८,८८७ इतकी नोंदणी झाली.

**जाहीर सूचना**

सर्व संबधितांना प्रस्तुत नोटीसीव्दारे कळिवण्यात येते की, खालील परिशिष्ठामध्ये नमुद केलेली मिळकत **श्री. सत्यवान पांडुरंग कोतवाल** यांच्या मालकीची ताबे वहीवाटीची असून त्यांनी सदर मिळकत, निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देऊन आमचे अशिलांना कायमस्वरूपी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे. परिशिष्ठ मिळकतीच्या टायटल तपासण्याकामी सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही संदर्भात अन्न, वस्त्र, गहाण, दान, बशीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध हरकत / आक्षेप असल्यास संबधिताने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ दिवसाचे** आत खालील पत्यावर मूळ कागदपत्रासह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधिताने जो जाणून बूजून सोडून दिला आहे. असे समजून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील.

**मिळकतीचे वर्णन**–तुकडी–पुणे, पोट–तुकडी तालुका–हवेली, मा. दुय्यम निबंधक हवेली, पुणे यांचे कार्यकक्षेतील, पिंपरी–चिंचवड महानगरपालिका यांचे हद्द आणि कार्यकक्षेतील गावमौजे चऱ्होली बु. येथिल सर्व्हे नं–४०६/२ मधील अविभक्त हिस्सा ०.०३.०० आर मिळकत आहे. यांसी चर्तुसीमा **पुर्वः** डीपी रस्ता, **दक्षिणः** सर्व्हे नं–४०६/२ पैकी मिळकत, **पश्चिमः** डीपी रस्ता, **उत्तरः** सर्व्हे नं–४०६/२ पैकी मिळकत आहे. सदर वर्णनाची मिळकत जाहीर नोटीसचा विषय आहे.

ठिकाणः पुणे
दि: ३०/०५/२०२५.

**संदेश आर थिगळे, (ॲडव्होकेट)** मोबाईल नं ९९२२८१८५२१
ओमसाई पार्क, जयदीप पार्क बिल्डींग समोर,
आळंदीरोड, भोसरी, ता–हवेली, जि–पुणे.

**जाहीर सूचना**

सर्व संबंधितांना प्रस्तुत नोटीसीव्दारे कळिवण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेली मिळकत **रघुनाथ लक्ष्मण कोतवाल मयत तर्फे वारस १. श्रीमती. शांताबाई रघुनाथ कोतवाल, २. श्री. मनोज रघुनाथ कोतवाल, ३. सौ. शिल्पा मनोज कोतवाल, ४. श्रवणी मनोज कोतवाल, ५. कु. अन्यन्या मनोज कोतवाल, ६. श्री. विकास रघुनाथ कोतवाल, ७. सौ. अंजली विकास कोतवाल, ८. अरव विकास कोतवाल, ९. स्वाती विकास कोतवाल यांचे लग्नानंतरचे नाव स्वाती विलास विरकर** यांच्या मालकीची ताबे वहीवाटीची असून त्यांनी सदर मिळकत, निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देऊन आमचे अशिलांना कायमस्वरुपी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे. परिशिष्ठ मिळकतीच्या टायटल तपासण्याकामी सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही संदर्भात अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबध हरकत / आक्षेप असल्यास संबधिताने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ दिवसाचे** आत खालील पत्यावर मूळ कागदपत्रासह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधिताने जो जाणून बुजून सोडून दिला आहे. असे समजून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील.

**मिळकतीचे वर्णन**–तुकडी–पुणे, पोट–तुकडी तालुका–हवेली, मा. दुय्यम निबंधक हवेली, पुणे यांचे कार्यकक्षेतील, पिंपरी–चिंचवड महानगरपालिका यांचे हद्द आणि कार्यकक्षेतील गावमौजे चऱ्होली बु. येथिल १. सर्व्हे नं–३९६/४ मधील अविभक्त हिस्सा ०.०७.६६ आर म्हणजेच ७६६ चौ.मी आहे. याशिवाय २. सर्व्हे नं–३९६/२ मधील अविभक्त हिस्सा ०.०१.८० आर मिळकत आहे. यांसी चर्तुसीमा **पुर्वः** श्री. रघुनाथ लक्ष्मण कोतवाल, **दक्षिणः** ओढा, **पश्चिमः** श्री. मुरलीधर महादेव कोतवाल, **उत्तरः** सर्व्हे नं–३९६/२ सामाईक क्षेत्र आहे. सदर वर्णनाची मिळकत जाहीर नोटीसचा विषय आहे.

ठिकाणः पुणे
दि: ३०/०५/२०२५.

**संदेश आर थिगळे, (ॲडव्होकेट)** मोबाईल नं ९९२२८१८५२१
ओमसाई पार्क, जयदीप पार्क बिल्डींग समोर, आळंदीरोड, भोसरी, ता–हवेली, जि–पुणे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना सदर जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही १) **सौ. मनिषा सुधीर बागाईतकर व २) श्री. सुधीर सिताराम बागाईतकर** दोघेही रा. प्लॉट नं. २३ इंदुमती रक्षा लेखा सोसायटी, धनकवडी पोस्ट ऑफीस जवळ, धनकवडी, पुणे ४११०४३. यांचे मालकी हक्काची व तावेवहिवाटीची असून, सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची व सदर मिळकतीचे हक्क आज रोजी सदर विदयमान मालक यांचेकडेच असल्याची खात्री व भरवसा देऊन त्यांनी सदर मिळकत आमचे अशिल यांना खरेदी देण्याबाबत बोलणी झालेली असुन विसारही स्विकारलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, लीज, पोटगी, चोळीबांगडी, करारमदार, दिवाणी अथवा महसुली कोर्टवाद, लीज पेंडन्सी, बोजा इ. स्वरूपाचा कसलाही हक्क, हितसंबंध इ. असल्यास त्याबाबतचा पुर्ण खुलासा व्हावा व टायटलची शहानिशा व्हावी यासाठी म्हणुन सदरची नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास संबंधितांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन **०८ दिवसांचे आत** त्याबाबत मूळ कागदपत्रांनिशी खाली नमुद पत्त्यावर लेखी हरकत नोंदवुन तशी लेखी पोहोच घ्यावी. नमुद मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहीत अशी समजुन व असल्यास संबंधितांनी त्यांचे हक्क जाणीवपूर्वक सोडुन दिले आहेत असे समजून सदर मिळकतीचा पुढील खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, जिल्हा पुणे मधील मे. सह दुय्यम निबंधक साहेब हवेली, पुणे यांचे कार्य क्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका हद्दीमधील गाव मौजे धायरी येथील, स. नं. १२५/१ ते ४+८/५१ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या " **इडन कोर्ट**" या इमारतीमधील म्हणजेच " **इडन कोर्ट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**" या इमारतीमधील **पहिल्या मजल्यावरील रहिवासी गाळा / फ्लॅट नं. १०१** यासी क्षेत्र ३९.९४ चौ.मी. म्हणजेच ४३० चौ.फु. कारपेट अधिक लगतची गच्ची यासी क्षेत्र ९.२९ चौ.मी. म्हणजेच १०० चौ. फु. ( एकुण सेलेबल क्षेत्र ६६३ चौ. फु.) व कार पार्किंग क्र. १९ यासी क्षेत्र ८.३६ चौ.मी. म्हणजेच ९० चौ. फु. ही संपूर्ण रहिवासी गाळा / फ्लॅट मिळकत या फ्लॅट मिळकतीच्या चतुः सिमा पुढीलप्रमाणे पुर्वेस फ्लॅट नं. १०२ पश्चिमेस फ्लॅट नं. १०८ दक्षिणेस इमारतीमधील पॅसेज, जिना व लिफ्ट उत्तरेस ईमारतीची मोकळी जागा येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

स्थळ : पुणे,
दि. २७/०५/२०२५

सही /-
**ॲड. शुभांगी अनिल पाटणकर**
**पत्ता :** स. नं. ३७ / १३+१४, फ्लॅट नं. ३४,
कृष्णा सह. गृह. संस्था मर्या., धनकवडी पुणे ४३.
संपर्क नं. ९९७५२७०६१२

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळविण्यात येते की, अविनाश निवृत्ती जाधव मुक्काम पोस्ट बोरी, बी-के. तालुका जुन्नर जिल्हा पुणे ४१२४११ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेले अस्मिनी ट्रॅव्हल्स या नावाने असलेली वाहन नंबर MH14LB9116 चासी नंबर 40740 इंजिन नंबर 06199 असा असून, सदर चार चाकी वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती निलवंती अविनाश जाधव यांच्या नावावर पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी ३०/०५/२०२५

**श्रीमती निलवंती अविनाश जाधव**
मुक्काम पोस्ट बोरी बीके
तालुका जुन्नर
जिल्हा पुणे - ४१२४११

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार अंकुश तात्याबा नलावडे रा. कुरुंजी ता. भोर जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म- मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांची आजी कै. पाराबाई कुशाबा खुळे यांचा मृत्यु मौजे.कांबरे बु" ता. भोर जि. पुणे येथे दि.०४/०५/२०१५ रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म - मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज.दि.२१/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.
क्र. फौज/मृत्यु/एस. आर/०१/२०२५
दिनांक :- २१/०५/२०२५
ठिकाण :- भोर

शिक्का

**(डॉ. विकास खरात)**
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.**

दुरध्वनी : ०२० - २६१२५७७९
email : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. ३२/२०२५/६९४
पुणे, दिनांक : २४/०३/२०२५/१७१

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
सुविधा निसर्ग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. ३९२/३९३/३९४/३९५/३९६/३९८/१ते३९२/३९३/३९४/३९५/३९६/३९८/८, खेड-शिवापुर, ता. हवेली, जि. पुणे - ४११००५
तर्फे अध्यक्षः श्री. आदित्य चंद्रकांत बांडेहवलदार सचिव श्री. अभिजीत प्रदीप सट्टे

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/जागा मालक/ जाब देणार नं. १
१. सुविधा रिअलकॉन प्रायव्हेट लिमिटेड
ऑफिस पत्ताः प्लॉट नं. २, क्षिप्रा सोसायटी, हिंगणे बुद्रुक (कर्वेनगर), स.नं. २५/१ब, पुणे ४११०५२
तर्फे संचालक, श्री. राजेश अनंत अत्रे, रा. प्लॉट नं. ११,४था मजला, चंद्रसेन अपा., लेन नं ८. प्रभात रोड पुणे- ०४
अ.क्र.२ ते ८ तर्फे कुलमुखत्यार म्हणून अ.क्र. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. रविंद्र रामचंद्र बांडे, ३. सौ. रेखा रविंद्र बांडे, ४. श्री. अमर रविंद्र बांडे (स्वतःकरिता व अ. क्र.६ तर्फे अ.पा.क म्हणून)
५. सौ. गौरी अमर बांडे (स्वतः करिता व अ. क्र. ७ तर्फे अ.पा.क म्हणून )
६. चि. परम अमर बांडे, ७. चि. पराग अमर बांडे
अ.क्र.२ ते ७ रा. मौजे खेड-शिवापुर, ता. हवेली, जि. पुणे ४१२२०५
८. उनो फास्ट इन्फा सव्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड तर्फे अधिकृत संचालक श्री. विकास मधुकर मठकरी, ऑफिस पत्ताः ८, रतानी हाऊसिंग सोसायटी, शिवाजीनगर, पुणे- ०४

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सुविधा निसर्ग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित गट नं. ३९२/३९३/३९४ /३९५/३९६/३९८/१ते३९२/३९३/३९४/३९५/३९६/३९८/८, खेड- शिवापुर, ता. हवेली, जि. पुणे - ०५ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३२ / २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०८/०५/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर.

गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ८ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक १२/०६/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २७/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

## ट्रॅक्टर उलटून विहिरीत पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू




**हमीरपूर (उत्तर प्रदेश) :** हिमाचल प्रदेशातील हमीरपूर येथे शुक्रवारी एका ६० वर्षीय शेतकऱ्याचा ट्रॅक्टर, ज्यामध्ये कल्टिव्हेटर जोडलेला होता, तो शेतातून वळून खोल विहिरीत पडल्याने त्याचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जलालपूर भागातील मामना गावात रामकिशन कुशवाहा शेतात नांगरणी करत असताना ही घटना घडली, असे पोलिसांनी सांगितले. पोलिसांच्या मते, ट्रॅक्टरचा वेग जास्त असल्याने हा अपघात झाला, ज्यामुळे ट्रॅक्टर नियंत्रण गमावून विहिरीत पडला. कुशवाहाचा बुडून मृत्यू झाला.

## मोबाईल फोनच्या उजेडात ४ महिलांची प्रसुती

**बलिया (उत्तरप्रदेश) :** बेरुअरबारी येथील सरकारी आरोग्य केंद्रात चार महिलांनी मोबाईल फोनच्या प्रकाशात बाळांना जन्म दिल्याच्या कथित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. या घटनेची चौकशी करण्यासाठी उपमुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संजीव बर्मन म्हणाले की, जिल्हा मुख्यालयापासून १२ किमी अंतरावर असलेल्या बेरुअरबारी येथील सरकारी आरोग्य केंद्रात सोमवारी रात्री चार गर्भवती महिलांची प्रसूती मोबाईल फोनच्या लाईटमुळे झाल्याचा आरोप असलेल्या मीडिया रिपोर्ट्सद्वारे माहिती मिळाली.

## बाहुबली', 'आरआरआर'ना पुरस्कार जाहीर



**हैदराबाद :** तेलंगणा सरकारच्या २०१४ ते २०२३ या वर्षांसाठी जाहीर झालेल्या गद्दर चित्रपट पुरस्कारांसाठी प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक एसएस राजामौली यांचे 'बाहुबली-२' आणि 'आरआरआर' हे चित्रपट निवडण्यात आले. पुरस्कार निवड मंडळाचे प्रमुख असलेले ज्येष्ठ अभिनेते आणि निर्माते मुरली मोहन यांनी शुक्रवारी इतर सहा पुरस्कारांच्या विजेत्यांची नावेही जाहीर केली. ज्येष्ठ दिग्दर्शक मणिरत्नम यांची पैडी जयराज चित्रपट पुरस्कार (भारतीय चित्रपट व्यक्तिमत्व) साठी निवड झाली आहे.

## कर्नाटकातील सीबीआयची स्पीड पोस्टद्वारे समन्स



**नवी दिल्ली :** सीबीआयच्या बेंगळुरू युनिटने सुरक्षित, ट्रॅक करण्यायोग्य आणि वेळेवर संवाद सुनिश्चित करण्यासाठी स्पीड पोस्टद्वारे समन्स आणि कायदेशीर नोटिस पाठवणे आणि पोहोचवणे सुलभ करण्यासाठी टपाल विभागासोबत एक सामंजस्य करार केला आहे, असे एका निवेदनात म्हटले आहे. या उपक्रमाचा उद्देश विभागीय कर्मचाऱ्यांद्वारे मॅन्युअल डिलिव्हरीऐवजी प्रवास आणि दैनंदिन भत्त्यांमध्ये मोठी बचत करणे आहे, ज्यामुळे मुख्य तपास कर्तव्यांसाठी मनुष्यबळाचा अधिक कार्यक्षम वापर शक्य होईल, असे संघीय एजन्सीने निवेदनात म्हटले आहे. एजन्सीच्या बेंगळुरू येथील बँकिंग सुरक्षा आणि फसवणूक शाखा आणि भ्रष्टाचार विरोधी शाखेने बुधवारी टपाल विभागाच्या कर्नाटक मंडळासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली, असे त्यात म्हटले आहे.

## द्वारका येथे अल्पवयीन मुलगी मृतावस्थेत

**नवी दिल्ली :** दिल्लीतील द्वारका परिसरात एका खोलीत एका १३ वर्षीय मुलीचा गूढ परिस्थितीत मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली. गुरुवारी दुपारी १.४५ वाजता डाबरी पोलिस ठाण्यात पीसीआर कॉल आल्यानंतर ही घटना उघडकीस आली, त्यानंतर स्थानिक पोलिस आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. सीतापुरी येथील एका तीन मजली घराच्या टेरेसवर असलेल्या खोलीत मुलीचा मृतदेह आढळला, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. ती संशयास्पद स्थितीत मृतावस्थेत आढळली.

# नौदलाने कारवाई केली तर चार तुकडे

## संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी दिला पाकला थेट इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारतीय नौदलाने कोणताही गाजावाजा न करता केलेल्या कामगिरीद्वारे प्रत्येक भारतीयाला प्रभावित केलं आहे. आपल्या सैन्याने अत्यंत शांत राहून पाकिस्तानी लष्कराला बांधून ठेवण्यात यश मिळवलं आहे. जो शांत राहूनही एखाद्या देशाच्या लष्कराला बाटलीत बंद करून ठेवू शकतो तो जेव्हा बोलू लागेल तेव्हा काय चित्र असेल याची कल्पना करा. भारतीय नौदलाने पूर्ण क्षमतेने कारवाई केली तर पाकिस्तानचे चार तुकडे होतील, अशा शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी पाकला थेट इशारा दिला.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी शुक्रवारी भारतीय नौदलाच्या ताफ्यातील स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतला भेट दिली. ऑपरेशन सिंदूरचं यश नौदलाबरोबर साजरं करण्यासाठी संरक्षणमंत्री तिथे गेले होते. यावेळी भारतीय नौदलाने अरबी समुद्रात शक्तीप्रदर्शन केलं. त्यानंतर युद्धनौकेवर आयोजित एका कार्यक्रमाद्वारे राजनाथ सिंह यांनी नौदलाच्या जवानांना संबोधित केलं. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी नौदलातील जवानांच्या शौर्याचं कौतुक केलं.

संरक्षणमंत्री म्हणाले, यावेळी पाकिस्तानी सैन्याला आपल्या फायर पॉवरचा सामना करावा लागला नाही. मात्र, जगाला माहिती आहे की पाकिस्तानने यावेळी कुठलीही नापाक हरकत (आगळीक) केली तर कदाचित त्यांच्याविरोधात भारतीय नौदल ओपनिंग करू शकतं. म्हणजेच, यावेळी भारतीय वायूदल किंवा भूदलाच्या आधी भारतीय नौदल पाकिस्तानविरोधात रणशिंग फुंकू शकतं. १९७१ हे वर्ष भारतीय नौदलाच्या सामर्थ्याचं व पराक्रमाचं साक्षीदार आहे. त्यावेळी आपलं नौदल पुढे सरसावलं आणि पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारतीय नौदलाने पाकिस्तानविरोधात मोर्चा उघडला असता तर पाकिस्तानचे चार तुकडे झाले असते.

अरबी समुद्रातून भारताने पाकिस्तानला कठोर संदेश दिला आहे. भारताची सागरी सीमा तुमच्या (नौदलाच्या) हातात आहे. तुम्ही इथे आहात म्हणून कोणी भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करत नाही.

तुमच्या आजवरच्या कामगिरीबद्दल मी तुम्हाला नमन करतो. मी आज येथे केवळ देशाचा संरक्षण मंत्री म्हणून नव्हे तर, एक कृतज्ञ भारतीय म्हणून आलो आहे. तुमच्या समर्पणाला माझा दंडवत. मी तुमच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि तुमच्या परिश्रमाला सलाम करण्यासाठी येथे आलो आहे, असेही ते म्हणाले.



### पाकिस्तान विचारही करू शकणार नाही

● पाकिस्तानने भारताविरोधात पुन्हा कोणती आगळिक केली, तर भारत त्याला चोख उत्तर देईलच. मात्र, पाकने विचारही केला नसेल, अशा पद्धतींचा वापर करण्यास भारत मागेपुढे पाहणार नाही. पाकमधील दहशतवाद्यांचे तळ उखडून टाकणे, हेच पाकच्या हिताचे आहे. जगातील कोणतीही शक्ती भारताला असे करण्यापासून रोखू शकत नाही. भारताने पाकला जे प्रत्युत्तर दिले, ते इतके शक्तिशाली होते की, पाकने संपूर्ण जगाला भारताला थांबवण्याची विनंती केली. तथापि, भारताने स्वतःच्या अटींवर लष्करी कारवाई थांबवली, असे राजनाथसिंह यांनी स्पष्ट केले.

### हाफिज सईद, मसूद अझहरला ताब्यात द्यावे

● पाकिस्तानच्या भूमीवर कार्यरत असलेल्या दहशतवादाच्या नर्सरी स्वतःच्या हातांनी उखडून टाकणे हे त्याच्या हिताचे ठरेल. त्याने हाफिज सईद आणि मसूद अझहर सारख्या दहशतवाद्यांना भारताच्या स्वाधीन करून सुरुवात करावी. हे दोघेही केवळ भारतातील 'मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्यांच्या' यादीत नाहीत तर संयुक्त राष्ट्रांच्या नियुक्त दहशतवाद्यांच्या यादीत देखील आहेत. हाफिज सईद 'मुंबई हल्ल्या'चा दोषी आहे. पाकिस्तान वारंवार चर्चेचा प्रस्ताव देत आहे. भारताने स्पष्टपणे सांगितले आहे की जर चर्चा होणार असेल तर ती दहशतवादावर, पीओकेवर असेल. जर पाकिस्तान चर्चेबाबत गंभीर असेल तर त्यांनी हाफिज सईद आणि मसूद अझहरसारख्या दहशतवाद्यांना भारताच्या स्वाधीन करावे जेणेकरून न्याय मिळेल.

# रेवंत रेड्डींनी पाकला आपला म्हटले

## तेलंगणा भाजपने घेतला खरपूस समाचार

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी गुरुवारी एका सभेत केलेल्या भाषणात ऑपरेशन सिंदूरमध्ये किती राफेल विमाने पडली असा प्रश्न पंतप्रधान मोदींना विचारला होता. यामुळे तेलंगणा आणि देशाच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. शुक्रवारी तेलंगणा भाजप युनिटने रेड्डी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आणि त्यांना राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यापासून दूर राहण्याचा आणि स्वतःला केवळ मिस वर्ल्ड फोटो ऑप्सपुरते मर्यादित ठेवण्याचा सल्ला दिला. तेलंगणाची राजधानी हैदराबादमध्ये सध्या मिस वर्ल्ड स्पर्धा सुरू आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांवर हल्ला चढवत भाजपने त्यांच्यावर ऑपरेशन सिंदूरबाबत पाकिस्तानच्या भूमिकेची पुनरावृत्ती केल्याचा आरोप केला. भाजप तेलंगणाने एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, रेड्डी यांनी राष्ट्रीय सुरक्षा मोहिमेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्यापलीकडे जाऊन पाकिस्तानला आमचा पाकिस्तान असे म्हटले आहे. हे अतिशय धोकादायक आहे. सर्जिकल स्ट्राईक आणि बालाकोटवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्यापासून ते आपल्या लष्कराची खिल्ली उडवण्यापर्यंत आणि अग्निपथ योजनेला विरोध करण्यापर्यंत... भारतासमोर उभं राहणं हे पाकिस्तानच्या डीएनएमध्ये आहे, अशा शब्दांत भाजपने रेड्डींवर घणाघात केला आहे.

या रेड्डी यांच्यावर निशाणा साधत म्हटले आहे की, रेवंत, तुम्ही स्वत:ला मिस वर्ल्ड फोटोंपुरते मर्यादित ठेवा. राष्ट्रीय सुरक्षा हा तुमचा रॅम्प नाही. देश जिंकला की काँग्रेस निराश होते. ऑपरेशन सिंदूरवर काँग्रेसतर्फे आयोजित जय हिंद रॅलीला संबोधित करताना रेड्डी म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानविरुद्ध मोहीम सुरू करण्यापूर्वी सर्वपक्षीय बैठक घेतली, पण शस्त्रसंधीपूर्वी नाही. बलुचिस्तानला पाकिस्तानपासून वेगळे करण्याची संधी आम्हाला मिळाली... पाकिस्तानला काश्मीरचे वर्चस्व काढून घेता आले असते, पण पंतप्रधान मोदी तसे करण्यात अपयशी ठरले. तेलंगणमध्ये तयार झालेल्या लढाऊ विमानांनी आपल्या देशाचा मान राखला आहे. पण नरेंद्र मोदीयांनी आणलेले राफेल विमान पाकिस्तानने पाडले. आपली किती राफेल विमाने पाडण्यात आली, यावर चर्चा होत नाही. नुकत्याच झालेल्या युद्धात आपण किती राफेल गमावले, याचे उत्तर नरेंद्र मोदीयांनी द्यावे, अशा शब्दांत रेवंत रेड्डी यांनी ऑपरेशन सिंदूरवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तसेच रेड्डी यांनी आरोप केला की, राफेल व्यवहारात मोदींच्या जवळच्या लोकांनी हजारो कोटी रुपयांचा करार केला होता, त्यानंतर राफेल भारतात आले.

# राजधानी दिल्लीत आणखी ३८ घुसखोर ताब्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिल्लीत बांगलादेशी घुसखोरांना पकडून सीमेपलीकडे परत पाठवण्याचे काम वेगाने सुरू आहे. राजधानी दिल्लीत लहान मुले आणि महिलांसह आणखी ३८ बांगलादेशी घुसखोरांना पकडण्यात आले आहे. दिल्लीत स्थायिक होण्यापूर्वी त्यांनी नूंह आणि बिहारमध्येही आपला तळ ठोकण्याचा प्रयत्न केला होता, पण तिथे अपयश ी ठरल्यानंतर त्यांनी राजधानीत तळ ठोकला.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेतलेले आरोपी आधी हरियाणातील नूह आणि नंतर बिहारला गेले होते. नंतर ते दिल्लीला पोहोचले. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बांगलादेशी नागरिकांनी बिहारमध्ये स्थायिक होण्याचा प्रयत्न केला, परंतु संपर्क प्रस्थापित करण्यात आणि येथे उपजीविकेची व्यवस्था करण्यात त्यांना अपयश आले. त्यानंतर तो दिल्लीला गेला, जिथे तो कारखान्यांमध्ये काम करू लागला आणि बेकायदा वस्त्यांमध्ये राहू लागला.

अटक केलेल्यांमध्ये महिला आणि लहान मुलांचा समावेश आहे. हे सर्व अवैध बांगलादेशी स्थलांतरित असून त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे नाहीत. गुरुवारी पूर्व जिल्हा पोलिसांनी पाच बांगलादेशींना अटक केली, त्यापैकी तीन अल्पवयीन होते.

बांगलादेशी घुसखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी गेल्या वर्षी १९ नोव्हेंबरला मोहीम हाती घेतली होती.

आतापर्यंत शेकडो बांगलादेशींना अटक करण्यात आली आहे. अनेकांना बांगलादेशात परत पाठवण्यात आले आहे. या लोकांच्या अटकेमुळे घुसखोरांना बनावट आधारसह अनेक प्रकारची कागदपत्रे देणारे अनेक नेटवर्कही उघड झाले आहेत. पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर दरम्यान घुसखोरांची ओळख पटवण्याचे प्रमाण वाढले आहे.

# अभियंत्याच्या घरी सापडली कोट्यवधींची माया

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ओडिशाची राजधानी भुवनेश्वरमध्ये दक्षता विभागाने राज्य सरकारचे मुख्य अभियंता बैकुंठनाथ सारंगी यांच्या निवासस्थानासह सात ठिकाणी छापे टाकल्याने खळबळ उडाली. जप्त केलेले मुद्देमाल पाहून सर्वच जण अवाक झाले होते. २.१ कोटी रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम त्यांच्या घरातून जप्त करण्यात आली आहे. दरम्यान, बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याच्या संशयावरून हे छापे टाकण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार सारंगी यांनी घोषित केलेल्या मालमत्तेमध्ये आणि त्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नात मोठी तफावत असल्याचे उघड झाले आहे.

या संपूर्ण घटनेतील सर्वात नाट्यमय भाग तेव्हा घडला जेव्हा दक्षता अधिकारी त्याच्या घरी पोहोचले. बैकुंठनाथ सारंगी घाबरले. अशा परिस्थितीत त्यांना काय करावं हे सुचले नाही. त्यामुळे घाबरून त्यांनी त्यांच्या फ्लॅटच्या खिडकीतून रोख रकमेचे गठ्ठे बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला. या कारवाईमुळे अधिकाऱ्यांना सतर्कता मिळाली आणि संपूर्ण परिसरात तातडीने पाळत ठेवली. जमिनीवर पडल्यानंतर गठ्ठे मोजण्यात आले आणि नंतर ते पिशव्यांमध्ये भरून घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.



**स्वित्झर्लंड** स्वित्झर्लंडमधील ब्लॅटन गावावर हिमनदी कोसळल्याने, हे गाव पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. बचाव पथके येथील बेपत्ता व्यक्तींचा शोध घेत असताना, त्यांना काहीही सापडले नाही. अखेर ही मोहीम थांबवण्यात आली.

# युट्युबर अजय शुक्ला याच्याविरोधात अवमान कारवाई




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चंदीगडमधील पत्रकार आणि युट्युबर अजय शुक्ला यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी अवमान कारवाई सुरू केली. शुक्ला यांनी आपल्या यूट्यूब चॅनेलवर अपलोड केलेल्या व्हिडिओमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या काही न्यायाधीशांबद्दल अपमानजनक आणि अपमानास्पद टिप्पणी केली होती. मुख्य न्यायमूर्ती बी. आर. गवई, न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह आणि न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. आक्षेपार्ह व्हिडिओ तात्काळ काढून टाकण्यात यावा आणि चॅनेलला हा व्हिडिओ किंवा तत्सम मजकूर पुन्हा अपलोड करण्यापासून रोखण्यात यावे, असे निर्देश खंडपीठाने दिले. वरप्रद मीडियाचे मुख्य संपादक शुक्ला यांनाही नोटीस बजावली आहे.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ही निरीक्षणे अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाची स्वत:हून दखल घेतल्याबद्दल त्यांनी खंडपीठाचे आभार मानले. अजय शुक्ला यांनी या व्हिडिओ क्लिपमध्ये या न्यायालयातील काही वरिष्ठ न्यायाधीशांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. युट्युबवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होणाऱ्या अशा मानहानीकारक आरोपांमुळे न्यायव्यवस्थेच्या प्रमुख संस्थेची बदनामी होण्याची शक्यता आहे. राज्यघटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी दिली आहे, परंतु अशा अधिकारावर वाजवी निर्बंधांनीही निर्बंध घातले आहेत, असे खंडपीठाने म्हटले आहे.

न्यायालयातील न्यायाधीशांवरील अपमानजनक आरोपांना परवानगी देता येणार नाही. अशा प्रकारच्या टिप्पण्या अवमानकारक असून न्यायव्यवस्थेची बदनामी करणारी आहेत. आम्ही स्वत:हून दखल घेत अजय शुक्ला यांच्याविरोधात अवमान खटला दाखल करण्याचे आदेश रजिस्ट्रीला देतो, असे न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे. युट्युब चॅनेलला प्रतिवादी करण्यात येणार आहे. ॲटर्नी जनरल आणि सॉलिसिटर जनरल यांना न्यायालयाला मदत करण्याची विनंती केली जाते. यूट्यूब चॅनेलने व्हिडिओचे प्रकाशन थांबवावे आणि तो त्वरित काढून टाकावा, असे अंतरिम आदेश खंडपीठाने दिले आहेत. शुक्ला यांनी नुकताच न्यायाधीश बेला एम त्रिवेदी यांच्याविरोधात टिप्पणी करणारा एक व्हिडिओ पोस्ट केला होता.

# पिसुर्टी रेल्वे गेटमुळे वाहतुक होतेय जाम

## पुणे-मिरजदरम्यान दररोज धावतात ४० रेल्वे गाड्या | दिवसातून चाळीस वेळा बंद होते रेल्वेगेट | दरवेळी अर्धा तास वाहतूक होते जागेवरच जाम | प्रवाशांच्या वेळेचा, वाहतुक कोंडीचा प्रशासनाला विसर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुणे मिरज रेल्वेमार्गावर दर दिवशी ४० प्रवाशी व मालवाहतुक करणा-या रेल्वे गाड्या दिवसातून ये - जा करीत आहेत. तर पुणे- पंढरपुर पालखीमार्गावरील वाढलेल्या वाहतुकीमुळे नीरा वाल्हे दरम्यान पिसुर्टी येथील पंढरपूर पालखी मार्गावरील रेल्वे गेट दिवसांतून ४० वेळा बंद होत असल्याने स्थानिक नागरिकांसह वाहनधारकांना दर वेळी अर्धा तास जागेवर थांबावेच लागते. तर रेल्वेक्रॉसिंग वरील रस्ता व रेल्वे रुळ समांतर नसल्याने दुचाकीस्वार घसरून पडत आहेत. रेल्वेगाडी येण्याअगोदर रेल्वे गेट बंद झाल्यानंतर तासन -तास वाहतुक जाम होत आहे. पिसुर्टी रेल्वे गेटवर उड्डाणपुल बांधण्यास प्रशासन का दुर्लक्ष करतेय असा प्रश्न प्रवाशांना सतावत आहे.

पुणे रेल्वे विभागात एकूण ९६ रेल्वे गेट असून, यांतील निम्म्याहून अधिक ठिकाणी रेल्वे गेट बंद करण्यात आले आहेत. बहुतांश ठिकाणी भुयारी मार्ग करण्यात आले आहेत. त्यामुळे त्या भागांतील वाहनधारकांना सोईचे झाले आहे. पण उर्वरित ठिकाणी रेल्वे गेट नसल्याने वाहनधारकांना जाण्या येण्यासाठी अर्धा अर्धा तास गेट उघडण्याची वाट पाहावी लागत आहे. पुणे मिरज लोहमार्गावर नीरा वाल्हे दरम्यान पिसुर्टी गावच्या हद्दीतील पुणे पंढरपूर पालखी मार्गावरील रेल्वे गेट हे धोकादायक गेट झाले आहे. या रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण झाल्याने रेल्वेच्या प्रवासी व मालवाहतूकीच्या गाड्यांची संख्या वाढली आहे. तसेच पंढरपूर पालखी मार्गावर देखील वाहनांची संख्या वाढली आहे. परिणामी रेल्वे गेट लागल्यावर वाहनांच्या दुतर्फा मोठ्या रांगा लागत आहेत. या रेल्वे गेटमुळे वाहन चालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

पिसुर्टी रेल्वे क्रॉसिंगमधील रेल्वे रुळ व पालखी मार्ग समांतर नाही. रेल्वे मार्गाला तीव्र वळण असल्याने दोन पैकी एक रुळ थोडे उंच आहे. लोहमार्गाचे दुपदरीकरण झाल्यानंतर आता या मार्गात चार रेल्वे रुळ झाले आहेत. या रुळांवरून दररोज हजारो वाहने ये जा करीत असल्याने पावसाळ्या व्यतिरिक्त ही रात्री अपरात्री दुचाकीस्वार रुळांवरुन घसरतात.

पिसुर्टी रेल्वे क्रॉसिंगमध्ये पावसाळ्यात मोठ्याप्रमाणात पाणी येते. पालखी मार्गाच्या वाल्हे बाजूने तीव्र उतार आहे. तसेच टेकडी ही आहे. पाऊस पडल्यावर या टेकडीवरुन व डांबरी रस्त्यावरचे पाणी थेट रेल्वे क्रॉसिंगमध्ये येते. रेल्वेचे व रस्त्यावरील वाहनांतून गळणारे ऑइल यामुळे रस्ता निसरडा होतो. परिणामी दुचाकीस्वार घसरून पडत व जखमी होतात. याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

पुणे - मिरज रेल्वे मार्गावरून दिवसभरात सर्व प्रकारच्या किमान ४० रेल्वेगाड्या व काही मालगाड्या नियमित धावतात. रेल्वेगाडी येण्यापूर्वी हे रेल्वे गेट किमान तीन मिनिटे अगोदरच बंद केले जाते. तर गाडी गेल्यावर दीड मिनिटांनी गेट उघडते. या रस्त्याने आलेल्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. रेल्वे गेटमुळे महत्त्वाच्या कामासाठी जाणा-यांना तसेच अत्यावश्यक सेवा देणा-या रूग्णवाहिकांनादेखील ताटकळावे लागते. प्रवाशांच्या अतितातडीची वैद्यकीय मदतीची गरज असणा-या व गोल्डन अवर्समध्ये असणा-या रूग्णांच्या अमुल्य वेळेचा प्रशासनाला विसर पडलेला दिसत असल्याची भावना प्रवाशी बोलून दाखवित आहे.




### दोन वर्षांपूर्वीच उड्डाणपूल मंजूर

● संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पुर्वतयारीच्या निमित्ताने महाराष्ट्राचे तत्कालीन सार्व. बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण ९ जून २०२३ रोजी नीरा येथील पालखीतळावर आले होते. स्थानिक नागरिकांनी पिसुर्टी रेल्वे गेटच्या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचे निवेदन दिले होते. मंत्री चव्हाण यांनी महिनाभरात पुल मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते. याठिकाणी दोन वर्षांपूर्वीच उड्डाणपूल मंजूर झाल्याचे पत्र ही समाज माध्यमांवर फिरले पण, पुलाचे काम गुलदस्त्यातच राहिले. मात्र, प्रवाशांच्या होणा-या मनस्तापाबाबत प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.

# सोमेश्वरचे ऊस लागवड धोरण जाहीर

## जुलैपासून ऊस लागवड हंगाम सुरू, पट्टा पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नीरा :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने २०२५-२६ साठी पाडेगाव ऊस संशोधन केंद्र व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांच्या सल्ल्याने ऊस लागण धोरण जाहीर केले. आडसाली लागणी १ जुलैपासून सुरू होणार आहे. पूर्वहंगामी सप्टेंबर ते २९ नोव्हेंबर, सुरू हंगाम १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारीदरम्यान होईल. याबाबत सोमेश्वर कारखान्याने पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. २ जुलै ते ३ जुलैपर्यंत लागण नोंदी बंद राहणार आहेत. ४ ते १४ जुलैपर्यंत लागण नोंदी ज्या-त्या तारखेस घेणे चालू राहील. १५ जुलैपर्यंत लागण नोंदी जास्त आल्यास त्याचा ड्रॉ काढण्यात येणार आहे. तसेच यंदा हार्वेस्टरने ऊस तोडणी करण्यात येणार असून सभासदांनी लागण करताना पट्टा पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन सोमेश्वरचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी केले आहे.

सोमेश्वर सह साखर कारखान्याने आडसाली हंगामासाठी को-८६०३२, व्हीएसआय ९८०५, कोएम ०२६५ या ऊसजातींसाठी १ जुलै १४ ऑगस्टदरम्यान परवानगी देण्यात आली आहे. पूर्वहंगामीसाठी को-८६०३२, व्हीएसआय ९८०५, कोएम ०२६५, व्हीएसआय १०००१, फुले १५०१२, फुले १३००७, व्हीएसआय ०८००५ या ऊसजातींसाठी १ सप्टेंबर ते २९ नोव्हेंबर यादरम्यान परवानगी दिली आहे. एमएस १०००१, को-८६०३२, व्हीएसआय ०८००५, व्हीएसआय ९८०५, फुले १५०१२, फुले १३००७, कोएम ०२६५ या ऊसजातीसाठी १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारीदरम्यान सुरू लागवडीसाठी परवानगी देण्यात आली आहे.

हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या सर्व जातींच्या खोडवा उसाच्या नोंदी घेण्यात येणार आहेत. रोप लागण ज्या दिवशी शेतात केली जाईल, त्या दिवशीचीच लागण तारीख नोंद घेतली जाईल. रोप लागणीस प्राधान्याने तोड देण्यात येणार आहे. सभासदांनी त्यांच्या एकूण ऊस लागण क्षेत्रापैकी आडसाली ४० टक्के, पूर्वहंगामी १५ टक्के, सुरू १० टक्के आणि खोडवा ३५ टक्के या प्रमाणात ऊस लागण्याचे नियोजन करण्याचे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले.

'सोमेश्वर 'च्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांनी उसाची लागण ४.५ फूट किंवा ५ फूट पट्टा पद्धतीने करावी, त्यामुळे प्रतिएकरी ऊस उत्पादनात वाढ होईल. पट्टा पद्धतीने लागवड केल्यामुळे उसावरील कीड व रोग नियंत्रित करणे सोपे जाते. हार्वेस्टरने तोडणीकरिता पट्टा पद्धतीने लागण करून हार्वेस्टरद्वारे ऊसतोडणीला प्राधान्य देण्यात येत असल्याने सर्व सभासदांनी रुंद सरी अथवा पट्टा पद्धतीचा अवलंब करावा. लागण तारखेनुसार ऊसतोडीसाठी आडसाली हंगामातील सर्व ऊस जातींच्या रोपांना प्राधान्याने तोड देण्यात येईल सभासदांनी आडसाली ऊस सरसकट कापून काढल्याचे निदर्शनास आल्यास त्या उसाची लागण तारीख रद्द होईल व सभासदांना त्या उसाची लागण तारीख पुन्हा नव्याने देणे बंधनकारक राहील. उसाची नव्याने दिलेली नोंद खोडवा म्हणून घेण्यात येईल. अशा खोडव्यास कोणत्याही प्रकारचे अनुदान लागू होणार नाही. सभासदांनी ऊसनोंद बोगस केल्यास पाचशे रुपये ऊसबिलातून वसूल केले जाणार आहेत.



> हार्वेस्टरने ऊसतोडणी करण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे. सभासदांनी शेतात किमान साडेचार फूट अंतर ठेवून ऊस लागवड करावी. सोमेश्वर कारखाना यांत्रिकीकरणाला प्राधान्य देत असून, हार्वेस्टरमार्फत तोडणी झाल्यास प्रतिटन ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय सोमेश्वर कारखान्याने घेतला आहे. सभासदांनी कारखान्याकडे नोंदविलेला ऊस संमतीशिवाय इतर कारखान्यास देऊ नये; अन्यथा साखर, ऊस रोपे, ऊस बियाणे, ताग, सोयाबीन बियाणे, कंपोस्ट खत आदी सवलती बंद करण्यात येणार आहेत.
>
> **— पुरुषोत्तम जगताप,** चेअरमन, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना



**माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या मोहिते वाड्यावर दिवसभर गर्दीचा महापुर लोटला होता. (छाया - निखिल पाचारणे)**

# दिलीप मोहिते पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** पद नसतानाही लोकांच्या सेवेत सतत कार्यरत असलेले खेड तालुक्यातील एकमेव नेतृत्व म्हणजे दिलीप मोहिते पाटील आहेत. मतदार संघात विकास कामांचा ओघ त्यांनी कायम ठेवला आहे. अहोरात्र जनसंपर्कात राहिल्याने त्यांच्याकडून जनतेची सुध्दा अपेक्षा तीच आहे, जी आमदार असताना होती.अशा कार्यमग्न नेत्याची दखल भविष्यात घेतली जाईल अशी अपेक्षा व्यक्त करून खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती लक्ष्मण टोपे यांनी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देताना गौरवोद्गार काढले.

खेड आळंदी विधानसभा मतदारसंघाचे तीन वेळा आमदार राहिलेले दिलीप मोहिते पाटील यांचा वाढदिवस गुरुवारी (दि २९) विविध उपक्रम, कार्यक्रमांनी साजरा झाला. यावेळी शुभेच्छा देताना माजी सभापती लक्ष्मण टोपे बोलत होते. दरम्यान माजी आमदार मोहिते पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी तालुक्यातील नागरिकांची गर्दी झाली होती. येथील सिध्देश्वर मंदिरात सकाळी अभिषेक करून वाढदिवसाच्या कार्यक्रमांचा प्रारंभ करण्यात आला. राजगुरुनगर , चाकण आणि आळंदी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विविध उपक्रम राबविले.. याशिवाय अवकाळी स्थितीमुळे पुष्पगुच्छ, बुके ऐवजी वह्या, पुस्तके भेट देऊन शुभेच्छा देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला तालुक्यातील कार्यकर्ते, नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. राजगुरुनगर येथील त्यांच्या मोहिते वाड्याच्या प्रांगणात दिलीप मोहिते पाटील व पत्नी सुरेखाताई मोहिते पाटील यांनी शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी कुटुंबातील बंधु, पुतणे, सुना, नातवंडे आदी सदस्य देखील उपस्थित होते.

# कांद्याची सततच्या पावसामुळे दाणादाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** मागील पंधरा दिवसांपासून पावसाची संततधार सुरु असल्याने कांदा पिकाची दाणादाण होऊन शिरुर तालुक्यात कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. तालुक्यात मागील वर्षी बाजरी, गहू,हरभरा, तुर व मका आदि नगदी पिके चांगली झाली. विहीर व कुपनलिकेचा भरोसा नसल्याने कधी नव्हे ते तालुक्यात उन्हाळी कांद्याची विक्रमी लागवड झाली आणि उत्पादन देखील भरघोस झाले.

हजारो हेक्टर क्षेत्रातील कांदा शेतात असतानाच सुरु झालेला अवकाळी पाऊस थांबायचे नाव घेत नसल्याने अडचण निर्माण झाली आहे. तालुक्यात होत असलेल्या अवकाळी पावसामुळे खरीप हंगामाचे पूर्वनियोजन काहीसे बिघडले आहे, मात्र या पावसामुळे जमिनीत निर्माण झालेला ओलावा लक्षात घेता काही पिकांसाठी परिस्थिती अनुकुल ठरली आहे. दरम्यान, अवकाळी पावसामुळे काढणीस आलेल्या भुईमूगाला बुरशीचा धोका वाढला आहे. शेंगा काळ्या पडत असून, मोड येण्याची शक्यता आहे. उन्हाळी बाजरी अद्याप शेतात उभी आहे. पिकांची मागणी घटल्यामुळे दर कोसळूले आहेत. दरम्यान, तालुक्यात समाधानकारक पाऊस पडत असल्याने विहिरी व तलावात पाणी येऊ लागले आहे.तर छोटे बंधारे भरुन ओसंडून वाहू लागले आहेत.

### पावसाने समाधान, तरीही नुकसानाची चिंता

● सर्वाधिक पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला होता. हंगामपूर्व पाऊस झाल्यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असले तरी या पावसामुळे कांद्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत. आगामी मान्सून आगमनापूर्वी सर्व कामे उरकण्यासाठी शेतकरी पावसाच्या विश्रांतीची आतुरतेने वाट पहात आहे, असे प्रगतिशील शेतकरी संतोष झंजाड यांनी सांगितले.



अण्णापूर, ता.शिरुर येथे अवकाळी पावसामुळे कांद्याची अशी अवस्था झाली आहे. छायाचित्र - पोपट पाचंगे, कारेगाव.)

# अवसरी बुद्रुक येथील नवीन इमारत धुळखात उभी




**अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) येथील नवीन तलाठी कार्यालय इमारतीचे काम पूर्ण झाले, मात्र तलाठी कार्यालयात नवीन फर्निचर पाहिजे म्हणून तलाठी कार्यालयाची**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे सुमारे २८ लाख रुपये खर्च करून तीन महिन्यापूर्वी अद्यावत तलाठी कार्यालय इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, ग्राम महसूल अधिकारी तलाठी कार्यालयात नवीन फर्निचर पाहिजे या आठाहासापायी आजही तलाठी कार्यालय जुन्या अपुऱ्या जागेत चालू असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक या गावात पेशवे कालीन कचेरी होती. त्या जागेत मागील अनेक दशके तलाठी कार्यालयाचे काम सुरू होते. काळाच्या ओघात इमारत जीर्ण झाल्याने तलाठी कार्यालय इतरत्र सुरू केले होते. अवसरी बुद्रुक ग्रामस्थ मागील पंधरा सोळा वर्षांपासून या ठिकाणी पुन्हा शासकीय तलाठी कार्यालय व्हावे, अशी मागणी करत होते. त्याला यश येत नव्हते. अखेर अवसरी बुद्रुकचे पत्रकार जयेश शहा यांनी तलाठी कार्यालय मंजूर व्हावे, यासाठी ५ एप्रिल २०२३ रोजी उपोषणाचा इशारा दिला होता. जिल्हा नियोजन मंडळाचे सचिव किरण इंदलकर, तत्कालीन प्रांत सारंग कोडलकर, तहसीलदार रमा जोशी, मंडल अधिकारी विश्वास शिंदे, तलाठी संकेत गवारे व तत्कालीन सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे स्वीय सहाय्यक रामदास वळसे पाटील यांच्या प्रयत्नाने जिल्हा नियोजन मंडळातून तलाठी कार्यालयासाठी निधी मंजूर झाला.

मागील तीन महिन्यापासून इमारत पूर्ण असून, या इमारतीसाठी फर्निचर नसल्याने तलाठी कार्यालय ग्रामपंचायतच्या जुन्या छोट्या खोलीत सुरू आहे. या इमारतीत चार माणसे सुद्धा नीट बसू शकत नाहीत. अशा इमारतीत सध्या तलाठी कार्यालयाचे काम सुरू आहे. या कार्यालयात अवसरी बुद्रुक, गावडेवाडी, टाव्हरेवाडी या तीन गावांचा महसुली कारभार चालतो, मात्र एवढी प्रशस्त इमारत तयार झाली असून, या प्रशस्त इमारतीत टेबल खुर्ची घेऊन कामकाज होऊ शकते असे असताना देखील ही नवीन इमारत फर्निचरच्या प्रतीक्षेत अजूनही छोट्या खोलीत असून मोठ्या प्रशस्त इमारतीत तात्काळ चालू करावे यासंदर्भात जुन्नर आंबेगावचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की तलाठी कार्यालयातील नवीन फर्निचरसाठी निधी उपलब्ध होईल तेव्हा होईल तातडीने जुन्याच फर्निचरमध्ये नवीन इमारतीत तलाठी कार्यालयाचे कामकाज चालू करण्याच्या सूचना संबंधित तलाठ्याला देण्यात येईल.

# नामांकित कंपनीच्या बनावट साहित्याची विक्री

**उरुळी कांचन :** आंतरराष्ट्रीय बाजारातील नामांकित अशा सेंट - गोबेन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या बनावट साहित्यांची विक्री करण्याचा प्रकार उरुळी कांचन येथे उघडकीस आला आहे. मंगळवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील गारवा हॉटेल समोर, सोलापुर-पुणे रोडचे बाजुला गट नं. ३५१ मधील राठोड जिप्सम एजन्सी येथे हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात लक्ष्मण सोहनलाल राठोड (वय २६, सध्या रा. कृष्णा बिल्डींग, फ्लॅट नं. ५३०, डाळिंब रोड, उरुळी कांचन ता. हवेली) याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी साजिद असगरअली अन्सारी (वय ३४) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, आरोपी लक्ष्मण राठोड याच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. नंदू मुलमुले यांचे बारामतीत आज व्याख्यान



**बारामती :** तणावग्रस्त जीवनशैलीमुळे अनेकांना वैफल्याला सामोरे जावे लागते, पालक असो वा विद्यार्थी अनेक जणांना विविध कारणांमुळे निराशा येते, याचे पर्यवसान अनेकदा नको त्या घटनांमध्ये होते. याचा विचार करुन एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. नंदू मुलमुले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (ता. ३१) संध्याकाळी सहा वाजता विद्यानगरीतील गदिमा सभागृहात यशाकडून आनंदाकडे या विषयावर बारामतीकरांशी संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. रसिक बारामतीकरांची अभिरुची अधिक संपन्न व्हावी, प्रतिभावंतांशी त्यांना हितगुज साधता यावे, त्यांचे विचार ऐकता यावेत या उद्देशाने एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने खासदार सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबिंब व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. मनांतरी, संभ्रमाचे सांगाती, जग बदलणा-या मनाच्या प्रयोगशील कथा, महाकवी दुःखाचा- मिर्झा गालिब, व्यथा-कथा या सारख्या पुस्तकांचे डॉ. मुलमुले यांनी लेखन केले आहे. मनोचिकित्सा क्षेत्रात त्यांना चार दशकांहून अधिक काळाचा अनुभव आहे.

# लाला बँकेला उत्कृष्ठ नागरी सहकारी बँक पुरस्कार



**नारायणगाव :** नारायणगाव येथील लाला अर्बन या बँकेने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षामध्ये उल्लेखनीय कामकाज केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या उत्कृष्ट नागरी सहकारी बँकेच्या स्पर्धेमध्ये पुणे विभागामधून ५०० कोटीपर्यंतच्या ठेवी असलेल्या बँकामधुन सन २०२३-२०२४ सालासाठी पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ठ नागरी सहकारी बँक पुरस्कारासाठी लाला बँकेची निवड करण्यात आली असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष युवराज बाणखेले यांनी दिली. याबाबतचे लेखी पत्र महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन यांचे आले असल्याचे त्यांनी सांगितले. बँकेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार ,कर्जदार यांनी बँकेवर दाखविलेला विश्वास आणि बँकेचे कर्मचारी, मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी बँक व्यावसायवाढीसाठी प्रामाणिकपणे व तळमळीने केलेले काम यामधून हे यश संपादन झाले आहे. याची दखल महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन यांनी घेवून लाला बँकेस पुरस्कार जाहीर केला. त्याबद्दल असोसिएशनचे पदाधिकारी यांचे युवराज बाणखेले यांनी आभार मानले आहेत. बँकेचे मोबाईल बँकिंग सेवा १ जानेवारी २०२५ पासून कार्यान्वित झाली असून, यास खातेदारांचा चांगला प्रतिसाद लाभला आहे. सर्वच ग्राहकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष युवराज बाणखेले यांनी आवाहन केले.

# महावितरणला तडाखा; ९२४ खांब जमीनदोस्त



**बारामती :** मागील आठवड्यात विशेषत: २५ व २६ मे रोजी महावितरणच्या बारामती मंडलातील ६ उपकेंद्रांना व त्यांतर्गत १० उच्चदाब वाहिन्यांना मान्सून पूर्व पावसाचा सर्वाधिक फटका बसला. लघुदाबाचे ६५७ तर उच्चदाबाचे २६७ असे ९२४ खांब जमीनदोस्त झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमानंतर बहुतांश उपकेंद्रांचा वीजपुरवठा काही तासांतच पूर्ववत करण्यात महावितरणला यश आले असून, अद्याप फक्त २११३ बिगरशेती ग्राहकांचा वीजपुरवठा बंद आहे. तो पूर्ववत करण्यासाठी वीज यंत्रणा अहोरात्र झटत आहे. मुख्यालय व परिमंडलातील 'वॉर रुम' परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. महावितरण बारामती मंडलात पुण्यातील बारामती, इंदापूर, दौंड, शिरुर, पुरंदर व भोर या सहा तालुक्यांचा समावेश आहे. पूर्व मौसमी पावसाने धुमाकूळ घालत ६ उपकेंद्रांना तडाखा दिला. यामध्ये बारामती विभागातील लोणी देवकर, भिगवण, सणसर, काळेवाडी तर केडगाव विभागातील देऊळगाव व मलठण उपकेंद्रांचा समावेश आहे. या सर्व उपकेंद्राचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडे, फांद्या कोसळल्या. त्यामुळे तारा तुटून पडल्या. मात्र यंत्रणा सतर्क असल्याने कुठेही वीज अपघात घडला नाही. सुरक्षेची पूर्ण काळजी घेत वीजपुरवठा सुरु करण्यात आला आहे. बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांचे मार्गदर्शनाखाली बारामती मंडलाचे अधीक्षक अभियंता दिपक लहामगे वीजपुरवठा युद्धपातळीवर सुरु करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. 'वॉर रुम' व नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत आहेत. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी लागणारे साहित्य, विजेचे खांब, रोहित्र व ऑईलचा मुबलक पुरवठा सर्व विभागांना करण्यात आलेला आहे. तसेच सर्व वीज कर्मचाऱ्यांना मुख्यालयी व मोबाईलवर उपलब्धचे आदेशही महावितरणने दिले.

## पारगाव येथे भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट

**पारगाव :** पारगाव (शिंगवे) येथे भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून, अंगणात खेळणाऱ्या तीन वर्षाच्या मुलीवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना बुधवारी (दि. २८ ) सायंकाळी पाच वाजताच्या दरम्यान घडली. कुत्र्यांच्या हल्ल्यात बिनची विनोद चौधरी ही लहान मुलगी जखमी झाली असून तिला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय मंचर या ठिकाणी दाखल केले आहे. चौधरी कुटुंब कामानिमित्त पारगाव शिंगवे येथे वास्तव्यास असून विनोद चौधरी हे पारगाव येथील गणेश लोले यांच्याकडे वेल्डिंगचे काम करतात. बुधवारी विनोद चौधरी यांची मुलगी , बिनची चौधरी ही घराच्या बाहेर अंगणात खेळत असताना तेथे असलेल्या चार ते पाच कुत्र्यांच्या टोळक्याने तिच्यावर हल्ला करत तिच्या पाठीला, पायाला, गुडघ्याला चावा घेतला आहे. नशीब बलवत्तर म्हणून त्याचवेळी त्या ठिकाणावरून जाणाऱ्या तरुणांनी कुत्र्याना हुसकवत मुलीला कुत्र्याचे तावडीतून वाचवत कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. सदर मुलीला मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याचे कुटुंबियांनी सांगितले. दरम्यान पारगाव या ठिकाणी गेल्या काही वर्षांपासून भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट झाला असून गावात मुख्य बाजारपेठेत ये जा करणाऱ्या नागरिकांवर, लहान मुलांवर कुत्रे हल्ला करण्याच्या घटना घडत आहेत. गेल्या चार महिन्यात चार वेळा अशा घटना घडल्या आहेत. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

## मेंगडेवाडीत कालवडीवर बिबट्याचा हल्ला

**मंचर :** मेंगडेवाडी ता. आंबेगाव येथील मुकुंद बाळू टाव्हरे यांच्या दीड वर्षीय कालवडीवर बिबट्याने हल्ला करून ठार केले आहे या घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. जुन्नर वनविभागातील आंबेगाव जुन्नर शिरूर व खेड हे चार तालुके शासनाने बिबट प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. या चारही तालुक्यात बिबट्याचा मोठ्या प्रमाणावर वावर असून पाळीव प्राण्यांवर सर्वाधिक हल्ले हे आंबेगाव तालुक्यात झालेले आढळून येत आहे. मागील दोन ते तीन महिन्यापूर्वी बिबट्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला होता. त्या दरम्यान ऊस तोडणी मोठ्या प्रमाणावर सुरू होती, बिबट्याने उसालाच आपले रहिवास मानल्यामुळे ते उसाच्या शेतामध्ये राहत आहेत. ऊस तोडणीमुळे त्यांचा रहिवास नष्ट होत असल्यामुळे ते सैरभैर झाले होते, मागील महिन्यापासून सर्वच कारखान्याची धुराडी बंद झाली असून, ऊस तोडणी बंद आहे. त्यामुळे बिबट्याच्या हल्ल्याचे प्रमाण कमी झाले असले, तरी कुठे ना कुठे पाळीव प्राण्यांवर बिबट्याचे हल्ले होतच आहे. दरम्यान ३० मे रोजी मेंगडेवाडी येथील मुकुंद बाळू टाव्हरे यांच्या गोठ्यात बिबट्याने पहाटे साडेपाचच्या सुमारास हल्ला करून गोठ्यात असणारी दीड वर्षाची कालवड ठार मारली. या घटनेची माहिती मिळताच वनरक्षक अश्विनी डफळ यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन घटनेचा पंचनामा केला. या परिसरात तात्काळ पिंजरा बसविण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## मतदार नोंदणी अर्ज खात्री न करताच नामंजूर

**उरुळी कांचन :** मतदार नोंदणी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने मतदाराची नोंदणी केल्यानंतर, बीएलओच्या पातळीवर जी स्थळ व व्यक्ती तपासणीची कार्यवाही होणे गरजेचे आहे ती होत नाही. ज्या व्यक्तीने मतदार यादी मध्ये नांव यावे म्हणून नोंद केली आहे, त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा मेसेज किंवा फोन येत नाही, मात्र या मतदार नोंदणीची भारत निर्वाचन आयोगाच्या (एनव्हीएसपी) या साईटवर जाऊन सद्यस्थिती (स्टेटस) तपासल्यानंतर रिजेक्टेड ड्यु टू अपसेंट अशा कारणास्तव त्या मतदाराची नोंद नामंजूर केली जात आहे. हा त्या मतदारावर अन्याय आहे. कारण ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केल्यानंतर त्या ठिकाणी मतदाराचा मोबाईल नंबर दिलेला असतो, त्या मोबाईलवर यंत्रणेकडून मेसेज किंवा फोन जाणं गरजेचं असताना तशी प्रक्रिया पार न पाडताच, सरळ मतदारांची नोंदणी नामंजूर केली जाते. ही बाब प्रकर्षाने बऱ्याच मतदार यादीत नाव यावे म्हणून नोंदणी करणाऱ्या नागरिकांना भेडसावते आहे, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दखल घेण्याची मागणी होत आहे. बोगस मतदारांची नावे मतदार यादीत पटकन येतात पण,स्वखुशीने सरळ मार्गी आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यासाठी लागणारी मतदार नोंदणी करणाऱ्या नागरिकांना मात्र सरकार दरबारी वाईट अनुभव येतात हे प्रकार प्रशासन थांबवणार का? मतदार म्हणून नोंद करू इच्छिणाऱ्या मतदारांवर होणारा अन्याय दूर होणार का? असा सवाल सर्वसामान्य जनता विचारत आहे.

## विकसित कृषी संकल्प अभियानाची सुरुवात



**बारामती :** कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्यामार्फत विकसित कृषी संकल्प अभियान, खरीप पूर्व पीक नियोजन संदर्भात माळेगाव बुद्रुक ता. बारामती येथून सुरुवात झाली. या प्रसंगी प्राध्यापक जमदग्नी निवृत्त कडधान्य संशोधन प्रकल्प प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे प्रमुख डॉ. धीरज शिंदे, एनआयएएसएम विभाग प्रमुख डॉक्टर नितीन कुऱ्हाडे, कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी सुभाष बोराटे, राहुरी कृषी विद्यापीठाचे देशी गोवंश सुधार प्रकल्प प्रमुख डॉ. सोमनाथ माने, के व्ही के संतोष गोडसे आणि संतोष करंजे, सुपरवायझर मीरा राणे उपस्थित होते. या मान्यवरांच्या उपस्थितीत खरीप अभियानाच्या रथास हिरवा झेंडा दाखवून अभियानाची सुरुवात करण्यात आली. हे अभियान १२ जून पर्यंत प्रत्येक तालुक्यात सुरू राहणार आहे. या अभियानाच्या अंतर्गत कृषी विभागाच्या योजना, नाविन्यपूर्ण शेतीची माहिती, माती परीक्षण, ड्रोन तंत्रज्ञान, बी बियाणे आणि फळ रोपे इत्यादी विषयी मार्गदर्शन होणार असल्याचे संतोष गोडसे यांनी सांगितले.

# सांस्कृतिक युवा महोत्सव जल्लोषात



**पुरंदर** केरळ येथे साऊथ एशियन नृत्य संमेलन सांस्कृतिक युवा महोत्सव २०२५ जल्लोषात पार पडले. या महोत्सवात केरळ विधानसभेचे आमदार शफी परंबील यांचा पुणे सांस्कृतिक विभाग प्रमुख सागर रोकडे यांच्या हस्ते पारंपारिक मावळी पगडी घालून सत्कार करण्यात आला.

## केरळात साऊथ एशियन नृत्य संमेलन जल्लोषात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** केरळ येथे साऊथ एशियन नृत्य संमेलन सांस्कृतिक युवा महोत्सव २०२५ जल्लोषात पार पडला. या महोत्सवात केरळ विधानसभेचे आमदार शफी परंबील यांचा पुणे सांस्कृतिक विभागप्रमुख सागर रोकडे यांच्या हस्ते मावळी पगडी घालून सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्रातून १४ कलाकारांच्या टीम चे नेतृत्व पुणे सांस्कृतिक विभाग प्रमुख सागर रोकडे यांनी केले. यात १६ ते १८ मे २०२५ या कालावधीत नृत्य संमेलन केरळ येथील वडकरा येथे जल्लोषात झाले. या संमेलनात सहभागी राज्य यामध्ये महाराष्ट्र, पंजाब, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, गोवा, दिल्ली, नेपाळ, भूतान, आंध्र प्रदेश यांचा समावेश होता. सहभागी कलाकारांत सागर रोकडे, विशाखा रोकडे, ॲड. दिनेश भंडारे, स्वरांजली भंडारे, रितेश तपकीरे, त्रिशरण रोकडे, साहिल गायकवाड, कुणाल इतकर, सार्थक ढेरे, प्रेम चाबुकस्वार, श्रुती जाधव, जागृती कारंडे, ज्योती परदेशी, कृष्णाली सुपनर, संस्कृती सुपनर या कलाकारांचा समावेश या संमेलनात होता. याचे आयोजन जगदीश भाई यांनी केले होते.

# शिवमिती दिन जयाद्रीच्या खोऱ्यात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** हिंदवी स्वराज्याची पहिल्या लढाईचा विजय दिवस शिवमिती सोहळा सालाबादप्रमाणे शिवकालीन बेलसर गावात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

जयाद्री या पुरातन आणि ऐतिहासिक खोऱ्यातील बेलसरे गावातील शिवकालीन युद्धविरांच्या पहिल्या युद्धातील स्मृतींना यावेळी उजाळा देण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूरच्या महमुद आदिलशहाने वैशाख ११ मे शके १५७० इसवी १६४८ रोजी स्वराज्यावरील चाल करून सर सुभेदार फत्तेखानला तीन हजाराची फौज देऊन पाठवले होते. त्याने जेजुरी जवळील बेलसर या गावी कऱ्हाकाठी तळ टाकला होता. सरदार खंडोजी पाटील यांनी सरदार कावजी खासनीसला मावळत पाठवून छत्रपती शिवाजी महाराज यांना पूरंदरी बोलवले. सापळा पूर्ण करण्यासाठी मोहिमा केली, तेव्हा सरदार कावजी खासनीसने रात्री खंदक शेतात सरदार सय्यद शाहला उभा चिरला. खरी लढाई केली व कावजी खासनीस व गोदाजी बीन खंडोजीने सुभेदार फत्तेखानाच्या तळावरील छावणीत हल्ला शिवमितीला केला.

या कार्यक्रमास सदर खंडोजी पाटील यांचे बारावे वंशज विजयभाऊ पाटील-गरूड, सरपंच अर्जुन धेंडे, पोलीस पाटील पायल राऊत, ग्रामपंचायत सदस्य संभाजीराजे गरूड, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष जगताप, माजी उपसरपंच धिरज जगताप, माजी उपसरपंच महेंद्र गरूड, माजी उपसरपंच संतोष जगताप, माजी उपसरपंच बाळासाहेब हिंगणे, यूवा नेते मामासाहेब गरूड, शहाजी गरूडसर, संजय गरुड, बाळासाहेब जगताप, अनिल गरुड, हेमंत जगताप, गणेश गरूड, मयूर पिसाळ, तुषार कुदळे, सुनील गरुड, प्रशांत गरुड, प्रशांत भोईटे, संजय जगताप, भीमराव कदम, सुरेश गरुड, सचिन गरूड, हरिचंद्र जगताप, मंगेश गरूड, राजेंद्र जगताप, बबनराव माकर, बाबू मुजावर, निलेश भोईटे, बाबुराव भोईटे, राजेंद्र गरूड, नियोजन शिवमिती सोहळा समिती बेलसर आदी मान्यवर उपस्थित होते



## हाता तोंडाशी आलेला घास अवकाळीने हिरावला



नागापूर (ता.आंबेगाव ) येथे उन्हाळी बाजरीच्या कणसांना कोंब फुटले आहेत. फुटलेले कोंब फुटलेले दाखविताना शेतकरी. (छाया : किशोर खुडे).

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरी पिकाला बसला आहे. हाता तोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून घेतला असून, ऐन काढणीच्या वेळीच अवकाळी पावसाने या परिसरात धुमाकूळ घातला. त्यामुळे बाजरीच्या कणसांना आता कोंब फुटले असून, महसूल विभागाने शेती पिकांची पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.
तालुक्याच्या पूर्व भागात पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, थोरांदळे, खडकी आदी गावांमध्ये सलग पंधरा दिवस अवकाळी पावसाने अक्षरक्षः धुमाकूळ घातला. त्यामुळे शेती पिकांमध्ये अनेक दिवस पावसाचे पाणी साठून राहिले. अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका उन्हाळी बाजरीला बसला. उन्हाळी बाजरी पिकाची काढणी सुरू झाली असताना अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे बाजरीची कणसे काळी पडली. आता अनेक शेतामध्ये कणसांना कोंब फुटले आहेत.
उन्हाळी बाजरीच्या पिकाचा शेतकऱ्यांना दुहेरी फायदा मिळतो. खाण्यासाठी धान्य व जनावरांसाठी वैरण या पिकापासून मिळते. तथापि, आता बाजरीचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाल्याने धान्य, वैरण देखिल मिळणार नसल्याची खंत नागापूर येथील शेतकरी तेजस नवनाथ मिंडे यांनी व्यक्त केली.

## पिंगोरी खोऱ्यातील जलसागर पूजा उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** पुरंदर जयाद्री खोऱ्यातील सैनिकांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंगोरी ग्राम क्षेत्रातील श्री गणेश जलसागर धरण यंदाच्या मे महिन्यातील आश्चर्यजनकरित्या पडलेल्या अवकाळी पावसामुळे तुडुंब भरून वाहत आहे. ग्रामस्थांनी एकत्र येऊन या जलसागराचे ओटी पूजन केले. यावेळी वाघेश्वरी देवस्थान अध्यक्ष पोपट शिंदे, ग्रामसरपंच संदिप यादव तसेच शशिकांत चौधरी, गोरख शिंदे, अभिनेते विनोद शिंदे, रणजित शिंदे, प्रदीप गायकवाड, ठकसेन भोसले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.
दहा वर्षांपूर्वी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या सहकार्यातून धरणातील गाळ काढण्यात आला होता. तसेच या वर्षीही सेटरीज संस्थेमार्फत गाळ काढायचा होता. या करिता दोन कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती. तथापि, शासनाच्या दिरंगाईमुळे शासकीय अनुमती मिळू शकली नसल्याची खंत येथील सामाजिक कार्यकर्ते राजकुमार शिंदे यांनी व्यक्त केली. यावर्षी नाम फाऊंडेशन आणि टाटा मोटर्स मार्फत संपूर्ण नाला ओढे खोलीकरणामुळे पिंगोरी गावाचा पाणी प्रश्न मिटला असून, पाणी साठाही वाढला आहे.



# वडगावपीरातील शेतकऱ्यांचे आगळेवेगळे नियोजन



वडगावपीर (ता.आंबेगाव ) येथे बोलाईवाडा-चिंध्यादेव तलावात पाणी आले. त्यामूळे जल्लोश करताना शेतकरी.

कौतुकास्पद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगावचा पूर्व भाग हा कायम दुष्काळीभाग म्हणून ओळख. कारण या भागातील शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे शेती ही फक्त पावसाळ्यातच केली जाते. शेतीत ठोस उत्पन्न नसल्यामुळे नोकरी व्यवासायानिमित्ताने या भागातील बहुतांश तरूणवर्ग हा शहराकडे वळलेला दिसत आहे. अशा विपरीत परिस्थितीमध्ये वडगावपीर (ता. आंबेगाव ) गावातील शेतकऱ्यांनी मात्र आगळेवेगळे नियोजन करून सर्वांच्या दृष्टीस एक आशादायी चित्र निर्माण केले आहे. आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यासाठी एक आदर्श ठरेल असा उपक्रम राबवला आहे. गावातील काही शेतकऱ्यांनी अधिका-अधिक संख्येने एकत्र येऊन शेतीसाठी पाणी नेण्याचे शिवधनुष्य उचलून, तो उपक्रम यशस्वी होताना दिसत आहे. यासाठी वडगावपीर (ता. आंबेगाव ) येथील खालचा पोखरकर मळा येथून डिंभे धरणाचा उजवा कालवा जात आहे, तेथून बंद पाईपलाइनद्वारे शेतीसाठी पाणी नेण्याचा वडगावपीर येथील ग्रामस्थ-शेतकऱ्यांचा पाणी आणण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी या शेतकऱ्यांनी डिंभे उजव्या कालव्यावर वडगावपीर येथील शेतकऱ्यांनी श्री पीरसाहेब उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून पोखरकर मळा हे अंतर अंदाजे दोन किमी आहे, त्यासाठी सहा इंचीच्या एक पाईपलाईन मधून पाणी आणून गूळवे वस्ती येथील बोलाई वाडा-चिंध्यादेव पाझर तलावात पाणी टाकले. यावेळी ग्रामस्थांनी जल्लोश केला. त्यासाठी २० एचपीचा एक विद्युत पंप बसविला जाणार आहे.

या योजनेसाठी दत्ता सांडभोर, माजी उपसरपंच रवींद्र गुळवे, उद्योजक तानाजी राजगुडे, ॲड. अवधूत तात्या राजगुडे, सत्यवान वाळुंज, बाळासाहेब जाधव, बाबुराव वादक, उद्योजक नरहरी आदक, रमेश आदक, अनिकेत आदक, आकाश वाळुंज, युवा नेते अक्षय वाळुंज, दशरथ राजगुडे, सुखदेव सांडभोर, चंद्रकांत गुळवे ,संतोष गुळवे, हनुमंत रोकडे,भिमाजी रोकडे, अशोक आदक व बाळशिराम वाळूंज यांनी विशेष प्रयत्न केले.

> माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी या योजनेसाठी व इतर कामासाठी विशेष सहकार्य केले. गावातील सर्व शेतकरी व मान्यवरांच्या हस्ते बोलाईवाडा- चिंध्यादेव तलावात आलेल्या पाण्याचे पूजन करण्यात आले. ही घटना येथील शेतकऱ्याच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.
>
> **-अक्षय वाळूंज**, वडगावपीर

# व्योमव्यापी कारकिर्द

भारतीय हवाई दलाच्या हेलिकॉप्टर पायलट म्हणून सन्मानित विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ७ मे २०२५ रोजी नवी दिल्ली येथे एका महत्त्वपूर्ण पत्रकार परिषदेचे नेतृत्व केले. यावेळी त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'ची उद्दिष्टे आणि परिणामांबद्दल माहिती दिली. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मधील दहशतवादी छावण्यांविरुद्ध केलेली ही अत्यंत महत्त्वपूर्ण कारवाई होती. तेव्हा आज आपण विंग कमांडर व्योमिका सिंग कोण आहेत, याविषयी जाणून घेऊ या.

विंग कमांडर व्योमिका सिंग भारतीय हवाई दलाच्या एक धाडसी आणि प्रेरणादायी अधिकारी आहेत. २०२४ मध्ये प्रजासत्ताक दिनी त्यांनी भारतीय हवाई दलाच्या महिला मोटारसायकल संघाचे नेतृत्व केले होते आणि तेव्हाच त्यांचे नाव प्रसिद्धीच्या झोतात आले होते. ही कामगिरी केवळ त्यांच्यासाठीच नाही तर संपूर्ण महिला सक्षमीकरणासाठी एक मैलाचा दगड ठरली.

व्योमिका हे नाव संस्कृत शब्द 'व्योम' पासून आला असून त्याचा अर्थ 'आकाश' असा होतो. लहानपणापासूनच या मानिनीला आकाशात उडण्याचे स्वप्न होते. शालेय शिक्षणादरम्यान त्यांनी राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) मध्ये भाग घेतला आणि नंतर अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली. यानंतर त्यांनी भारतीय हवाई दलात सामील होण्याचा निर्णय घेतला. व्योमिका सिंह यांनी देशातील महिलांना सक्षम करण्यासाठी अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतला आहे. त्यांची कारकिर्द भारतीय महिलांना देशाच्या संरक्षण सेवांमध्ये सामील होण्यासाठी प्रेरित करणारी आहे.

मानिनी

१८ डिसेंबर २००४ रोजी भारतीय हवाई दलात हेलिकॉप्टर पायलट म्हणून नियुक्त झालेल्या व्योमिका सिंग या पहिल्या महिला अधिकारी आहेत. आतापर्यंत त्यांनी जम्मू आणि काश्मीर तसेच ईशान्य भारतासारख्या कठीण प्रदेशात 'चेतक' आणि 'चित्ता' हेलिकॉप्टर उडवून २,५०० पेक्षा अधिक तास उड्डाण केले आहे. त्यांच्या सेवांमध्ये बचाव कार्य, उंचावर उड्डाण आणि इतर महत्त्वाच्या मोहिमा समाविष्ट आहेत. २०२१ मध्ये हिमाचल प्रदेशातील मणिरंग (२१,६५० फूट) पर्वतावर झालेल्या त्रि-सेवा सर्व-महिला मोहिमेत व्योमिका सिंग सहभागी होत्या. या साहसी मोहिमेतील त्यांच्या सहभागाने भारतीय सैन्यात महिलांच्या वाढत्या नेतृत्वभूमिका प्रतिबिंबित झाल्या होत्या.

व्योमिका सिंग यांना उत्कृष्ट सेवेसाठी आजवर अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले आहेत. २०१७ मध्ये त्यांना विंग कमांडर पदावर बढती देण्यात आली आणि डिसेंबर २०१९ मध्ये त्यांना कायमस्वरूपी कमिशन मिळाले. ७ मे २०२५ रोजी व्योमिका सिंग यांनी कर्नल सोफिया कुरेशी आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्यासमवेत ऑपरेशन सिंदूरवरील मीडिया ब्रीफिंगमध्ये भाग घेतला. या कारवाईत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला करण्यात आला होता. विंग कमांडर सिंग म्हणाल्या की, पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी ही कारवाई करण्यात आली तसेच तेव्हा नागरिकांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात आली.

व्योमिका सिंग केवळ सक्षम अधिकारीच नाही तर महिला सक्षमीकरणाचे प्रतीक देखील आहेत. त्यांचे यश आणि शौर्ययुक्त काम महिलांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. या मानिनीला मानाचा मुजरा.



# दुधाची बाटली स्वच्छ करताना...

बाळंतपणानंतर काही दिवसांमध्येच ऑफिसला जावे लागणाऱ्या नवमातांपुढे बाळाला फॉर्म्युला मिल्क पाजण्याखेरीज पर्याय नसतो. निप्पल असलेल्या बाटलीचा वापर करुन त्यांचे लहानगी दूध पितात. मात्र ही बाटली दिसायला आकर्षक असली तरी व्यवस्थित स्वच्छ केली नाही तर लहानग्यांच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकते. बऱ्याचदा माता वा मदतनीस आठवड्यातून एकदा किंवा दोनदा बाटली फक्त पाण्याने धुतात. परंतु ही पद्धत पूर्णपणे चुकीची आहे. अशा प्रकारे स्वच्छ केलेल्या बाटल्यांमध्ये बॅक्टेरिया आणि जंतू वाढू शकतात आणि त्यामुळे बाळाला ताप, अतिसार आणि पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच मूल बाटलीतून दूध पित असेल तर ती स्वच्छ करताना काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्याविषयी जाणून घेऊ या.



बाळाला दूध पाजल्यानंतर बाटली लगेच साबण आणि पाण्याने धुवावी. यामुळे बाटलीवर

संगोपन


अडकलेले दुधाचे अवशेष सहजपणे निघून जातात. दूध पाजल्यानंतर दर वेळी बाटलीव्यतिरिक्त झाकण आणि पुढील भागदेखील धुवावा. बाटलीचे सर्व भाग वेगवेगळे धुवून, त्यातील घाण पूर्णपणे काढून टाकली जाते तेव्हाच बाळाला प्रत्येक वेळी स्वच्छ बाटली मिळते.

बाटलीच्या बाजूने दुधाचे अवशेष आणि घाण साचू नये म्हणून आजकाल बाजारात फक्त बाळाच्या बाटल्या स्वच्छ करण्यासाठीचे ब्रश उपलब्ध आहेत. ते कोपऱ्यात आणि भेगांपर्यंत पोहोचून स्वच्छता करत असल्यामुळे जंतूसंपर्क टाळता येतो. सिलिकॉन किंवा प्लास्टिक ब्रश वापरणे चांगले. बाटली अधिक चांगल्या प्रकारे स्वच्छ करण्यासाठी कोमट पाण्यात १० मिनिटे ठेवावी. यामुळे ती व्यवस्थित साफ होते.

बरेचदा पालक बाटली धुतल्यानंतर लगेचच पुन्हा बाळाला दूध पाजण्यासाठी देतात. मात्र हे पूर्णपणे चुकीचे आहे. धुतल्यानंतर बाटली चांगली वाळवा. ओल्या बाटलीत दूध पाजल्याने बॅक्टेरिया आणि संसर्गाचा धोका वाढू शकतो. म्हणूनच बाटली नेहमी पूर्णपणे कोरडी करा. बाळाच्या बाटल्या निर्जंतुक करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे वाफेचा वापर करणे. परंतु अनेक घरांमध्ये निर्जंतुकीकरण यंत्रे नसते. अशा परिस्थितीत तुम्ही दुधाची बाटली पाण्यात उकळवून निर्जंतुक करू शकता. अशा प्रकारे बाटलीतील सर्व बॅक्टेरिया मरतात आणि ती वापरास पूर्णपणे सुरक्षित होते.

# संपर्क ठेवणे गरजेचे

सर्वसाधारणपणे दहा टक्के नोकऱ्यांच्या जाहिराती दिल्या जातात. उर्वरित ९० टक्के नोकऱ्या ओळखीद्वारे, सोशल नेटवर्किंगद्वारे मिळू शकतात. म्हणूनच चांगली नोकरी मिळवण्यासाठी किंवा बढतीसाठी लोकांसोबत कनेक्ट होणं, संवाद वाढवणं गरजेचं आहे. या माध्यमातून नोकरी मिळवण्यासाठी नेमकं काय करता येईल याविषयी...




स्कील डेव्हलपमेंट

✻ सर्वात आधी तुमची आवड जाणून घ्या. तुम्हाला कोणत्या क्षेत्रात नोकरी करायची आहे हे ठरवा. मग त्या क्षेत्रातल्या लोकांशी ओळख करून घेण्याचा प्रयत्न करा. सोशल माध्यमांद्वारे संपर्क साधा.

✻ संबंधित क्षेत्रातल्या तज्ज्ञांची निवड केल्यानंतर त्यांच्याशी संपर्क साधण्याचे मार्ग शोधून काढा. विविध संस्था, संघटनांमार्फत तुम्ही त्यांच्याशी संपर्क साधू शकता.

✻ नावाजलेल्या लोकांचे फोन नंबर शोधा. त्यांना फोन करा. ईमेलद्वारेही संपर्क साधता येईल. अशा प्रकारे तुमचं नेटवर्किंग वाढवा.

✻ स्वत:बद्दल काय सांगायचं हे आधीच ठरवून ठेवा. तुमचं शिक्षण, पार्श्वभूमी,कौशल्यं या सगळ्याची नीट माहिती घ्या.

✻ तज्ज्ञांना चांगले प्रश्न विचारा. त्यांचा प्रवास, संघर्ष यासह संबंधित क्षेत्रातल्या घडामोडींची माहिती घ्या.

✻ संपर्क साधल्यानंतर थांबू नका. सातत्याने पाठपुरावा करत रहा. तज्ज्ञांना वेळोवेळी संपर्क करा. विशेष प्रसंगी त्यांना शुभेच्छा द्या.

# प्रवास सुरक्षित असावा

भारतीय रेल्वे प्रवाशांना प्रवास करताना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. पाण्याच्या बाटल्या, चहा, कॉफी आणि खाद्यपदार्थांसाठी जास्त पैसे द्यावे लागतात. प्रवासी सोशल मीडियावर आयआरसीटीसीला टॅग करून अशा समस्या शेअर करत राहतात. पण आता अशा घटना केवळ गाड्यांमध्येच नव्हे तर रेल्वे प्लॅटफॉर्मवर घडत असल्याचेही समोर येत आहेत. काळजीची बाब म्हणजे अलिकडेच प्रवाशांना मारहाण झाल्याच्या काही घटनाही समोर आल्या आहेत. हेमकुंट एक्सप्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या एका प्रवाशावर क्रूर हल्ला झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर लोकांनी आयआरसीटीसी आणि रेल्वेवर टीका केली. सोशल मीडियावर वापरकर्त्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या. अनेकांनी रेल्वे व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले. वापरकर्ते म्हणतात की, आता प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीवरून भांडणे होत आहेत. कधीकधी चहा महाग असतो किंवा जेवण खराब असते तेव्हा प्रवासी आणि विक्रेत्यांमध्ये वाद होतो. तो हळूहळू मारामारीत बदलतो. यामुळे प्रवाशांची सुरक्षितताच धोक्यात येत नाही तर रेल्वेची प्रतिमाही मलिन होत आहे. वरच्या बर्थवरून ओढून प्रवाशांना मारहाण करण्याच्या घटनाही प्रवासातील वाढत्या समस्या दर्शवतात. बरेचदा प्रवासी पाणी, कॉफी आणि नूडल्ससाठी जास्त पैसे आकारल्याची तक्रार करतात. मात्र पेंट्री कर्मचाऱ्यांना कारवाई केलेले आवडत नाही. यातूनच रागाच्या भरात पेंट्रीमधील काही लोकांनी प्रवाशाला मारहाण केल्याची घटनाही चर्चेत होती. अशा घटनांच्या



भटकंती

पार्श्वभूमीवर महिलांनी गटाने वा एकटीने प्रवास करताना विशेष काळजी घ्यावी. कोणत्याही सेवा वा वस्तूंसाठी जास्त पैसे मागितले जात असतील तर योग्य त्या ठिकाणी, यंत्रणेकडे तक्रार करावी. आपल्याला कोणत्याही प्रकारचा धोका जाणवल्यास पोलीस यंत्रणेचे सहकार्य घ्यावे. जोखीम पत्करुन कोणतेही काम करु नये.



# झटपट बनणारे चविष्ट मंचुरियन

एकसारखं गोडाचं खाऊन खूप कंटाळा येतो. अशा वेळी चटपटीत, चविष्ट असा एखादा पदार्थ हवा असतो. हा पदार्थ झटपट होणारा असावा. म्हणूनच तुम्ही इडली चिली मंचुरियन बनवू शकता.

**साहित्य:** १५ ते २० इडल्या, दोन कांदे, एक सिमला मिरची, एक टोमॅटो, चमचाभर कॉर्नफ्लोर, दोन चमचे टोमॅटो सॉस, एक चमचा ग्रीन चिली सॉस, एक चमचा सोया सॉस, दोन हिरव्या मिरच्या, कढीपत्त्याची पाच पानं, चिरलेली कोथिंबिर, दोन चमचे लाल तिखट, मीठ आणि तेल.

रुचिरा

**कृती:** कांदा, सिमला मिरची आणि हिरव्या मिरचीचे लांब तुकडे करा. टोमॅटोही चिरून घ्या. टोमॅटोचे तुकडे थोडे मोठेच ठेवा. आता प्रत्येक इडलीचे चार तुकडे करा. वाटीत चार चमचे पाणी घेऊन त्यात कॉर्न फ्लोर मिसळून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घाला. गरम झाल्यावर त्यात इडलीचे तुकडे घालून सोनेरी रंगावर तळून घ्या. आता दुसरी कढई गॅसवर ठेवा. त्यात तेल घाला. गरम झाल्यावर कढीपत्त्याची पानं घाला. मग कांदा घालून थोडं परतून घ्या. यानंतर सिमला मिरची आणि हिरवी मिरची घालून परता. शेवटी टोमॅटो घाला. थोडा शिजू द्या. मग त्यात टोमॅटो, ग्रीन चिली आणि सोया सॉस घालून परता. लाल तिखट आणि मीठ घाला. शिजवून घ्या. त्यात इडली घालून सर्व घटक नीट मिसळून घ्या. शेवटी कॉर्न प्लोर घालून पाच मिनिटं शिजवा. त्यावर कोथिंबिर घाला. गरमागरम खायला द्या.

# पोटाच्या समस्यांवर रामबाण उपाय

थोडेसेअन्न खाल्ल्यानंतरही पोट फुगते का? ऑफिसमध्ये. टीव्ही पाहताना किंवा चहासोबत नाश्ता करताना पोटात जडपणा, गॅस आणि अस्वस्थता जाणवते का? उत्तर होकारार्थी असेल तर यावर अतिशय सोपा, घरगुती आणि स्वस्त उपाय आहे. काळे तीळ दिसायला सामान्य असले तरी त्याचे फायदे इतके मोठे आहेत की कोणताही व्यायाम आणि पूरक आहार न घेताही तुमचे पोट हळूहळू सपाट होऊ शकते. पचनयंत्रणा सुधारु शकते. तेव्हा आज याचे लाभ जाणून घेऊ य्या.

काळ्या तिळामध्ये विरघळणारे फायबर असल्यामुळे ते पचनसंस्था सुधारण्यास अत्यंत उपयुक्त आहे. तुम्ही दररोज काळे तीळ खाता तेव्हा आतडे स्वच्छ होते तसेच मल सहज बाहेर काढण्यासही मदत होते. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्याही दूर होते आणि पोट नेहमी हलके वाटते. म्हणजेच गॅस, ॲसिडिटी आणि पोटफुगी यासारख्या समस्यांपासून आराम मिळविण्यासाठी काळे तीळ खाणे हा एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे.



आरोग्यचर्चा

काळ्या तिळांमध्ये ओमेगा-६ फॅटी ॲसिड शरीरातील चयापचय गतिमान करतात. चयापचय सुधारतो तेव्हा शरीर अधिक ऊर्जा जाळते आणि साठवलेल्या चरबीचा जलद वापर करते. म्हणूनच काळ्या तीळाच्या सेवनाने पोटाची चरबी कमी होण्यास मदत होते. शारीरिकदृष्ट्या फारसे सक्रिय नसणारे लोक वजन कमी करू इच्छित असतील तर त्यांच्यासाठी हा उपाय अत्यंत प्रभावी ठरू शकतो. काळे तीळ नैसर्गिक डिटॉक्स एजंट म्हणून काम करतात. त्यात अँटीऑक्सिडंट्स असल्यामुळे शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात. यामुळे शरीराच्या आत साचलेली घाण स्वच्छ होते आणि त्वचा सतेज होते. पोट आत जाते आणि शरीर अधिक ऊर्जावान वाटते. रोजच्या आहारात काळ्या तीळांचा समावेश केल्याने यकृताचे कार्य देखील चांगले होते.

उत्तम लाभ मिळवण्यासाठी रिकाम्या पोटी भाजलेले तीळ खा. सकाळी उठताच एक चमचा भाजलेले काळे तीळ चावून खा आणि नंतर थोडे कोमट पाणी प्या. त्याचप्रमाणे रात्री अर्धा ग्लास पाण्यात एक चमचा काळे तीळ भिजवा. सकाळी उठल्यानंतर हे पाणी गाळून घ्या आणि रिकाम्या पोटी प्या. ही पद्धत शरीर डिटॉक्स करते आणि सूजही दूर होते.

# कामे नेमून दे



मी २९ वर्षांची महिला असून लग्नाला दोन वर्षं झाली आहेत. आम्हाला ११ महिन्यांचा मुलगा आहे. मूल होण्याआधी आमचं नातं अगदी सुरळीत सुरू होतं. आमच्यात पती-पत्नीपेक्षाही मैत्रीचं नातं होतं. पण मूल झाल्यानंतर पतीचा स्वभाव बदलला आहे. तो बाळाची कोणतीही जबाबदारी घेत नाही. कोणत्याही कामात मदत करत नाही. बाळाची काळजी घेणं आईचं कर्तव्य असतं, असं तो मानतो. दररोजच्या धावपळीमुळे मी खूप दमून जाते. त्यामुळे पतीनेही थोडी जबाबदारी घ्यावी असं वाटतं. मी काय करू?

काय करू?

- आजच्या काळात दोन्ही पालकांनी मुलांची जबाबदारी घ्यायला हवी. तुझ्या पतीने जबाबदारी वाटून घेणं गरजेचं आहे. पण प्रत्यक्षात तसं होताना दिसत नाही. आपल्याकडे मुलांना वेगळ्या पद्धतीने वाढवलं जातं. त्यांना घरच्या कामांपासून लांब ठेवलं जातं. यामुळे बाळाची जबाबदारी आपली नाही असं त्यांना वाटू शकतं. तुझ्या पतीचीही अशीच विचारसरणी असल्याचं दिसतं. पण मैत्रिणी, तू सगळ्या कामांची यादी कर. पतीला काही कामं नेमून दे. रात्री बाळाला झोपवणं, त्याच्याशी थोडा वेळ खेळणं, बाहेर फिरायला नेणं अशा जबाबदाऱ्या त्याला दे. तू हे कर, ते कर असं सांगण्यापेक्षा नेमकं काय करायचं हे सांग. मूल दोघांचं असल्याची जाणीव करून दे. यामुळे बाळाच्या संगोपनात पतीची मदत होईल.

स्मार्ट टिप्स

## घालवा पायांच्या भेगा



चेहऱ्याचं सौंदर्य जपताना पायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. पायांना भेगा पडतात. त्वचा कोरडी, खरखरीत होते. पण अगदी सोप्या घरगुती उपायाने तुम्ही ही समस्या दूर करू शकता. केळ्याची साल यावर खूपच प्रभावी आहे. पायांच्या भेगा कमी करण्यासाठी केळ्याची साल पायाच्या तळव्यांवर घासा. या आधी पाय स्वच्छ धुवून कोरडे करा. केळ्याच्या सालीत बरीच पोषणमूल्यं असतात. यामुळे पायांचं सौंदर्य खुलू शकतं.

हेअर केअर

## रात्री केस धुवू नका...

काही जणी रात्री केस धुतात. गडबडीमुळे एखाद्या वेळी रात्री केस धुणं ठीक आहे. पण वारंवार असं केल्याने केसांमध्ये कोंडा होऊ शकतो. ओलसर केसांमध्ये संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. त्यातच ओले केस लवकर गुंतू शकतात. म्हणूनच रात्री केस धुतले तरी ते वाळवून मगच झोपा.



किचन टिप्स

## सफरचंदावर मेण असल्यास...



सफरचंदाची चमक टिकवून ठेवण्यासाठी त्यावर मेण लावलं जातं. हे मेण आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असतं. म्हणूनच सफरचंद फारच चमकदार दिसत असेल तर खाण्याआधी ते नीट स्वच्छ करून घ्या. सफरचंद एक मिनिटभर गरम पाण्यात ठेवा. यानंतर खरखरीत कपड्याने स्वच्छ करा. यामुळे मेण निघून जाईल. तसंच ॲपल सिडर व्हिनेगर मिसळलेल्या पाण्याने सफरचंद स्वच्छ करता येईल.




# बीडच्या अविनाश साबळेची 'सुवर्ण' धाव

## गोल्ड मेडलसह सिद्ध केलं आशियात वर्चस्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी तिसऱ्या दिवशीही सुरू आहे. दक्षिण कोरियातील गुमी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत धावपटू अविनाश साबळेने ऐतिहासिक कामगिरी बजावली. त्याने भारताला तिसरे सुवर्णपदक मिळवून दिले आहे. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील मांडवा गावात जन्मलेला अविनाश आता आशियाई चॅम्पियन ठरला आहे. त्याने पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. त्याने अंतिम फेरीत ८:२०.९२ सेंकदाची वेळनोंदवताना सुवर्णपदकाला गवसणी घातली.

अविनाशने अंतिम शर्यतीत जपानच्या युतारो निनाए आणि कतारच्या झकारिया एलाहलामी यांना मागे टाकत अव्वल क्रमांक पटकावला. जपानच्या युतारोने ८:२४.४१ सेकंदाची वेळ नोंदवत रौप्य पदक जिंकले, तर कतारच्या झकारियाने ८:२७.१२ सेकंदाची वेळ नोंदवत कांस्य पदकाची कमाई केली.

अविनाशच्या नावावर ३००० मीटर स्टीपलटेसमध्ये राष्ट्रीय विक्रमही आहे. तसेच तो आशियाई क्रीडा स्पर्धेतही यापूर्वीच सुवर्णपदक जिंकला आहे. आता त्याने आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्येही सुवर्णपदकाची कमाई करत आशियात त्याचे वर्चस्व सिद्ध केले आहे.

अविनाशने यापूर्वी २०१९ मध्ये आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्य पदक जिंकले होते. तो या स्पर्धेत पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात सुवर्णपदक जिंकणारा तिसरा भारतीय ठरला आहे. यापूर्वी १९७५ साली हरबैल सिंग यांनी सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर १९८९ मध्ये दिना राम यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली होती.

दरम्यान, भारताने आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत यापूर्वी दोन सुवर्णपदके जिंकले आहेत. पहिल्याच दिवशी गुलवीर सिंग याने पुरुषांच्या १०,००० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर ४ बाय ४०० मीटर मिश्र रिले शर्यतीतही भारतीय संघाने सुवर्णपदक जिंकले होते. या संघात संतोष कुमार, रुपल, विशाल आण सुभा वेंकटेसन यांना समावेश होता. या स्पर्धेत रुपल चौधरीने महिलांच्या ४०० मीटरमध्ये रौप्य, पुजाने महिलांच्या १५०० मीटरमध्ये रौप्य, प्रवीण चिथारवेलने पुरुषांच्या ट्रिपल जम्पमध्ये रौप्य, तेजस्विनी शंकरने डेक्थलॉनमध्ये रौप्यपदक जिंकले आहे.




## पुणे जिल्हा संघाने पटकावले तृतीय स्थान !! मुंबई संघाला विजेतेपद



**पुणे :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्युआयएफए) यांच्यावतीने आयोजित 'महाराष्ट्र राज्य आंतर जिल्हा' सब-ज्युनिअर मुलांच्या (१३ वर्षाखालील) गटाच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने पालघर संघाचा २-१ असा पराभव करून स्पर्धेतील तृतीय स्थानाचे विजेतेपद मिळवले. मुंबई संघाने ठाणे संघाचा २-० असा पराभव विजेतेपद निश्चित केले. धुळे जिल्ह्यातील शिरपुर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पुणे जिल्हा संघाच्या ओम शिंदे याने दोन गोल करून सामन्याच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. ओम शिंदे याने २० व्या मिनिटाला गोल करून पुणे संघाला १-० आघाडी मिळवून दिली. पुर्वार्धामध्ये ही आघाडी पुणे संघाने टिकवून ठेवली होती. उत्तरार्धाच्या सुरूवातीलाच पालघर संघाच्या चिन्मय कुलकर्णी याने गोल करून संघाला १-१ अशी बरोबरी निर्माण केली. त्यानंतर पुणे संघाने जोरदार प्रतिआक्रमण रचून पालघर संघावर दबाव निर्माण केला. त्यानंतर ४३ व्या मिनिटाला ओम शिंदे याने गोल करून पुणे संघाला २-१ अशी निर्णायक आघाडी मिळवून दिली. पूर्णवेळ ही आघाडी कायम ठेऊन पुणे संघाने तिसऱ्या स्थानावर आपले नाव निश्चित केले. याआधी स्पर्धेत उपांत्य फेरीमध्ये पुण्याला ठाणे संघाकडून १-० असा स्विकारावा लागला आणि पुणे संघाचे आव्हान उपांत्य फेरीतच संपुष्टात आले होते. उपांत्य फेरीमध्ये दाखल होताना पुणे संघाने हिंगोली संघाचा ६-० असा तर, उप-उपांत्यपुर्व फेरीमध्ये रायगड संघाचा २-१ असा पराभव केला होता. पुणे संघासह स्पर्धेत अमरावती, अकोला, हिंगोली सातारा, ठाणे, अहमदनगर, पालघर, अमरावती आणि मुंबई हे संघ सहभागी झाले होते.

## 'काकडवाडीतील काव्या कासार ठरली सुवर्णपदकाची मानकरी'



**तळेगाव दिघे :** संगमनेर तालुक्यातील काकडवाडी येथील काव्या संदीप कासार हिने काकरविटा झापा (नेपाळ) येथे आयोजित कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळवीत नेत्रदीपक यश संपादन केले. इयत्ता पाचवीत शिक्षण घेणारी काव्या कासार दोन वर्षांपासून कराटे प्रशिक्षण घेत होती. नुकत्याच नेपाळ येथील काकरविटा झापा येथे आयोजित मेयर कप २०२५ स्पर्धेत तिला प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला. अकराव्या चॅम्पियनशीप कराटे स्पर्धेत तिने सुवर्णपदक, तर काथा स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. याकामी तिला प्रशिक्षक आनंद रोकडे व सविता रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल काव्या कासार हिचे पदाधिकारी व मान्यवरांकडून कौतुक करण्यात येत आहे. काव्या कासार हिने या अगोदरही स्थानिक पातळीवरील स्पर्धांमध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. तिच्या कामगिरीत सातत्य राहिल्याने तिला यश मिळाले आहे.

## इंग्लंडचा वनडेत दुसरा सर्वात मोठा विजय



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडने वेस्ट इंडिजवर २३८ धावांनी विजय मिळवला. यासह त्यांनी तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. एकदिवसीय इतिहासात धावांच्या फरकाने इंग्लंडचा हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. गुरुवारी बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत ८ गडी गमावून ४०० धावा केल्या. प्रत्युत्तरात, वेस्ट इंडिजचा संघ १६२ धावांवर गारद झाला. मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामना रविवारी कार्डिफमध्ये खेळला जाईल.

प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ४०० धावा केल्या, जो वेस्ट इंडिजविरुद्ध घरच्या मैदानावरील एकदिवसीय सामन्यातील त्यांचा सर्वोत्तम धावसंख्या होता. इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू जेकब बेथेलला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

बेथेलने ८२ धावा केल्यानंतर एक विकेट घेतली. चार इंग्लिश फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. सलामीवीर बेन डकेट (६०), जो रूट (५७) आणि कर्णधार हॅरी ब्रुक (५८) यांनी प्रभावी खेळी केल्या. इंग्लंडच्या सात फलंदाजांनी ३० पेक्षा जास्त धावा केल्या.

## सकारात्मक व पोषक वातावरणामुळेच क्रीडा क्षेत्रात देशाची भरभराट-क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे



**पुणे :** "फिटनेस फॉर ऑल ,खेलो इंडिया गेम्स यासारख्या चांगल्या व दूरगामी योजनांमुळेच आपल्या देशात गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये क्रीडा क्षेत्रासाठी सकारात्मक व पोषक वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळेच क्रीडा क्षेत्रात देशाची भरभराट झाली आहे" असे राज्याचे क्रीडा व युवक मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी सांगितले.


क्रीडा भारती संस्थेतर्फे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमक दाखविणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा जिजामाता पुरस्काराने क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे व तेनसिंग नोर्गे सन्मानित गिर्यारोहक व संघटक उमेश झिरपे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी क्रीडा भारती संस्थेचे अखिल भारतीय महामंत्री राज चौधरी व पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय पुरंदरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भरणे पुढे म्हणाले की "महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांमध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि खेलो इंडिया स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण अव्वल दर्जाची कामगिरी केली आहे. राज्य शासन नेहमीच खेळाडूंना सहाय्य करण्यासाठी सर्वतोपदी प्रयत्न करीत असते आणि यापुढेही करणार आहे.

प्रत्येक खेळाडूच्या यशामध्ये त्यांच्या आई-वडिलांनी केलेल्या त्यागाचा आणि कष्टाचा मोठा वाटा असतो मात्र आई-वडील कायमच प्रसिद्धीपरान्मुख असतात". "खेळाडूंच्या पालकांचा सत्कार करीत क्रीडाभारतीने सर्वांपुढे मोठा आदर्श निर्माण केला आहे" असे सांगून झिरपे म्हणाले की "क्रीडाक्षेत्र हे करिअरसाठी उत्तम क्षेत्र झाले असून गिर्यारोहण क्षेत्रातही करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत."

राज चौधरी यांनी जिजाऊंचे कर्तृत्व आणि खेळाडूंच्या मातांचा जिजामाता सन्मान पुरस्काराने गौरव यामागील भूमिका विषद केली.

यंदाच्या जिजामाता पुरस्कार विजेत्यांमध्ये कुस्तीगीर अमोल बराटे याची आई श्रीमती चंदा, कबड्डीपटू आम्रपाली गलांडे यांची आई सुरेखा,वुशूपटू कल्याणी जोशी हिची आई अनुराधा, बुद्धिबळपटू आदित्य सामंत याची आई संध्या, स्केटिंगपटू श्रुतिका सरोदे हिची आई रंजना, मॉडर्न पेन्टथलॉन खेळाडू विराज परदेशी याची आई बेला, ॲथलेटिक्स खेळाडू यमुना लडकत हिची आई सुनंदा, एव्हरेस्टवीर भूषण हर्षे याची आई भाग्यश्री, योगासनपटू नितीन पवळे याची आई जयश्री, प्रस्तारोहण खेळाडू सानिया शेख हिची आई निगर, तायक्वांदोपटू कोमल घारे सुरेखा,अश्व रोहन खेळाडू आशिष लिमये याची आई डॉक्टर विमला, यांचा समावेश होता.

## बंगळुरूची चौथ्यांदा आयपीएल फायनलमध्ये एन्ट्री!



**चंढीगड :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुरुवारी धमाकेदार कामगिरी करत इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला आहे. गुरुवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने क्वालिफायर १ सामन्यात पंजाब किंग्सला ८ विकेट्सने पराभूत केले. या विजयासह त्यांनी अंतिम सामन्याचे तिकीट पक्के केले. बंगळुरू आयपीएल २०२५ मध्ये अंतिम सामन्यात पोहचलेला पहिला संघ ठरला आहे. तसेच बंगळुरूची ही अंतिम सामन्यात पोहचण्याची एकूण चौथी वेळ आहे. यापूर्वी २००९, २०११ आणि २०१६ साली त्यांनी अंतिम सामना गाठला होता. मात्र तिन्ही वेळेला त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे यंदा आता ते पहिले विजेतेपद जिंकण्याचा प्रयत्न ३ जूनला अहमदाबादमध्ये करतील. ३ जून रोजी अहमदाबादला अंतिम सामना होणार आहे. तथापि, या पराभवानंतरही पंजाब किंग्सचे आव्हान अद्याप संपलेलं नाही. त्यांना अजूनही अंतिम सामना गाठण्यासाठी दुसरी संधी मिळणार आहे. ते आता १ जून रोजी क्वालिफायर २ सामन्यात खेळतील ३० मे रोजी एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील विजेत्या संघाविरुद्ध क्वालिफायर २ मध्ये पंजाबला दोन हात करावे लागणार आहे. क्वालिफायर २ मध्ये विजेता होणारा संघ बंगळुरूविरुद्ध अंतिम सामना खेळेल. मुल्लनपूरला झालेल्या क्वालिफायर १ सामन्यात पंजाब किंग्सने बंगळुरूसमोर केवळ १०२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग बंगळुरूने १० षटकात २ विकेट्स गमावत १०६ धावा करून सहज पूर्ण केला. बंगळुरूच्या या विजयात त्यांच्या गोलंदाजांचा मोठा वाटा राहिला.

## टेबल टेनिस स्पर्धा; स्थिनोज फ्लिकर्स विजेतेपदाचे मानकरी; शारदा फिनिशर्सला उपविजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेने डेक्कन जिमखाना क्लबच्या सहकार्याने आयोजित केलेल्या कृष्णा व्हॅली ॲग्रोटेक पुणे टेबल टेनिस लीग सुपरलीग स्पर्धेत स्थिनोज फ्लिकर्स संघाने शारदा फिनिशर्स संघाला १५-१४ असे चुरशीच्या लढतीनंतर पराभूत केले आणि अजिंक्यपदावर नाव कोरले. शारदा फिनिशर्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. ही स्पर्धा कृष्णा व्हॅली ॲग्रोटेक एलएलपी कंपनीने पुरस्कृत केली होती.

डेक्कन जिमखाना क्लबच्या प्रशस्त इनडोअर सभागृहात आयोजित केलेल्या या स्पर्धेतील अंतिम फेरीचे सामने विलक्षण चुरशीने खेळले गेले.

स्थिनोज फ्लिकर्स व शारदा फिनिशर्स या दोन्ही संघांमधील खेळाडूंनी अव्वल दर्जाचा खेळ करीत सामना रंगतदार केला. अखेर स्थिनोज फ्लिकर्स संघाने बाजी मारली. त्यावेळी एकेरीच्या पहिल्या लढतीत फ्लिकर्स संघाच्या मानसी चिपळूणकर हिने स्वप्नाली नरळे हिचा २-१ अशा गेम्सने पराभव केला. पाठोपाठ संकल्प बांदिवडेकर याने नीरव मुळ्ये याला २-१ असे पराभूत करीत संघाला आघाडी मिळवून दिली. संतोष वाकराडकर व रुचिता दारवटकर यांनी इशिका उमाटे व रवींद्र जोशी यांचा ३-० असा पराभव करीत फ्लिकर्स संघाची आघाडी राखली. त्यावेळी फ्लिकर्स संघ सहज विजय मिळवेल अशी अपेक्षा होती.

## वैभवला भेटले मोदी: मोदींचे चरणस्पर्श करत आशीर्वाद

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी पाटण्यात क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशीची भेट घेतली. वैभवने त्यांचे पाय स्पर्श करून आशीर्वाद घेतले. यावेळी वैभवचे पालकही उपस्थित होते. पंतप्रधानांनी वैभवच्या कुटुंबासोबत १० मिनिटे घालवली. तथापि, काय चर्चा झाली याची माहिती उघड झालेली नाही. पंतप्रधान २ दिवसांच्या बिहार दौऱ्यावर होते. परतताना पाटणा विमानतळावर ही भेट झाली.

वैभवने १४ वर्षे आणि २३ दिवसांच्या वयात आयपीएलमध्ये पदार्पण केले आणि तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वात तरुण पदार्पण करणारा खेळाडू ठरला. त्याने १९ एप्रिल २०२५ रोजी लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध राजस्थान रॉयल्सकडून पदार्पण केले. वैभवने त्याच्या पदार्पणाच्या सामन्यात २० चेंडूत ३४ धावा केल्या, ज्यात तीन षटकारांचा समावेश होता. यापूर्वी हा विक्रम रे बर्मन यांच्या नावावर होता. त्यांनी वयाच्या १६ वर्षे १५७ दिवसांत पदार्पण केले.

वैभवचा हा पहिलाच आयपीएल हंगाम होता. वैभव सूर्यवंशीने ७ सामन्यांमध्ये २५२ धावा केल्या आणि त्याची सरासरी ३६ आणि स्ट्राईक रेट २०६.५५ होता. या काळात वैभवने एक शतक आणि एक अर्धशतक झळकावले. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या मेगा लिलावात वैभवला राजस्थान रॉयल्सने १.१० कोटी रुपयांना खरेदी केले.

## रोहित शर्माचा विक्रम! जॉनी बेअरस्टोसह मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांची आतषबाजी

**जयपुर :** मुंबई इंडियन्सने त्यांना चॅम्पियन संघ का म्हणतात हे पुन्हा एकदा दाखवले. आयपीएल २०२५ मधील पहिल्या सहापैकी पाच सामने गमावूनही मुंबईचा संघ प्ले ऑफमध्ये पोहोचला. आज त्यांनी गुजरात टायटन्सविरुद्धच्या एलिमिनेटर लढतीत वादळी खेळी केली. जॉनी बेअरस्टोने मुंबईकडून पदार्पण केले आणि त्याला रोहित शर्माच्या आक्रमक खेळीची साथ मिळाली. गुजरातच्या ढिसाळ क्षेत्ररक्षणाचा फायदा मुंबईला झाला.



रोहितला पहिल्या तीन षटकांत दोन जीवदान देऊन गुजरातचे खूप मोठी चूक केली. तो काहीकाळ शांत राहिला, परंतु जॉनी बेअरस्टोने वादळी खेली केली. त्यानने २२ चेंडूंत ४ चौकार व ३ षटकारांसह ४७ धावा केल्या. साई किशोरच्या चेंडूवर रिव्हर्स स्वीप मारण्याच्या प्रयत्नात बेअरस्टो बाद झाला. साई सुदर्शनने नसलेला कॅच बनवला अन् गेराल्ड कोएत्झीने यावेळी कोणतीही चूक न करता झेल टिपला. बेअरस्टोने मुंबईला चांगला प्लॅटफॉर्म तयार करून दिला. रोहितसह त्याने ८४ धावा जोडल्या.

रोहित व सूर्यकुमार यादव या जोडीनेही ५९ धावांची भागीदारी केली. सूर्यालाही एक जीवदान मिळाले होते, परंतु तो ३३ धावांवर बाद झाला. साई किशोरने ही विकेट घेतली आणि ४-०-४२-२ अशी स्पेल पूर्ण केली. रोहितने मात्र हात मोकळे करताना २८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. रोहित हा आयपीएल इतिहासात ३०० षटकार खेचणारा पहिला भारतीय ठरला. विराट कोहली २९१ षटकारांसह त्याच्या मागे आहे. सर्वाधिक षटकारांच्या यादीत ख्रिस गेल ३५७ षटकारांसह अव्वल आहे.

## आशियाई इनडोअर रोइंग स्पर्धेत सुवर्ण, रौप्य व कांस्यपदकासह रचला इतिहास

# 'एमआयटी एडीटी'च्या प्रा.केदारींची पदकांची हॅट्ट्रिक!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** थायलंडची राजधानी पट्टाया येथे झालेल्या आशियाई इनडोइअर रोइंग अजिंक्यपद स्पर्धेत येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या (एडीटी) 'स्कुल ऑफ लॉं'चे प्राध्यापक आदित्य रविंद्र केदारी यांनी पदकांची हॅट्ट्रिक पूर्ण करत भारतासाठी ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली. प्रा.केदारींनी २ किमी मास्टर मिश्र दुहेरी प्रकारात सुवर्ण, २ किमी पुरुष मास्टर्स एकेरी स्कल प्रकारात रौप्य आणि ५०० मीटर मास्टर एकेरी प्रकारात कांस्य




मिळवत महाराष्ट्रासह विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

प्रा.केदारींनी स्पर्धेत सर्वप्रथम २ किमी पुरुष मास्टर्स एकेरी स्कल प्रकारात आव्हान देताना ६:२७.५ अशी वेळ नोंदवित रौप्य कामगिरी केली. या गटात त्यांचा भारतीय सहकारी सिद्धार्थ याने (६:२५.१) याने सुवर्णपदक पटकाविले तर सौदी अरेबियाच्या हिशामने ६:४०.७ वेळेसह कांस्य पदक पटकाविले. यानंतर प्रा.केदारींनी २ किमी मास्टर मिश्र दुहेरी प्रकारात भारतीय सहकारी हरप्रित कौर यांच्यासह दमदार कामगिरी करताना आपली सुवर्णपदकाची भूक पूर्ण केली. त्यानंतर, ५०० मीटर मास्टर एकेरी प्रकारातही त्यांनी दमदार झुंज देत कांस्य पदकाला गवसणी घालताना एकाच स्पर्धेत तीन पदके जिंकून भारतासाठी ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली. प्रा.केदारी हे आशियाई स्पर्धेचे गतवर्षीचे ५०० मीटर मास्टर एकेरी प्रकारातले सुवर्णपदक विजेते आहेत. यंदा, पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय इनडोअर रोइंग स्पर्धेत रौप्यपदक पटकावल्यानंतर त्यांची भारतीय रोइंग संघात निवड झाली होती. भारतीय रोइंग संघटनेच्या (आरएफआय) अध्यक्ष राजलक्ष्मी सिंग देव यांच्याकडून संघातील निवडीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रा. केदारींनी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या बोट क्लबमध्ये संदीप भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव करताना, आपल्या वेळेत कमालीची सुधारणा केली.

#रा